**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७९/२००८**

**१) श्री कृष्णाजी हिरामणजी कुंभारे,**
**माताघरे मोहल्ला, जुनी मंगळवारी, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"श्रीकृष्णाजी हिरामणजी कुंभारे घन नं.९८१, वार्ड नं.३७, सर्कल नं.११/१६ जुनी मंगळवारी, नागपूर यांची फाईलची संपूर्ण उजव्या बाजूचे क्रं.१ ते शेवटपर्यंत व संपूर्ण डाव्या बाजूचे क्रं.१ ते शेवटपर्यंत कागद पत्राची सत्य प्रति कॅापी मिळण्याबाबत."

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.२.२००७ रोजी माहिती देण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.९.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**५.** अपीलकर्ता यांचे दिनांक २७.८.२००७ चे जे प्रथम अपील आहे ते अपील हे दिनांक १३.२.२००७ च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिसून येत नाही. तसेच द्वितीय अपील मेमो मध्ये सुध्दा अपीलाचे कारण दिलेले आहे ते अपीलाचे कारण हे दिनांक १३.२.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिसून येत नाही. द्वितीय अपील मेमोमध्ये घराच्या टॅक्स रसिद मध्ये नांव दुरुस्त करण्यात येवून अपीलार्थीचे नांव दर्शविण्यात यावे अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते.

**६.** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात कार्यवाही करुन मागता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक १३.२.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, ती अर्जात मागितलेल्या प्रमाणे असल्यामुळे प्रथम अपीलातील मागणी व द्वितीय अपीलातील मागणी ही विसंगत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.१.२००८ च्या द्वितीय अपील मेमोमधील विनंती मान्य करता येत नसल्यामुळे व अपीलकर्ता यांना दिनांक १३.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

March,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८२/२००८**

**१) श्री मधुकर रामाजी नंदुरकर, अ.का.**
**तहसिल कार्यालय, गडचिरोली, ता.जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त(महसुल),**
**नागपूर विभाग, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (आस्थापना कक्ष),**
**उपआयुक्त नागपूर विभाग, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १८.६.२००७ रोजी उपआयुक्त(महसुल) तथा माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे अ.का.संवर्गातून ना.तहसिलदार संवर्गातील पदोन्नती संबंधाने कार्यवाही सन १९९९ ते सन २००७ पर्यंत मुद्दे निहाय १ ते १० मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १७.७.२००७ रोजी रुपये ६००/- भरुन माहिती घेवून जाण्याची व्यवस्था करावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी अतिरिक्त खर्च भरणा केलेला दिसून येतो व दिनांक २४.७.२०७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

**४.** त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. माहिती ही एक महिन्याच्या कालावधीनंतर व अपूरी माहिती पुरविल्यामुळे, असे अपीलाचे कारण दिलेले आहे. सोबत त्यांनी विवरण दाखल केले आहे. व त्यामध्ये कोणत्या

प्रकारची माहिती त्यांना अप्राप्त आहे, त्याबाबतची माहिती त्यांनी दिलेली दिसून येते. त्याबाबतचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२००७ रोजी मुद्या क्रमांक २,३,५,६ व १० निहाय माहिती ४-५ दिवसांत म्हणजे दिनांक ३.११.२००७ पर्यंत देण्यात यावी. सदर माहिती श्री जोशी, अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे देण्यास मी त्यांना अधिकार पत्र लिहून देत आहे, असे पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून श्री जोशी यांनी ती स्विकारलेली आहे, अशी पोच दिसून येते. परंतु, तरीही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती पुरविली नसल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे. तसेच माहिती घेवून जाण्याकरीता त्यांना पत्राद्वारे सूचना न केल्यामुळे, असेही कारण दिलेले आहे.

**५.** अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहिती बध्दल त्यांनी असे सांगितले की, ती विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे व अपूर्ण माहिती दिली आहे. त्याबाबत त्यांनी प्रथम अपीलात विवरण दिलेले आहे असे त्यांनी सांगितले.

**६.** अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना जे संपूर्ण कागदपत्र उपलब्ध करुन दिलेले आहे त्यामध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीचा सुध्दा उल्लेख आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली याबाबत विचारले असता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती मागितल्यावर पत्राने माहिती घेवून जा हे कळविण्याची आवश्यकता नाही. व त्यामुळे त्यांना विहित मुदतीत माहितीचा खर्च कळविण्यात आलेला दिसून येतो. दिनांक २९.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना मुदत जरी दिलेली असली तरी त्या संदर्भात श्री जोशी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

**७.** असे असले तरी, अपीलकर्ता यांचे समाधान न झालेले नसल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून कोणत्या प्रकारची माहिती त्यांना अजूनही अप्राप्त आहे ते त्यांनी त्याबाबतचे विवरण देवून स्वतःचे समाधान करुन घेणे संयुक्तिक राहील व त्याकरीता

अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या १० मुद्यांच्या संदर्भात मुद्येनिहाय माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा उपलब्ध झालेल्या माहितीमध्ये त्यांना अपेक्षित असलेली माहिती अंतर्भूत आहे, असे त्यांचे समाधान करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १/२००९**

**१) श्री अनन्त रा. दक्षिणदास,**
**दक्षिणदास कन्सल्टंट प्रा.लि.,**
**भिवापूरकर चेंबर्स, तिसरा माळा,**
**यशवंत स्टेडियम समोर, धंतोली, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, नागपूर, धनवटे चेंबर्स, सिताबर्डी, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, नागपूर, सहकार भवन,**
**अमरावती रोड, भरत नगर, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात नागरी सहकारी बँकाबध्दलची एक रकमी कर्ज भरपाई योजनेच्या मार्गदर्शक सूचनांबध्दल खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"शासन निर्णय क्रं.युआरबी-१८०७/प्र.क्रं.४५९/७-स दि.१०.३.२००८ चा संदर्भ घ्यावा. या परिपत्रकातील परिच्छेद क्रं.३ मध्ये बँकांनी पाळावयाची बंधने अंतर्गत असे नमूद केले आहे की, एन.पी.ए.ची तारीख व वर्गवारी बँकेच्या दप्तराप्रमाणे व लेखा परिक्षकांनी प्रमाणित केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येईल. वास्तविक पाहता लेखा परिक्षकांनी एन.पी.ए.ची तारीख प्रमाणित करतेवेळी रिझर्व बँक ऑफ इंडियाचे MASTER CIRCULAR-Prudential Norms On Income Recognition, Asset Classification Provisioning and Other Related

Matters मधील मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करणे केवळ अपेक्षितच नव्हे तर आवश्यक आहे. त्यात नमूद केल्याप्रमाणे a non performing asset(NPA) is an advance, where : (i) interest and or installment of principal remain overdue for a period of more than १८० days in respect of a Term loan. (ii) The accounts remains Out of Order for a period of more than १८० days, in respect of an overdraft/cash credit(OD/CC), परंतु रिझर्व बँकेच्या उपरोक्त नमूद केलेल्या निर्देशानुसार एन.पी.ए.ची तारीख निश्चित केल्यास ती लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेल्या तारीख व वर्गवारीपेक्षा भिन्न येत असल्याकारणाने एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत देय रक्कम निर्धारित करतांना कर्जदारांना लाखो रुपयाचा फटका बसत आहे, बसला आहे, बसणार आहे. तरी रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करुन निश्चित केलेली तारीख ही एन.पी.ए.ची खरी तारीख ठरवावी की रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वांना छेद देवून व स्वतःच्या मर्जीने, किंवा काही विशिष्ट हेतूने प्रेरित होवून अथवा सहकारी संस्थेच्या तर्फे आलेल्या दबावाकारणाने लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या चुकीच्या तारखेपैकी या दोनर्पकी एन.पी.ए.ची. कोणती तारीख योग्य आणि बरोबर आहे हयाबध्दल माहिती द्यावी."

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८.११.२००८ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अपीलकर्ता अर्जदार यांना अर्जात मागणी केल्याप्रमाणे आपणास आवश्यक असलेली माहिती ही दस्तऐवजाच्या स्वरुपात मागणी केली नाही. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) नुसार आपणास पाहिजे असलेली माहिती ही दस्तऐवजाच्या स्वरुपात मागणी करणे आवश्यक आहे. तेव्हा आपणास सूचत करण्यात येते की, आपण केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार कलम २(च) नुसार दस्तऐवजाच्या स्वरुपात मागणी केल्यास कार्यालयात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांची माहिती पुरविता येईल, असे कळविलेले दिसून येते.

४. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता अर्जदार यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी जिल्हा उपनिबंधक यांचेकडे पुन्हा आपल्या कार्यालयाद्वारे दिनांक ७.११.२००८ रोजी स्विकृत केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गतचा अर्ज वैध असल्या कारणाने मागितलेली माहिती दिनांक ६.१२.२००८ किंवा त्यापुर्वी पुरविण्याचे करावे, असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ५.१२.२००८ रोजी जिल्हा उपनिबंधक यांनी पुर्वी प्रमाणेच उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे दिनांक १५.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

५. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दिनांक १५.१.२००९ रोजी शासनाचे दिनांक १०.३.२००६ चे तसेच आर.बी.आय.चे दिनांक ३०.४.२००७चे एन.पी.ए.आकारणी संबंधीचे परिपत्रकाची छायांकित प्रती पुरविण्यात येत असून अर्जदाराने मागविलेल्या माहितीचा स्पष्ट उल्लेख नसून प्रश्नोत्तराच्या स्वरुपातील आहे. त्यामुळे अपील फेटाळून लावलेले दिसून येते. त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, रिझर्व बँकेचे निर्देश तसेच सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांचे दिनांक १०.३.२००७ चे एन.पी.ए.तारीख निश्चित करण्याबाबतचे शासन निर्णयाचे संदर्भात कोणते आदेश लागू होतील, असे विचारलेले दिसून येते. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(च) प्रमाणे ""माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली असून त्यात कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, टिपणी, ई-मेल, अभिप्राय,सूचना इ.च्या स्वरुपातील छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्येत अभिप्रेत आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. प्रथम अपीलीचा निर्णय योग्य आहे व त्यामुळे सकृत दर्शनी अपीलकर्ता यांचे

अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना दिनांक ३.११.२००८ रोजी दिलेले उत्तर व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९२/२००८**

**१) श्री श्रीहरी सदाशिव पाऊलबुध्दे,**
**राममंदीर जवळ, वार्ड नं.२, मु.पो.चोमोर्शी,**
**ता.चामोर्शी, जिल्हा गडचिरोली-४४२६०३. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक,**
**महानगरपालिका, नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, महानगरपालिका कार्यालय, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"श्री मनोज दिगंबर पालारपवार यांचा फ्लॅाट(घर) किती बिल्डींग, पहिला मजला पोस्ट ऑफिस जवळ, नवीन बस स्टाप जवळ, नंदनवन नागपूर या पत्यावरील फ्लॅाट(घराची) माहिती किती रुप आणि मार्केट नुसार खरेदी किंमत किती, याची माहिती मिळणेबाबत."सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.११.२००७ रोजी स्पीड पोस्टाद्वारे/युपीसीद्वारे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१२.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे

अपील निकाली काढण्यात आलेले आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन माहिती उपलब्ध झाली नाही असे द्वितीय अपीलाचे कारण दिले आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्या श्री मनोज दिगांबर पालारपवार यांचा फ्लॅट(घर) किर्ती बिल्डींग, पहिला मजला, पोस्ट ऑफिस जवळ, नवीन बस स्टॅाप जवळ, नंदनवन, नागपूर या पत्यावरील फ्लॅट(घराची) माहिती किती रुम आणि मार्केट नुसार खरेदी किंमत किती याची माहिती मागितली होती. परंतु सदरच्या घराच्या संदर्भामध्ये कागदपत्रांची तपासणी केली असता कोणत्याही प्रकारची नोंद त्याबाबत मिळून येत नाही. व त्यामुळेच त्यांना स्पष्टपणे माहिती कळवावी असे कळविले होते. परंतु त्यांनी तसे न करता प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलात माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे व त्यात पुन्हा कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले आहे. आजही अपीलकर्ता गैरहजर आहे व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा किंवा पुरावा आयोगाकडे दाखल केला नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे व प्रथम अपीली अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

March,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९३/२००८**

**१) श्री श्रीहरी सदाशिव पाऊलबुध्दे**
**राममंदीर जवळ, वार्ड नं.२, मु.पो.ता. चामोर्शी,**
**जिल्हा गडचिरोली-४४२६०३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री कन्यका नागरी सहकारी बँक लि.चंद्रपूर,**
**पहिला माळा, रघुवंशी कॅाम्प्लेक्स, सिटी हायस्कुल मागे,**
**बाजार वार्ड, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**श्री कन्यका नागरी सहकारी बँक लि.चंद्रपूर,**
**पहिला माळा, रघुवंशी कॅाम्प्लेक्स, सिटी हायस्कुल मागे,**
**बाजार वार्ड, चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.९.२००७ रोजी श्री कन्यक्का नागरी सहकारी बँक, चंद्रपूर, शाखा मुल येथील मनोजकुमार दिगंबर पालारपवार यांचे ४ बँक कर्ज प्रकरणाची माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू नसल्याने आपण विचारणा केलेली माहिती आपणास पुरवू शकत नाही, असे दिनांक २६.९.२००७ रोजी कळविण्यात आले होते. त्यानंतर दिनांक ८.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी तक्रार अर्ज दाखल केला आहे. प्रथम अपील दिनांक १२.११.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ३०.११.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकाना लागू होत नाही, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे व खुलाशामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. विरुध्द राज्य माहिती आयोग व इतर या केसमध्ये दिनांक १३.१.२००९ रोजी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये पारित केलेल्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेला लागू नाही, असे आयोगाचे निदर्शनास आणलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१/२००८**

**१) श्री हनमंतराव मोनाजी राऊत,**
**टिळकनगर, वार्ड क्रं.४(वडसा रोड),**
**ब्रम्हपुरी-४४१२०६, ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, ब्रम्हपूरी जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**पंचायत समिती, ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"दिनांक २.४.२००७ दि.७.५.२००७ दि.१७.५.२००७ दि. २८.६.२००७ चे माझे विनंती अर्जान्वये मागणी करण्यांत आलेल्या यादी क्रमांक एक धील अनुक्रमांक १२,१३२,१३३,१३४ चे लाभपात्र लाभार्थी वगळता (एकुण १७०-४-१६६) १६६ लाभार्थी + यादी क्रमांक दोन मधील १८ लाभार्थी एकुण १८४ लाभार्थीच्या यादीची पुनर मोक्का पंचानामा चौकशी करण्यांत आलेल्या अहवाल यादीची आणि ग्रामीण कमेटीच्या प्रत्येक्षा मोका पंचनामाच्या अहवालाची प्रमाणित प्रत मिळावी. (२) अर्जदाराचे विनंती अर्जान्वये आपले स्तरावरुन पुनर मोका पंचनामा चौकशी करण्याकरीता निपटारा करण्या करिता केलेल्या कार्यवाहीच्या नोटशीट व आर्डर शिटच्या कार्यवाहीची (संपुर्ण) प्रमाणित प्रत मिळावी."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता माहिती ही कृषि विभागाशी संबंधीत असल्यामुळे अर्ज हा दिनांक २१.७.२००७ ला कृषि विभागाकडून माहिती मागविण्यात आली. कृषि अधिकारी, पंचायत समिती, ब्रम्हपूरी यांनी दिनांक २३.७.२००७ नुसार शासकिय माहिती अधिकारी यांचेकडे माहिती सादर केली. व त्याप्रमाणे दिनांक २५.७.२००७ रोजी माहितीपोटी येणारा खर्च रुपये १०/- भरणा करण्यास अपीलकर्ता यांना सांगण्यात आले. व त्याप्रमाणे दिनांक ३१.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. परंतु, माहे ऑागष्ट, २००६ च्या पुरग्रस्त नुकसानग्रस्त क्षेत्र शेतक-यांची तयार यादीतील १७० लाभार्थ्यांच्या यादीमधील अनु क्रमांक १२०,१३२,१३३,१३४ वगळता बाकी १६६ लाभार्थी यादीची पुन्हा पुर्नचौकशी व पंचनामा (मोका) केलेल्या अहवालाची माहिती माझे परि.क्रमांक ६ मधील नमुद केलेला अनुक्रमांक १,२ व ३ चे अर्जानुसार संबंधीत अधिका-यांने त्यावर काय कारवाई केली. तसेच नियमानुसार मला केव्हा माहिती उपलब्ध व्हावयास पाहिजे होती. असे प्रथम अपीलात म्हटलेले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १९.९.२००७ ला पत्र देवून दिनांक २५.९.२००७ ला अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. अर्जदाराचे विषयांकित बाबीसंबंधाने समाधान करण्यात आले. तसेच संबंधीतांनी मागितलेली माहिती हया कार्यालयाच्या अखत्यारितील बाब नसल्याचे सिध्द झाले व त्यामुळे तहसिलदार, ब्रम्हपुरी यांचेकडे मागणी करण्यास विनंती करण्यात आली, असा प्रथम अपीलात निर्णय दिलेला दिसून येतो. तरी अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती माहिती त्यांना खोटी व दिशाभूल करणारी आहे, असे त्यांचे म्हणणे असल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मात्र, सदरची माहिती खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे याचा त्यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केला नाही. असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी हे संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती ब्रम्हपूरी असल्यामुळे त्यांच्या पंचायत समिती मधील कृषि अधिका-यांकडून माहिती उपलब्ध करुन घेवून ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच

तहसिलदार, ब्रम्हपूरी यांचेकडून सुध्दा सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.७.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही, कृषि अधिकारी, पंचायत समिती, ब्रम्हपूरी व तहसिलदार, ब्रम्हपूरी यांचेकडून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन घेवून विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दयावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९४/२००८**

**१) श्री मुकूंद किसन चौधरी,**
**हरिओमनगर, शेंडे ले आऊट, चंद्रपूर,**
**ता.जि. चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, चंद्रपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता स्ततः हजर आहेत व त्यांचे तर्फे ॲड. विजय येरणे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी, चंद्रपूर नगर पालिका, चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"श्री अशोक हासानी यांचे बिल्डींग बांधकाम सर्व्हे क्रं.३८/१ रय्यतवारी, शेंडे ले आऊट हरिओम नगर या ठिकाणी अनाधिकृत बांधकाम रोखण्याबाबत. १. श्री अशोक हासानी यांचे बिल्डींग बांधकाम चालु आहे. त्यांचा सर्वे क्रं.३८/१ रय्यतवारी, शेंडे ले आऊट, हरिओम नगर या ठिकाणी होत असलेल्या बांधकामाची मंजूरी घेतली आहे काय. घेतली असल्यास त्या मंजूरीची साक्षांकित प्रत देण्यात यावी. २. वरील सर्वे मध्ये बांधकाम चालू आहे त्या ठिकाणी वॉल कंपाऊंड किती फुटापर्यंत उंची करण्यास मंजूरी दिली आहे. दिली असल्यास त्याची साक्षांकित प्रत देण्यात यावी. ३. वरील सर्वेमध्ये बांधकाम चालू आहे. त्या वॉलकंपाऊंडच्या आतमध्ये भरण टाकल्यामुळे मधला भाग झुकलेला आहे ते दुरुस्त करण्यास मंजूरी दिली आहे काय. मंजूरी दिली असल्यास त्याची साक्षांकित प्रत देण्यात यावी. ४. वरील सर्वे मध्ये वॉलकंपाउंड झुकली

आहे त्याबाबत विचारले असता श्री अशोक हासानी यांनी सांगीतले की कंपाऊंड पल्यास कुणी जखमी झाल्यास किंवा मरण पावल्यास त्याला जबाबदार मी राहीन. मी अधिकारांना विकत घेवू शकतो असे नेहमी बोलत असतो तशी मंजूरी दिली असल्यास त्याची साक्षांकित प्रत देण्यात यावी. ५. वरील सर्वे मध्ये वॅाल कंपाऊंड रोडमध्ये असल्याचे दिसत आहे. तरी त्याच्या जागेचे मोजमाप करुन जनतेच्या वाहतुकीकरीता आणि येण्या-जाण्याकरिता रोड खुला करुन देण्यात यावा."

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१०.२००७ रोजी बांधकाम मंजूरीची प्रत व नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.११.२००७ रोजी पुन्हा मुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडेच प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याबाबत विषयांकित प्रकरणाचे अपील आपण या कार्यालयास न दाखल करता मा. आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर यांचेकडे दाखल करणे आवश्यक आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन यांचेकडे न दाखल करता राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अशोक हासानी यांचे अवैध बांधकाम असून ते पाडण्याची अपेक्षा आहे. व जनतेच्या वाहतुकीकरीता येण्या-जाण्याकरीता रोड खुला करुन देण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी तक्रार करणे आवश्यक होते. परंतु तशी तक्रार न करता ते अनेक ठिकाणी अर्ज करीत असतात व माहितीच्या अधिकारात सुध्दा त्यांची कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. त्याबाबत त्यांना कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे

सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९६/२००८**

**१) श्री यादोराव दागो वाढई,**
**रा. सावंगी(ब्राम्हणी) पों.ब्राम्हणी(सडक),**
**ता.सडक अर्जूनी, जिल्हा गोंदिया-४४१८०७ — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,**
**जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा योजना(स्वजलधारा योजना)**
**उपविभाग नवेगांव बांध, जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,**
**ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रा.पं.सावंगी,**
**पो.ब्राम्हणी, ता. सडक अर्जूनी, जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्राम पंचायत सावंगी हे गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा योजना(स्वजलधारा योजना), उपविभाग नवेगांव बांध, जिल्हा गोंदिया हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००७ रोजी श्री गुलसेरखाँ मुस्तफा पठाण/श्रीमती लिलाबाई मोहन भिवगडे, अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्राम पंचायत सावंगी, पों. ब्राम्हणी, ता.सडक अर्जूनी, जिल्हा गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"काम सुरु झाल्यापासून ते माहे जुलै, २००७ पर्यंतचे १. स्वजलधारा योजनेच्या बांधकामाचे तांत्रिक अंदाजपत्रक व वर्क ऑर्डर २. समितीचा ठरावा ३. प्रस्तावाचे ठराव ४. काम सुरु झालेल्या तारखेपासून ते माहे जुलै २००७ पर्यंतची कॅशबुकची झेरॉक्स व संपूर्ण व्हाउचरच्या

नकला ५. स्वजलधारा योजनेचे निकष नियम शर्ती व अटी. ६. ज्या जागेत योजना राबवित आहे त्या जागेचे स्वरुप व त्या जागेसंबंधी आपण केलेल्या कार्यवाहीच्या संपूर्ण नकला."
सदरची माहिती व्यक्तीशः उपस्थित राहून घेणार असे नमूद केले आहे.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी उपविभागीय अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा योजना, जिल्हा गोंदिया(स्वजलधारा योजना) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते.

४. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ४.१०.२००७ रोजी उपविभागीय अभियंता या कार्यालया अंतर्गत येत असलेल्या बाबीसंबंधी ज्यांची माहिती अधिकारी म्हणून नेमणुक केली आहे, तसेच अपीलय अधिकारी म्हणून नेमणुक केलेली आहे. आपण मागणी केलेली माहिती ही ग्राम पंचायत सावंगी यांचे अखत्यारितील असून संबधीत ग्राम पंचायतीचे माहिती अधिकारी हे ग्राम पंचायतीचे ग्रामसेवक आहे. व त्यांचे अपीलीय अधिकारी खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, सडक अर्जूनी हे आहे. तरी आपण केलेले अपील हे अपीलामध्ये मोडत नसल्यामुळे आपण कृपया संबंधीत ग्राम पंचायतचे माहिती अधिकारी यांचेकडून माहिती मागवावी व प्राप्त न झाल्यास त्यांचे अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील करावे, असे कळविलेले दिसून येते व सदरच्या पत्राची एक प्रत श्री गुलसेरखँा मुस्तफा पठाण/श्रीमती लिलाबाई मोहन भिवगडे, अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्राम पंचायत सावंगी, तसेच ग्रामसेवक, ग्रामपंचायत सावंगी व कार्यकारी अभियंता यांचेकडे दिलेली दिसून येते. सदरचे पत्र हे पोस्टाने पाठविण्यात आलेले असून त्याकरीता जावक नोंदवहीचा पुरावा दाखल केला आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते पत्र त्यांना मिळालेले नाही. परंतु जावक नोंदवही मधून जेव्हा पत्र पाठविले जाते, त्यावेळेस ते पत्र पाठविल्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती दिलेली दिसून येते. अध्यक्ष/सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्राम पंचायत सावंगी, हे जन माहिती अधिकारी नसल्यामुळे त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येणार नाही. अपीलकर्ता यांनी उपविभागीय अभियंता यांनी

कळविल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे माहिती मागणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये योग्य ते मार्गदर्शन मिळाले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत किरकोळ अर्ज/तक्रार-**

**किरकोळ अर्ज क्रं. ६/२००८**
**तक्रार क्रं.५०१/२००७**

**१) श्री रविकांत विठ्ठलराव रागीट,**
**भाग्यश्री कॅालनी, मौदा रोड, शितलवाडी,**
**रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर. अर्जदार**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विश्वविद्यालय,**
**रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर. गैरअर्जदार**

**३) जन माहिती अधिकारी,**
**कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विश्वविद्यालय,**
**रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर. गैरअर्जदार**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अर्जदार यांनी किरकोळ अर्ज क्रमांक ०६/२००८ दाखल केला होता. सदरच्या किरकोळ अर्जामध्ये (१) गैरअर्जदार श्री रविकांत विठ्ठलराव रागीट यांची तक्रार क्रमांक ५०१/२००८ मध्ये दिनांक २०.१०.२००८ रोजी आयोगाने दिलेल्या निर्णयातील किरकोळ अर्ज क्रमांक ६/२००८ चा अंतिम निर्णय होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे. पुढील सुनावणी ही दिनांक २ फेब्रुवारी, २००९ रोजी राहील. (२) श्री रविकांत विठ्ठलराव रागीट यांनी दिनांक २१.११.२००८ रोजी शुक्रवार सकाळी १०.०० वाजता विश्वविद्यालयात निरीक्षणासाठी आयोगाचा पुढील आदेश होई पर्यंत हजर राहण्याची आवश्यकता नाही, असे आदेश दिलेले होते. त्यावर दिनांक १२.११.२००८ रोजी श्री रविकांत विठ्ठलराव रागीट यांनी आयोगाकडे किरकोळ अर्ज क्रमांक ६/२००८ च्या संदर्भात स्वतःची बाजू मांडण्याकरीता परवानगी मागितली होती. व त्याप्रमाणे त्यांना परवानगी दिली आहे.

२. तक्रारदार यांची मुळ तक्रार क्रमांक ५०१/२००८ व ५०२/२००८ मध्ये जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळवून २० दिवसांचे आंत संबंधीत अभिलेखे, नस्तींची पाहाणी करुन माहिती उपलब्ध असल्यास माहितीच्या छायांकित प्रती

विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात व पोच द्यावी, असे आदेश दिनांक २०.१०.२००८ रोजी देण्यात आले होते. व त्या आदेशाच्या संदर्भात किरकोळ अर्ज क्रमांक ६/२००८ हा दाखल झालेला होता.

३. आज सदरच्या तक्रारीची व किरकोळ अर्जाची सुनावणी होत आहे. अर्जदार हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले. तक्रारदार यांनी विश्वविद्यालयाच्या व्यवस्थापन परिषदेने नागपूर व रामटेक येथील कार्यालयामध्ये प्रवेश बंदी करण्यात आलेली असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन घेण्यास तक्रारदार हे विश्वविद्यालयाच्या कार्यालयामध्ये उपस्थित राहू शकत नाही. परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे विश्वविद्यालयाचे वकील व माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती विश्वविद्यालयाच्या कार्यालयाच्या बाहेर उपलब्ध करुन देता येईल, असे आयोगास सांगितले व त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जे महाविद्यालये आहे, त्या महाविद्यालयाची यादी तक्रारदार यांना द्यावी व त्यातून तक्रारदार यांनी ज्या महाविद्यालयाची माहिती हवी असेल त्याची यादी देवून माहिती उपलब्ध करुन घेणे हे संयुक्तिक राहील. त्याकरीता आयोगाचे कार्यालयात जन माहिती अधिकारी हे माहितीचे अभिलेखे किंवा नस्ती आणून तक्रारदार यांना पाहाणीस उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. त्याप्रमाणे तक्रारदार व जन माहिती अधिकारी यांनी तशा प्रकारचा कार्यक्रम तयार करुन नस्ती हया तक्रारदार यांच्या पाहाणीस उपलब्ध करुन द्याव्यात. व तक्रारदार यांनी अभिलेख्यांची पाहाणी करुन आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०१/२००७**
**अपील क्रमांक १०२/२००७**

**१) श्री डॉ. वसंत ऋषी मसराम,**
**गांधी वार्ड, बल्लारपूर, ता. बल्लारपूर,**
**जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**आदिवासी विकास आयुक्तालय,**
**नाशिक. — उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त,**
**आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००८ (२०.२.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपील क्रमांक १०१/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून आदिवासी आयुक्त, आयुक्तालय, नाशिक यांचेकडे केंद्रिय अनुदान स्वयंसेवी संस्थेला मिळण्यासंबंधी पाठवावयाच्या प्रस्तावाची माहिती मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी सत्र २००५-०६, २००६-०७ व २००७-०८, एकुण चार मुद्यांत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या ५९ प्रतीसाठी रुपये ११८/- व पोस्टेज खर्च रुपये १००/- असे एकुण रुपये २१८/- चा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्च रुपये २१८/- चा भरणा केलेला नसल्यामुळे त्यांना पुन्हा दिनांक १३.११.२००७ रोजी स्मरणपत्र पाठविलेले दिसून येते.

मात्र, त्यानंतर  अपीलकर्ता यांनी रुपये २१८/- चा डी.डी. दिनांक २६.१०.२००७ रोजी लेखा अधिकारी आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचे नांवाने पाठविल्याचे सहाय्यक माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु, शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांनी अर्जदार यांना पाठविला डी.डी. या कार्यालयास प्राप्त झाला नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कळविल्यापासून रुपये २१८/- रक्कम रोखीने किंवा डी.डी.द्वारे  जमा करावी व ती रक्कम प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी दिला आहे. त्या निर्णयाच्या विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे अपील मेमो दाखल करताना डी.डी. ची झेरॅाक्स प्रत दाखल केली आहे. मात्र, शासकिय माहिती अधिकारी यांना अपीलाचा सर्व पत्रव्यवहार मिळतो व डी.डी.मिळत नाही किंवा डी.डी. हा रजिस्टर पोस्टोन पाठविलेला असल्यास त्याबध्दलची पोच मात्र अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही. व त्यामुळे तसेच आज अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्यांनी खरोखरच डी.डी. पाठविला किंवा नाही हे निश्चित गृहित धरता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी रुपये २१८/- रोखीने किंवा मनीऑर्डरने भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १०२/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून आयुक्त आदिवासी विकास आयुक्तालय यांचेकडे केंद्रिय व राज्य शासनातर्फे आदिवासींच्या सर्वांगिन विकास योजनेवर आदिवासी समाजातील सुशीक्षित पदवीधर लोकांची वा आदिवासी स्वयंसेवी संस्थेच्या पदाधिका-यांची नियुक्ती करणेबाबत सत्र २००५-०६ ही माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १६.९.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय यांनी

आपले उक्त संदर्भिय अर्जान्वये मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने सदर माहिती अधिनियमाच्या तरतुदी नुसार पुरविणे अभिप्रेत नाही, याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केल असता जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर संयुक्तिक आहे व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे दोनही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १११/२००८**

**१) श्री धिरज दत्तात्रय धार्मिक**
**प्लॉट नं.२८३, नंदनवन ले ऑउट,**
**नागपूर-४४०००९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मौंट रोड, सदर नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्रं.१,**
**तेलंगखेडी, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे त्यांचे वडील श्री दत्तात्रय धार्मिक हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभागीय कार्यालय, तेलंगखेडी नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

"महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. १९.१.१९७७ रोजीच्या पहिल्या बैठकीतील ठराव क्रं.१ (२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आदेश क्रं.संकीर्ण/का.बा./५६४/आ.१ दि.२१.७.२००३ (३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे आदेश क्रं.इएसटी/२०००/प्र.क्रं.२५/आ७ दि. २६.२.२००४ (४) समक्रमांकाचे आदेश दि. ३०.१.२००६ (५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे समक्रमांकाचे पत्र दि. ६.२.२००७ (६) महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबईयांचे पत्र क्रं.३७४(१)एक(१)/१९९९/चौदा दि. २४.५.२००७ (७) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे प९१ क्रं.३७४(१)१(१)१९९९/चौदा दि. ११.५.२००१ (८) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्व.विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रं.इएसटी

२००७/प्र.क्र.२२/पापु-२४, दि. १.६.२००७" सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक २०.११.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी कार्याकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्रं.१, नागपूर यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी आपणास कळविण्यात येते की, अनुक्रमांक १ ते ८ च्या पत्रांच्या प्रती कार्यालयात उपलब्ध नसेल तर संबंधीत कार्यालयाकडून प्राप्त करुन घेवून या कार्यालयास त्वरीत सादर कराव्यात. या प्रकरणात विलंब होणार नाही याची दक्षता घेवून त्वरीत कार्यवाही करावी व सदरच्या पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.९.२००७ च्या अर्जापमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा मान्य केलेली आहे. व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशा नंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व ते अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे दोषी आढळून येतात. व त्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी

हे दाषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ११२/२००८**

**१) श्री सुप्रहर जगन्नाथ रामटेके,**
**मु.पो. नान्होरी, ता. ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००७रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अर्जदार दारिद्रय रेषेखाली आहे यापुढे होय असे दिलेले आहे.

"सरकारी स्वस्त दुकान नं.२५ मौजा नान्होरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर री एस.एल. नंदागवळी हे विक्री करीत असलेल्या धान्यांची विक्री रजिस्ट्ररची प्रमाणित प्रत देण्याबाबत. कालावधी १ जानेवारी २००७ ते ३१ मार्च, २००७ पर्यंत. विक्री रजिस्टरच्या प्रती. अंतोदयची प्रमाणित केलेली यादी. मार्च २००६ मध्ये विक्री रजिस्टरवर असलेले क्रं. ७७२,९५०,१०१४ ची नांवे सांगा. २५ तारखेला दुकानात माल आल्यास ते धानय उचलण्याचा कालावधी काय."

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना एकुण ४ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदरची माहिती चुकीची आहे या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १८.१२.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी यांनी तहसिलदार, ब्रम्हपुरी यांना

उपरोक्त विषयांकित प्राप्त तक्रारीनुसार चौकशी करुन आपला अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करावा असे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २९.१२.२००७ रोजी निरीक्षण अधिकारी यांनी तहसिलदार यांना माहिती तयार करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. आज अपीलकर्ता गैरहजर आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये दिनांक १४.१२.२००७ ची चुकीची माहिती लक्षात आणून देवूनही कार्यवाही न केल्यामुळे सरकारी स्वस्त धान्य दुकान २५ श्री एस.एल. नंदागवळी यांनी केलेला शासनाशी गैरव्यवहार, अशा प्रकारचे कारण दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु, त्यांच्या मताप्रमाणे गैरव्यवहार झालेला असल्यामुळे कार्यवाही करणे आवश्यक आहे, अशी त्यांची मागणी दिसून येते. परंतु, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणातील कार्यवाही अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांना गैरव्यवहाराच्या संदर्भात कार्यवाहीची अपेक्षा असल्यामुळे त्यांनी स्वतंत्रपणे सक्षम अधिका-यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहील. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.११.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

March,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ११०/२००७**

**१) श्री अजय कृष्णराव पराते,**
**२२०, लक्ष्मीनगर, नागपूर -२२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**सवोत्कर्ष शिक्षण संस्था (श्री जगजीवनराम हायस्कुल),**
**आदिशक्ती, २०९, तिरंगाचौक, नंदनवन ले आऊट,**
**नागपूर- ४४०००९. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**श्री जगजीवनराम हायस्कुल, घटाटे नगर,**
**पुनापूर रोड, पारडी, नागपूर-८. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री जगजीवनराम हायस्कुल घटाटे नगर, नागपूर यांचेकडे सन १९८८ ते २००७ या कालावधीतील पुढीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) श्री किशोर कृष्णराव इंगळे हे आपल्या शाळेचे/संस्थेचे पदाधिकारी आहेत काय. असल्यास कोणत्या वर्षापासून आहेत व कोणत्या कोणत्या पदावर होते/आहेत यांची माहिती द्यावी.

(२) श्री किशोर इंगळे हे आपल्या शाळेच्या शाळा समितीवर आहेत काय. जर आहेत तर कोणत्या वर्षापासून आहेत/होते यांची माहिती द्यावी.

(३) शाळेतील सद्या कार्यरत मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची माहिती द्यावी. माहितीत त्यांचे पुर्ण नांव, पदनाम, नियुक्ती दिनांक, जन्मतारीख, शैक्षणिक

अर्हता, शिक्षण खात्याने दिलेल्या मान्यता आदेशाचा क्रमांक व दिनांक आणि संबंधित कर्मचारी यांच्या निवासाचा पुर्ण पत्ता(सथानिय) हे सुध्दा द्यावे.

(४) शाळेच्या शाळा समिती पदाधिकारी व सदस्य यांची सत्र २००३र्०४ ते २००७-०८ वर्षातील पुर्ण नांव व पदनाम सह यादी द्यावी.

(५) सत्र २००३-०४ ते २००७-०८ या वर्षात शाळा समितीने घेतलेल्या प्रत्येक सभांच्या व कार्यवत्तांच्या छायांकित प्रती द्याव्यात.

(६) सत्र २००३-०४ ते २००७-०८ या वर्षातील शाळेत कार्यरत पालक समिती सदस्यांची नांवे, त्यांचे पदनाम व पत्र व्यवहाराच्या निवासी पत्यासह यादी द्यावी.

(७) पालक समितीच्या सत्र २००३-०४ ते २००७-०८ मधील प्रत्येक सभांच्या कार्यवृत्तांच्या छायांकित प्रती द्याव्यात.

(८) शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कमचा-यांची सत्र २००३-०४ ते २००७-०८ वर्षातील स्वतंत्र सेवाजेष्ठता यादीची छायांकित प्रती द्याव्यात.

(९) सवोत्कर्ष शिक्षण संस्थेच्या विद्यमान कार्यकारीणी समितीची यादी द्यावी तसेच प्रत्येक पदाधिका-यांचे व सदस्यांचे निवासी पत्ते द्यावेत. तसेच त्यांच्या पदांची सुध्दा माहिती द्यावी.

(१०) सत्र २००३-०४ ते २००६-०७ वर्षात वर्ग १० वी च्या शालान्त परीक्षेला एकुण किती विद्यार्थी बसले. पैकी किती अनुत्तीर्ण झाले. याबाबत प्रत्येक विषयावर निकालाची टक्केवारी माहिती तो विषय शिकविणा-या शिक्षकाच्या नांवासह द्यावी.

(११) सत्र २००३-०४ ते २००७-०८ मधील शिक्षकांची ते शिकवित असलेल्या वर्गाच्या माहितीसह वर्ग निकाय यादी द्यावी.

(१२) शैक्षणिक सत्र २००३-०४ ते २००७-०८ मधील वर्ग ५ ते १० वी साठी शाळेनी तयार केलेले वेळापत्रक आणि वरील वर्षातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या स्वाक्षरी असलेल्या हजेरी पुस्तकातील प्रत्येक पृष्ठांची छायांकित प्रती द्याव्यात.

(१३) शाळेत शिक्षण घेणा-या वर्ग ५ ते १० मधील विद्यार्थ्याच्या सत्र २००३-०४ ते २००७-०८ वर्षातील वर्ग निहाय याद्या द्याव्यात व त्याचप्रमाणे स९ा २००३-०४ ते २००६-०७ मध्ये वर्ष निहाय

परिक्षेला बसलेले एकुण विद्यार्थी, त्यापैकी उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण व अनुपस्थित किती याची माहिती त्या प्रत्येक वर्गाच्या वर्ग शिक्षकाच्या नांवासह देण्यात यावी.

(१४) जगजीवन राम हायस्कुल कोणत्या अवधिपर्यंत चांभार नाला, कमाल चौक, नागपूर विभागात भरत होती. कोणत्या तारखेला इमारत घर मालकाचे सुपूर्त करण्यात आली. केव्हा पासून ही शाळा नवीन जागेत स्थानांतरीत करण्यात आली. स्थलांतराला शिक्षण विभागाची परवानगी घेण्यात आली आहे काय. तसेच मागील ४ वर्षात किती ठिकाणी शाळा स्थलांतरीत करण्यात आली. ही माहिती द्यावी व स्थलांतराकरीता शिक्षण खात्याच्या परवानगी आदेशाची प्रत द्यावी.

(१५) नवीन इमारतीत किती खोल्या आहेत. प्रत्येक खोलीचे खेत्रफळ किती. त्याचा तपशिल व नकाशाची प्रत द्यावी. सध्या शाळा भरत असलेल्या इमारतीचे घरमालक व त्यांचा पत्ता द्यावा. इमारतीचे भाडे किती ठरले आहे. बांधकाम विभागाकडून भाडे प्रमाणपत्र किती रुपयांचे मिळाले आहे याचा तपशिल छायांकित प्रतीसह द्यावा.

(१६) आपल्या शाळेला शिक्षण विभागाने सन १९९५ ते २००७ या काळात शाळेची मान्यता काढण्या संदर्भात कारणे दाखवा नोटीस दिली होती का. दिली असल्यास त्याची प्रत व त्यावर आपल्या शाळेनी/संस्थेनी दिलेल्या उत्तराची प्रत देण्यात यावी.

(१७) आपल्या शाळेच्या मागील १० वर्षाच्या Assessment memo च्या प्रती देण्यात याव्या. तसेच वरील शाळेवर शासनाची कोणतीही वसुली असल्यास त्याची प्रत देण्यात यावी.

(१८) श्री ना.गो.गाणार आपल्या शाळेत कधीपासून कार्यरत आहेत. त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता संबंधीत कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात याव्या.

(१९) श्री ना.गो. गाणार शिक्षक हे आपल्या शाळेत कार्यरत असतांना त्यांनी शिक्षण शाखे व्यतिरिक्त इतर शाखेची कोणतीही पदवी प्राप्त केली आहे काय. केली असल्यास पदवी प्राप्त केल्याचे वर्ष तसेच त्यांना या शिक्षणाकरीता संबंधीत महाविद्यालय जॉईन करण्याकरीता व परीक्षेत बसण्याकरीता संस्थेने/शाळेने परवानगी दिली होती काय. दिली असल्यास संस्थेच्या ठरावाची/आदेशाची प्रत द्यावी.

(२०) आपल्या शाळेतील शिक्षक श्री ना.गो.गाणार हे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद या संघटनेत अधिकृत पदाधिकारी आहेत काय. असल्यास याबाबतीत शाळेत/संस्थेकडे उपलब्ध असलेल्या इतर दस्ताऐवजाची प्रती देण्यात यावी. सन १९९५ पासून त्यांना शिक्षण विभागाच्या बैठकीला वेळोवेळी जाण्याची परवानगी शाळेने किंवा संस्थेने दिली आहे काय. तसेच बैठकीला जाण्यासाठी शाळेच्या हलचल रजिस्टरमध्ये त्यांची नोंद करण्यात आली आहे काय. याची माहिती द्यावी. तसेच त्यांना शाळेने शिक्षण विभागाच्या मिटींगसाठी (शाळेच्या कामकाजाच्या वेळेस) रिलिव्ह केले असल्यास त्या दस्ताऐवजाची प्रती देण्यात यावी.

(२१) श्री ना.गो.गाणार हे माहे नोव्हेंबर १९९९ मध्ये खाजगी धंदा करीत होते काय. हे खरे असल्यास त्याची माहिती व त्यांनी सदर बाब शाळेला कळविलेली असल्यास त्याची माहिती द्यावी.

(२२) शाळा किती शिफ्टमध्ये भरविल्या जाते व शाळेच्या वेळेची माहिती तसेच कोणते वर्ग कोणत्या शिफ्ट मध्ये भरविल्या जाते याची माहिती द्यावी.

(२३) शाळे विरुध्द व संस्थेविरुध्द कोणकोणत्या न्यायालयात किती कोर्ट केसेस चालू आहेत त्याचा खुलासेवार तपशिल द्यावा."

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.९.२००७ रोजी मुख्याध्यापक यांनी आवश्यक ती सर्व माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. परंतु आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा सुस्पष्ट बोध होत नाही. आपण शनिवारी दिनांक ६.१०.२००७ ला दुपारी ११ ते १२ या वेळेत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून दस्तऐवजाचे निरीक्षण करावे. तसेच पाहिजे असलेल्या दस्तऐवजाची माहिती द्यावी. त्यानंतर आपणास लागणा-या खर्चाची माहिती देण्यात येईल. तसेच खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर आपणास दस्तऐवजाच्या प्रती देण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते.

त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००७ रोजी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती सुस्पष्ट असून टाईप केलेली आहे. मुद्या क्रमांक १ ते २३ पर्यंत मागितलेली माहिती स्वयंस्पष्ट असून संगणिकृत टाईप केलेली आहे. मुख्याध्यापक शाळेचे मुख्याध्यापक असून

आपणास सुस्पष्ट बोध होत नाही असे नमूद करुन जाणिवपुर्वक माहिती देण्याचे टाळलेले आहे. अर्जदाराला आपल्या कार्यालयात येण्याचे काहीही प्रयोजन नाही व तशी मागणी सुध्दा करण्यात आलेली नाही. मागणी केलेल्या रेकार्डच्या छायांकित करण्यासाठी किती रुपये खर्च आहे ही मागणी करुन माहितीच्या अधिकारात मागणी केलेली माहिती नियोजित मुदतीत देणे कायद्याने बंधनकारक आहे. तरी आपणास आपल्या संस्थेच्या पदाधिकारी यांची नांवे व माहिती तसेच शिक्षकांची सुध्दा नांवे व माहिती नसल्यास ही दुदैवाची बाब आहे. जर आपल्या कथनानुसार सर्व माहिती शाळेत उपलब्ध आहे तर ती पाठविण्यास कोणती हरकत आहे हेही नमूद केले नाही. व त्यानंतर माहिती उपलब्ध न झाल्यास अपील करण्यात येईल असे रजिस्टर पोस्टाने कळविण्यात आलेले दिसून येते.

त्यावर दिनांक १५.१०.२००७ रोजी पुन्हा मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भाध्ये माहिती जूनी व विस्तृत स्वरुपाची दीर्घ कालावधीतील असल्यामुळे प्रत्येक्ष उपस्थित राहाण्यास कळविले होते. परंतु आपण शाळेला त्रास देण्याचे उद्येशाने माहिती मागविलेली असल्यामुळे अर्ज फेटाळण्यापुर्वी वरील बाबतीत आपणास आपली बाजू मांडण्यास संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आपण १५ दिवसांचे आंत उपस्थित राहाण्यासाठी दिनांक व वेळ कळवून निर्धारित दिनांकास उपस्थित राहावे, अन्यथा एकतर्फी निर्णय घेवून प्रकरण निकाली काढण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते.

त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००७ रोजी प्रथम अपील हे माहिती अधिकारी सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्था (जगजीवनराम हायस्कुल) यांचेकडे दाखल केलेली दिसून येते. परंतु, प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १४.१.२००८ रोजी दिनांक २४.१.२००८ रोजी उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते.

त्यावर दिनांक २२.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्याचे दिनांक २७.९.२००७ चे पत्रात कळविलेले आहे. सुनावणी ठेवल्यावर विनाकारण माहिती मिळण्यासाठी विलंब होत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ८(१)(छ)(घ) व (त्र) येथे लागू होत नाही. माहिती नाकारण्याच्या प्रयोजनार्थ या अधिनियमाचा चुकीचा अर्थ लावलेला आहे. मागितलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असेल तर व

त्यांची वैयक्तिक स्वरुपाची असेल तर जन माहिती अधिकारी यांनी कायद्याचे कलम ११ प्रमाणे कार्यवाही केलेली नाही. व त्याप्रमाणे कोणताही नोटीस काढल्याचा उल्लेख नाही. व यावरुन निराधारपणे मागितलेल्या माहितीची मागणी मान्य करता येत नाही असे नमूद करणे बेकायदा व जाणुनबुजून माहिती देण्याचे टाळलेले आहे. तरी माझ्या या निवेदनाच्या अपीलात मांडलेल्या सर्व मुद्यांचा साकल्याने विचार करुन नियम २(ज)(दोन) मधील तरतुदी नुसार माहिती देण्यात यावी, ही विनंती. त्यावर अपीलकर्ता यांचा कोणत्याही प्रकारचा निर्णय दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन न देता माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे व त्याकरीता विविध प्रकारची कारणे दिलेले आहे असे अपीलकर्ता यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. वास्तविक, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना आयोगानी दिनांक १३.२.२००९ रोजी नोटीस काढलेली आहे. जन माहिती अधिकारी हे नागपुरामध्ये राहात असल्यामुळे आतापर्यंत अपीलकर्ता यांना जशी नोटीस मिळाली तशी त्यांना पण नोटीस उपलब्ध झाली असावी असे गृहित धरावे लागते. परंतु आयोगाच्या पुढे अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी किंवा संस्थेचे पदाधिकारी हे हजर झालेले नाही हा आयोगाचा अवमान आहे. व त्यामुळेही अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक झाले आहे. परंतु आज जन माहिती अधिकारी हे वर नमूद केल्याप्रमाणे हजर नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) च्या परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांच्या विरुध्द शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा मागविणे आवश्यक राहील. तसेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे तसेच प्रथम अपीलाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आंत आयोगाकडे करावा अन्यथा शास्ती ही रुपये २५,०००/- कायम करण्यात येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ५.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ११६/२००७**

**१) श्री मधुकर पांडुरंग ब्राम्हणकर,**
**संजयनगर वार्ड क्रं.१, चिचगड रोड,**
**देवरी, ता. देवरी, जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**दुर्गा शिक्षण संस्था, कुंभारटोली (आमगांव)**
**ता. आमगांव, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**सुभाष हायस्कुल डोंगरगांव (सावली),**
**ता. देवरी, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे शालांत परीक्षा असल्यामुळे अनुपस्थित आहे. त्यांचे प्रतिनिधी हजर आहे. संस्थेचे प्रतिनिधी हजर आहेत. त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००७ रोजी (१०.८.२००७ रोजी) प्रभारी मुख्याध्यापक यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) दि. १.५.२००५ ला शाळा समितीने घेतलेल्या ठरावाची इतिवृत्त नोंदवहीची साक्षांकित सत्यप्रत. (२) दुर्गा शिक्षण संस्थेच्या कार्यकारीणीने दि. ६.५.२००७ रोजी रविवारला घेतलेल्या ठराव क्रं.१,२ (अ) (ब) (क) तसेच त्याच सभेत घेतलेल्या ठरावाच्या इतिवृत्त नोंदवहीची साक्षांकित सत्यप्रत. (३) संस्थेच्या दि. १८.७.२००४ व दि. १५.१२.२००४ च्या सभेच्या इतिवृत्त नोंदवहीची सत्यप्रत." सदरची माहिती व्यक्तीशः आवश्यक आहे असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.८.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती ही

अपीलकर्ता यांना दिनांक ३०.८.२००७ रोजी उपलब्ध झाल्याची नोंद आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी प्रथम अपील हे संस्थेचे सचिव श्री बीसेन यांचेकडे दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १९.९.२००७ रोजी प्रभारी मुख्याध्यापक यांनी आपण मागीतलेली माहिती ही संस्थेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी आपणास माहिती दिलेली नाही त्यामुळे दिलेले अपील नामंजूर करण्यात येत असून अपील निकाली काढण्यात येत आहे, असा संस्थेचे सचिव यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता गैरहाजर आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माहिती अधिकारी यांच्या अधिकारातील तसेच संस्थेच्या अधिकारातील दोनही प्रकारची माहिती त्यांनी एकाच अर्जात मागितलेली दिसून येते. शाळा समितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे माहिती देवू शकतात. परंतु शिक्षण संस्थेच्या कार्यकारीणीने घेतलेला ठराव हा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक उपलब्ध करुन देवू शकत नाही व त्यामुळे त्यांना दिलेले उत्तर हे योग्य आहे. अपीलकर्ता यांनी शिक्षण संस्था ही स्वतंत्र प्राधिकरण असल्यामुळे त्यांचेकडे स्वतंत्रपणे माहिती मागणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ११५/२००८**

**१) श्री पुंडलीक आडकूजी सिडाम,**
**शिवाजी वार्ड नं.२८/६४३, बल्लारपूर,**
**ता. बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक**
**वाहतुक विपणन विभाग, बल्लारशा,**
**ता. बल्लारशहा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी,**
**वाहतुक व विपनन विभाग, बल्लारशा,**
**ता. बल्लारशा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००७ रोजी पाच रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प लावून टिंबर लाकुड लॅाट व इतर संबंधी माहिती ही शासकिय माहिती अधिकारी, C.F.T.& M. बल्लारशा यांचेकडे मागितलेली दिसून येते. परंतु अर्जासोबत कोणताही तपशिल जोडलेला नाही. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दिनांक ७.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात मात्र जोडपत्रात माहिती मागितली आहे. परंतु, आयोगाकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलासोबत जोडपत्र दाखल केले नाही. व तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. परंतु व्दितीय अपील सोबत मात्र जोडपत्रात मागितलेल्या माहितीचे विवरण दिलेले नाही. व तरीही माहिती उपलब्ध

झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. परंतु, द्वितीय अपीलासोबत मात्र जोडपत्रात मागितलेल्या माहितीचे विवरण दिले आहे.

अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे गेले होते याबध्दलचा पुरावा दाखल केला नाही किंवा जन माहिती अधिकारी यांनी व्यक्तीशः माहिती घेण्यासाठी गेलो असता माहिती दिली नाही याबध्दलचा सुध्दा लेखी पुरावा आयोगाकडे दाखल केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना वनसंरक्षक वाहतुक व विपणन बल्लारशा यांचे कार्यालयाकडे दिनांक ३.११.२००७ ला पाठविला असा खुलासा केलेला आहे. तसेच दिनांक ३.११.२००७ रोजी वनसंरक्षक वाहतुक व विपणन बल्लारशा यांनी प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी यांना अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती या कार्यालयास पाठवावी असे कळविलेले दिसून येते. तसेच अर्जातील मुद्या क्रं. १ ते ७ मधील संपुर्ण माहिती ही मुख्य वनसंरक्षक वाहतुक व विपणन बल्लारशा या वरिष्ठ कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी कार्यवाही करुन उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये अर्जाची झेरॉक्स प्रत त्यांच्या कार्यालयास सादर करावी. अर्जातील माहिती या कार्यालयास पाठविण्यास विनंती करण्यात आली. त्यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये ७ मुद्यांपैकी मुद्या क्रमांक ६ ची माहिती या कार्यालयास पाठविली. प्राप्त झालेली मुद्या क्रमांक ६ ची माहिती उपरोक्त संदर्भीय पत्र क्रमांक ४ अन्वये अर्जदाराकडे व्यक्तीशः पाठविली. परंतु, माहिती अपूरी असल्यामुळे त्यांनी ती घेण्यास नकार दिला. त्यानंतर उपरोक्त संदर्भीय पत्र क्रमांक ५ ते ९ अन्वये वाहतुक व विपणन बल्लारशा यांचे कार्यालयाशी सतत पाठपुरावा करुन माहिती या कार्यालयास पाठविण्यासाठी वारंवार विनंती केली. त्याप्रमाणे दिनांक ३.३.०९ ला माहिती या कार्यालयास पाठविली. त्यानंतर सदरच्या माहितीकरीता झेरॉक्स खर्च रुपये १८/- शासन जमा करुन माहिती घवून जाण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्र क्रमांक ११ अन्वये अर्जदारास कळविण्यात आले. सदर पत्र अर्जदाराकडे व्यक्तीशः दिनांक ३.३.०७ ला पाठविण्यात आले. मात्र अर्जदाराने सदर पत्र स्विकारण्यास नकार दिला(माहिती आयोगाकडे अपील केल्यामुळे) त्यामुळे अर्जदारास माहिती पुरविण्यात आली नाही हा सत्य खुलासा आहे,

असा खुलासा केलेला आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक, वाहतुक व विपणन बल्लारशा यांनी सुध्दा आयोगाकडे खुलासा केला आहे.

"खालील स्वाक्षरीकर्ता नम्रपणे खुलासा सादर करतो की,

१) अपीलार्थी श्री पुंडलीक अडकुजी सिडाम, रा. शिवाजी वार्ड, बल्हारशाह यांनी दि. २.११.२००७ ला अपील मध्ये नमुद केलेल्या माहिती करीता माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज सादर न करता प्रथम अपीली अधिकारी यांचेकडे व त्यांचे नांवाने सादर केला होता. म्हणून प्रथम अपीली अधिकारी त्याच दिवशी सदर अर्ज माहिती अधिकारी यांचेकडे पाठविले. त्यानंतर दि. ३.११.२००७ रोजी प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी व माहिती अधिकारी यांनी सदर माहिती पूरविण्याकरीता लागत असलेली माहिती प्रथम अपीली अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असल्याने सदर माहिती त्यांचे कार्यालयातून पाठविण्याकरीता पत्र पाठविले होते. त्यानुषंगाने दि. १४.११.२००७ रोजी सदरील मागणी केलेली माहिती मधील मुद्या क्रमांक ६ ला उत्तर पाठविण्यात आले होते. उर्वरीत मुद्ये लिलाव संबंधी असल्याने व लिलावाचे काम सुरु असल्याने सदर माहितीचे कागदपत्र वारंवार प्रथम अपीली अधिकारी यांचे कामात येत असल्याने सदर माहिती माहिती अधिकारी यांना पूरविण्यात आलेले नव्हते. त्यानंतर यावेळेस असे नमूद करण्यात येत आहे की, अपीलार्थी यांनी माहितीकरीता नुसता अर्जच सादर न करुन त्यांनी त्यांचे निकट मि९ा व प९ाकार यांचे माध्यमाने दुरध्वनीवरुन प्रथम अपीली अधिकारी यांचेकडे वारंवार संपर्क साधुन त्यांना लाकूड प्रत्येक लिलावात सवस्त दरात पुरविण्यात यावे असे केल्यास मागितलेली माहितीचा अर्ज मागे धेण्याकरीता समजविण्याचा प्रयत्न करु व सदर फोन करणारेमित्र असेही सांगत होते की, अर्जदार यांनी त्यांचे मुलीचे नोकरी करीता डब्ल्यू.सी.एल. मध्ये रु. २५००० दिले होते. सदर पैसे त्यांना परत मिळाले नाही व नोकरी सुध्दा न मिळाल्यामुळे त्यांना पैशाची अत्यंत गरज आहे. ते पैसे आम्ही त्याला देवु आणि तुम्ही आम्हाला प्रसतावित दरातच लाकडाचा पुरवठा करा. अशा प्रकारच्या दुरध्वनीवरुन मागणी ऐकुण त्यांना वाटल की, सदर अर्ज माहितीसाठी नसुन निम्नस्वाक्षरीकर्ता यांचेवर दबाव आणून त्यांचेकडून स्वस्त दरात लाकूड मिळविण्याचे प्रयत्न आहे असे सकृत दर्शनी दिसून आले. म्हणून सदरील अपीलमध्ये निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी लिलावासंबंधी कुठलाही उत्तर अपीलार्थीला न देता त्यांचे

वर्तणुक पाहत होते व त्यांचेवर पोलीस मध्ये अर्ज देण्याचे ठरविले होते. परंतु सदर रिपोर्ट दिल्याने शासकिय कामकाजामध्ये बाधा येईल या हेतुने त्यांचेविरुध्द रिपोर्ट दिलेली नाही.

२) वर सांगितल्याप्रमाणे अपीलार्थी यांना दि. १७.११.२००७ रोजी मुद्या क्रमांक ६ ची माहिती त्यांचे आग्रहास्तव खासदुतामार्फत पूरविण्यात आलेली होती. परंतु अपीलार्थी यांनी माहितीचा लिफापा पोच देण्यापुर्वीच फाडून पाहिला व माहिती अपूरी आहे म्हणून घेण्यास नकार देवून त्याच दुतामार्फत परत पाठविली. ती माहिती नत्थी करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे त्यांचे संबंधीतांनी खालील स्वाक्षरीकर्त्यांना आपण आमच्याकडे एक कप चहाला आले तरी सदर प्रकरण निपटवून टाकू असे नेहमी बोलत होते, परंतु अपीलीय अधिकारी सदरील आव्हान संशयास्पद वाटल्याने एकंदरीत संपूर्ण प्रकरणत फसवेगिरीचे असल्याचे समजून अर्जदारास किंवा त्यांचे संबंधितास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही व माहिती सुध्दा पुरविलेली नाही.

३) वरील नमुद केलेले सत्यकथनाशिवाय असेही नमुद करावयाचे आहे की, अपीलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती एका चोकशी संबंधात दिनांक ३०.९.२००८ रोजी पुरविण्यात येवून त्याची पोच घवून नत्थी करण्यात आलेली आहे.

४) यास्तव नम्र विनंती आहे की, अपीलार्थी यांना माहिती न पुरविण्याचे कारण काहीही नसुन फक्त वर नमुद केल्याप्रमाणे आहे. तरीपण विद्यमान आयोगासमोर निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी माहिती पुरविल्याबध्दलची क्षमा मागण्यात येत आहे. आणि सदर अपील खारीज करण्यासाठी प्रार्थना करण्यात येत आहे."

वरील दोनही खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला होता. परंतु माहिती अपूर्ण आहे या कारणास्तव अपीलकर्ता यांनी माहिती घेण्यास नकार दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशावरुन असे दिसून येते की, त्यांचेकडे माहिती उपलब्ध नव्हती व ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध होती त्या त्या ठिकाणी त्यांनी पत्रवयवहार केलेला दिसून येतो. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे, असे दिसून येत नाही.

असे असले तरी, अपीलकर्ता यांनी मागितलेली (मुद्यनिहाय)माहिती ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.११.२००७ च्या अर्जाप्रमाणे विनामुल्य व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः वनसंरक्ष, वाहतुक व विपणन विभाग, बल्लारशा यांचेकडे हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य वन संरक्षक (संरक्षण), म.रा. नागपूर, 'वनभवन' सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे माहितीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १२३/२००८**

**१) श्री विजय जगन्नाथजी भूरे,**
**मु.पो. एकोडी, ता. साकोली,**
**जिल्हा भंडारा-४४१८१३. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,**
**वनविभाग, भंडारा, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**उपवनसंरक्षक कार्यालय, वनविभाग, भंडारा,**
**ता.जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.२.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी उपवनसंरक्षक कार्यालय, भंडारा यांचेकडे एकुण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) सन २००० या सत्रात कार्यरत असणारे व सध्या कार्यरत असणारे उपवनसंरक्षक हयांचे पूर्ण नांव पत्ता

(२) सन २००० सत्रात आरागीरणी स्थानांतरण करतांना वृत्तपत्रात जाहिरात दिली काय त्याचे कात्रण, जाहिरात दिली नसल्यास झालेले स्थानांतरण वन अधिनियमानुसार बरोबर आहे काय.

(३) आपले आदेशानुसार आरागीरणी स्थांनातरीत करतांना गट न बदलावयास नको असे असतांना ८४२/१०.०३ मधून ८४२/२ मध्ये नेण्यात आली. तेव्हा अटीचा भंग झाला हयास जबाबदार कोण व काय कार्यवाही झाली. निश्चित ८४२/१०.०३ व ८४२/२०.१० हयांचे सिमांकन करण्यात आले होते काय सातबारा नुसार नांवे असणा-यांची संमती घतली काय

(४) फाऊंडेशन खराब झाले त्या संबंधाने तांत्रिक विभागाची परवानगी घेण्यात आली काय असल्यास प्रमाणपत्राची सत्यप्रत.

(५) मुंबई ग्रा.पं.अधिनियम १९५८ चे कलम १२४ नुसार आपण भोगवटदाराकडून टॅक्स घेतो जो टॅक्स भरतो तो मालक होता काय. सिटी सर्व्हेचा नकाशा मागितला काय व त्या नकाशानुसार हिस्सेदारांचे संमती पत्र घेतले काय.

(६) मा.उपवनसंरक्षक हयांनी सन २००० साली मशीन स्थानांतरीत करतांना वनसर्व्हेक्षक विभागाचा अहवाल मागविण्यात आला होता काय असल्यास सत्यप्रत नसल्यास त्याची कारणे.

(७) सदर आरागिरणी ८४२/१ मध्ये हलविण्याची परवानगी असतांना ८४२/२ मध्ये हलविण्यात आली त्यावेळी १० कि.मी. अंतराची अट नव्हती काय. एकोडी हे गांव राखील व संरक्षीत वनापासून किती की.मी.अंतरावर आहे तेव्हा स्थापीत आरागिरणी वैद्य आहे की अवैद्य आहे हयाचे मा. उपवनसंरक्षक हयांचे प्रमाणपत्र व अवैद्य असल्यास आपण काय कार्यवाही करणार, कालावधी निश्चित करावा.

(८) मा. जिल्हाधिकारी यांनी लोकशाही दिनात दिलेल्या तक्रारीची चौकशी करुन आरागीरणी गावापासून दूर हलविण्याचे आदेश असतांना पूर्ण चौकशी करण्यात येवून आरागीरणी दूर हलविण्याऐवजी चालु करण्याचे आदेश दिले ते कुणाच्या परवानगीने व सुरु करण्याचे काय प्रयोजन होते.

(९) आपले पत्र क्रं.१४७० दि. १५.७.०४ नुसार आरागीरणीतून विधणारा धुळ व ध्वनी प्रदुषणा पासून आरोग्यास धोका होणार नाही असे नमद केले आहे व हयाची सष्ट जाणिव असतांना आपण आरागीरणी दूर न हलविता कशी काय सुरु करुन दिली.

(१०) शासनाने पर्यावरण व प्रदुषनाचा अभ्यासक्रम ५ व्या वर्गापासून सुरु केले व वन विभागाकडूनही कार्यक्रम होत असतात माझ्या कुटूंबियांना व मला दुरगामी परिणाम जाणवू लागले व प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अहवाल असतांना आपण आरागीरणी सुरु करुन देतांना मानवी भावनेचा कां विचार केला नाही.

(११) अर्जदार व अर्जदाराचे कुटूंब हयांना श्र्वसनाचे विकार, दमा, खासी बहीरेपणा हयाचा त्रास होतो आहे हयास जबाबदार कोण."

माहितीचा कालावधी सन २००० ते अर्जाच्या तारखेपर्यंत असा दिलेला आहे. सदरची माहिती कशा रितीने घेणार हे नमुद केले नाही.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक १९.९.२००७ रोजी माहिती उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. राज्य माहिती आयोगाकडील दाखल केलेल्या अपीलाच्या संदर्भामध्ये विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे आरागिरणीचे वन अधिनियमानुसार स्थानांतरण न करणे, धुळ व ध्वनी प्रदुषन पाढविण्यास मदत करणे, इ. बाबत माहितीचे स्वरुप दिलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली याकरीता राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सुध्दा दाखल केला आहे. व प्रथम अपीलाचे उत्तर सुध्दा मुदतीत दिलेले नाही असे नमुद केले आहे. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने सदरची माहिती ही जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे व अनेक नस्त्यांमधून ती संकलीत करावयाची असल्यामुळे व २००० पासुनच्या कालावधीची असल्यामुळे दिनांक २७.२.२००७ रोजी लेखापाल शीली-१, भंडारा यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अर्जाची छायांकित प्रत पाठविण्यात आली होती. व सदरच्या अर्जाची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना देण्यात आली होती.

५. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टाळाटाळ केलेली नसून माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु ती माहिती जूनी आहे व अनेक नस्तीमधून काढावयाची असल्यामुळे विलंब झाला हे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. त्यातही अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेल आहे त्या सर्व मुद्यांचा विचार केल्यास जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही प्रश्न उत्तराच्या स्वरुपात आहे व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. तसेच अपीलकर्ता यांच्या संपुर्ण प्रकरणाच्या संदर्भामध्ये लोकआयुक्त यांचे कार्यालयात सुध्दा कार्यवाही झालेली दिसून येते व त्याबाबतची कागदपत्रे दाखल केलेली आहे.

६. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे मुदतीच्या नंतर दाखल केले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच राज्य माहिती आयोगाकडील अपील सुध्दा

विलंबानेच दाखल करण्यात आले आहे. तसेच अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीच्या मुद्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचे जे प्रकरण आहे त्या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये त्यांनी एकुण ११ मुद्यांच्या पैकी १० मुद्यांमध्ये कारणे विचारलेली आहे. व ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, टिपणी, निर्णय इ.च्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध आहे त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकार या व्याख्येचा समावेश आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात अभिप्राय अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. विलंबाच्या संदर्भात वरच विवेचन केलेले असल्यामुळे तो मुद्दा सुध्दा निकाली काढण्यात आलेला आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नसल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

March,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १२४/२००८**

**१) श्री संतोष गजानन भांडारकर,**
**पो.ढाकणी, ता.जि. गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, गोंदिया, ता.जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**नगर परिषद गोंदिया, ता.जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. त्यांचे म्हणणे एकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) फेब्रुवारी २००० आईचे नांव अरुना बंसोड वडीलाचे नांव प्रितकुमार बंसोड (२) १० मार्च २००१ आईचे नांव अरुना बंसोड वडीलाचे नांव प्रितकुमार बंसोड (३) ४.६.२००२ आईचे नांव अरुणा बंसोड वडीलाचे नांव प्रितकुमार बंसोड वरील मुद्या क्रमांक २,३ चा जन्म प्रमाणपत्राचा दाखला हवा आहे तरी त्वरीत देण्याची कृपा करावी." सदरची माहिती व्यक्तीशः हवी असे नमूद केले असून दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले दिसून येत नाही परंतु होय असे लिहीलेले आहे.

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने त्यांना दिनांक ४.२.२००८ रोजी ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन देवून अर्जदाराला जन्म प्रमाणपत्र घेण्याकरीता गोंदिया तहसिल कार्यालयातून २० रुपयाचे शपथपत्र (हलफनामा) व जन्म

प्रमाणपत्र फी दिल्यानंतर यांना जन्म प्रमाणपत्राची नकल प्रत देण्यात येईल. परंतु अपीलकर्ता यांनी सदर फी भरण्याची गरज नाही असे सांगितले व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

४. अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती मागितलेली असल्यामुळे जन्म प्रमाणपत्राची नक्कल देण्याची आवश्यकता होती. जन्म नोंदीच्या नोंदवहीच्या संबंधीत नोंदीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. तसेच अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र अपीलासोबत जोडलेले असत्यामुळे त्यांना विनामुल्य माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या नोंदीच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तीशः, विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

March,०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १२५/२००८**
**अपील क्रमांक १२६/२००८**

**१) श्री संतोष गजानन भांडारकर,**
**पो.ढाकणी, ता.जि. गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका निरिक्षक,**
**भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**तालुका निरिक्षक,**
**भूमी अभिलेख, गोंदिया, ता.जि. गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. **अपील क्रमांक १२५/२००८** अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मा.तालुका भूमि अभिलेख कार्यालय, गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) मौजा ठाकणी येथील भू.क्रं.४१७ आराजी १२.३४ हे.आर जमीनीची संयुक्त मोजणी सन १९९७-९८ ला झालेली आहे. सदर जमीन दिनांक १०.१.१९९८ ला वनविभाग गोंदिया यांना हस्तांतरीत करण्यात आली. त्या मोजणी समयीच्या अ प्रती मिळण्याबाबत.

(२) मौजा ढाकणी येथील भू.क्रं.४१७ चा गांव नकाशाची कॅापी सन १९८२-८३

(३) मौजा ढाकणी येथील सन १९८२-८३ चा पुन्नरमोजणीचा गुणाकार पत्रकाची कॅापी

(४) मौजा ढाकणी येथील सन १९८२-८३ चा शासकिय पडीत गांव वनजमिनी तथा मालनियम जमिनीचा कमी जास्त प९ाकाची कॅापी

(५) मौजा ढाकणी येथील जुना सर्व्हे नंबर २४४/१ च्या सन १९१७-१८ चे P.I. ची कॅापी मिळण्याकरीता." सदरची माहिती व्यक्तीशः हवी असे नमूद केले असून दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी मा. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख साहेब तथा अपीलीय अधिकारी श्री वरखडे साहेब, गोंदिया यांचेकडे दिनांक २३.१.२००८ रोजी प्रथम अपील, **माहिती दाखविण्याचा नकार दिल्यामुळे** या कारणास्तव दाखल केलेले दिसून येते.

**४.** प्रथम अपीलाच्या अनुषंगाने तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, गोंदिया यांचे दिनांक १२.२.२००८ चे पत्रावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**५. अपील क्रमांक १२६/२००८** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मा.तालुका भूमि अभिलेख कार्यालय, गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) मौजा ठाकणी येथील भू.क्रं.४१७ आराजी १२.३४ हे.आर जमीनीची संयुक्त मोजणी सन १९९७-९८ ला झालेली असून सदर जमीन दिनांक १०.१.१९९८ ला वनविभाग गोंदिया यांना हस्तांतरीत करण्यात आली. त्या मोजणी समयीच्या अ प्रतीची पाहाणी करण्यास अर्ज सादर." सदरची माहिती व्यक्तीशः असे नमूद केले असून दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे.

**६.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी मा. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख साहेब तथा अपीलीय अधिकारी श्री वरखडे साहेब, गोंदिया यांचेकडे दिनांक ६.१२.२००७ रोजी प्रथम अपील, **माहिती दाखविण्याचा नकार दिल्यामुळे** या कारणास्तव दाखल केलेले दिसून येते.

**७.** अपीलकर्ता यांनी प्रथम अपील जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याची मुदत संपण्यापुर्वीच दाखल केलेले दिसून येते. तथापि, प्रथम अपीलाच्या अनुषंगाने तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, गोंदिया यांचे दिनांक १२.२.२००८ चे पत्रावरुन अपीलकर्ता यांना माहिती

उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील क्रमांक १२५/२००८ व अपील क्रमांक १२६/२००८ हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५०६/२००८**

**१) श्री दिगंबर नत्थु रामटेके,**
**रा.कुभारे नगर, पिपरा रोड,**
**श्री राहुल देशभ्रतार यांचे घरासमोर,**
**तुमसर, पो. तुमसर ता.जि.भंडारा-४४१९१२ अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जनरल मॅनेजर,**
**धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकराची सहकारी बँक लि.**
**धुळे, गरुडबाग, धुळे. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा शाखा अधिकारी,**
**धुळे व नंदुरबार जिल्ह सरकारी नोकराची सहकारी बँक लि.**
**धुळे, शाखा जळगांव, जिल्हा जळगांव. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती अधिका-याचा तपशिल हा शाखा अधिकारी तथा माहिती अधिकारी, धुळे व नंदूरबार जिल्हा सहकारी नागरीकांची सहकारी बँक लि., शाखा जळगांव असा दिलेला आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००७ रोजी माहिती मागण्यासाठी जो अर्ज केला होता त्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.११.२००७ रोजी माहितीचा अधिकार बँकेला लागू नाही असे कळविलेले दिसून येते.

३. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील जनरल मॅनेजर, धुळे व नंदूरबार जिल्हा सहकारी नागरीकांची सहकारी बँक लि.धुळे, गरुडबाग, धुळे यांचेकडे दाखल केले होते. परंतु, त्यातही दिनांक १७.३.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा बँकेस (सहकारी संस्थेस लागु नसल्याने) माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी

याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

आदेश

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५०७/२००८**

**१) श्री मनोज गणपत तांबे,**
**पी.के.साल्वे मार्ग, मोहननगर,**
**खलाशी लाईन, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**नागपूर शहर(२), सहकार सदन, हिंदुस्थान कॅालनी,**
**अमरावती रोड, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**नागपूर मेहतर विविध उद्येशिय सहकारी पत संस्था,**
**पूर्ववत महर्षी सुदर्शन वाल्लिकी सहकारी पत संस्था, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१०.२००२ रोजी माहिती मागण्यासाठी जो अर्ज केला होता त्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२.१२.२००८ व १६.११.२००९ रोजीचे पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती दिल्याचे दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी अपीलाचा निर्णय दिला असून त्यात अपीलकर्ते श्री मनोज गणपत तांबे यांनी मागितलेली माहिती तातडीने देण्यात यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतरही उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते

४. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॅा. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बॅंक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी

याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. व अपीलकर्ता यांनी नागपूर मेहतर विविध उद्येशिय सहकारी पत संस्था पुर्ववत महर्षी सुदर्शन वाल्मिकी सहकारी पत संस्था, नागपूर यांचेकडे माहिती मागितली असल्यामुळे व सदरची संस्था ही सहकारी संस्था असल्यामुळे त्या संस्थेसही मा.उच्च न्यायालय नागपूर, खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला वरीलप्रमाणे निर्णय लागू होईल. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५०८/२००८**

**१) श्री सतिश कप्ताणसिंह बैस,**
**चिटणीसपूरा, पोलीस चौकी समोर,**
**महाल नागपूर-३२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी श्री दुष्यंत सिडाम,**
**विभागीय सहनिबंधक, सह संस्था, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**नागपूर सह.संस्था, सिताबर्डी, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती अधिका-याचा तपशिल हा विभागीय सहनिबंधक, नागपूर सह.संस्था, सिताबर्डी, नागपूर असा दिलेला आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००८ रोजी माहिती मागण्यासाठी जो अर्ज केला होता त्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ९.६.२००८ रोजी माहितीचा अधिकार बँकेला लागू नाही असे कळविलेले दिसून येते.

३. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील श्री दुष्यंत सिडाम, विभागीय सहनिबंधक, सह संस्था, नागपूर. यांचेकडे दिनांक १८.६.२००८ रोजी दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणीसाठी नोटीस निर्गमित करण्यात आल्याचे दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांनी अपील मेमोसोबत दाखल केलेली नाही. त्यामुळे प्रथम अपीलामध्ये निर्णय दिला किंवा नाही हे कळण्यास मार्ग नाही.

४. श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी

याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरच्या अपील प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५०९/२००८**

**१) श्री शंकर लहानुजी झाडे,**
**स्वामी अपार्टमेन्ट, जवाहरनगर, मानेवाडा रोड,**
**नागपूर-२४. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप निबंधक,**
**सहकारी संस्था नागपूर शहर-१,**
**उमरेड रोड, भांडे प्लॉट, नागपूर-९ उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव/व्यवस्थापक,**
**प्रवेश नागरी सहकारी पत संस्था मर्या. नागपूर,**
**र.नं.५५०-९६, भारतनगर गीता टिंम्बरसमोर,**
**मु.पो.ता.जि. नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००८ रोजी माहिती मागण्यासाठी जो अर्ज केला होता त्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.२.२००८ रोजीचे पत्रान्वये आपण संस्थेचे सभासद व खातेदार नाही. सदर संस्थेला महाराष्ट्र शासनाकडून व केंद्र शासनाकडून कोणतेही प्रत्येक्ष व अप्रत्यक्ष वित्तीय सहाय्य मिळत नाही, असे कारण देवून अर्जदाराचा अर्ज फेटाळल्याचे अर्जदारास कळविलेले दिसून येते.

३. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील उप निबंधक, सहकारी संस्था नागपूर शहर-१, उमरेड रोड, भांडे प्लॉट, नागपूर-९ यांचेकडे दिनांक ४.३.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.३.२००८ रोजी देण्यात आला असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ गैरअपीलार्थी संस्थेला लागू होत नसल्यामुळे अपील नामंजूर करण्यांत येत असल्याचे अपीलकर्ता यांना कळविण्यात आल्याचे दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॅा. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बॅंक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बॅंकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. व अपीलकर्ता यांनी ज्या संस्थेकडे माहिती मागितलेली आहे ती गैरअपीलार्थी संस्था ही नागरी सहकारी पत संस्था असल्यामुळे सदरच्या संस्थेसही मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे व जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५१०/२००८**

**१) श्री वामन नारायण सावरकर,**
**कोषाध्यक, श्री संत जगनाडे महाराज संस्था,**
**रं.क्रं.एफ १६९८, पुलगांव, ता. देवळी, जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था देवळी, ता. देवळी, जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मा.व्यवस्थापक साहेब,**
**नवोदय ना.स.पत संस्था, पुलगांव, ता. देवळी,**
**जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००८ रोजी माहिती मागण्यासाठी जो अर्ज केला होता त्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११.२.२००८ रोजीचे पत्रान्वये आपण संस्थेचे सभासद व खातेदार नाही. सदर संस्थेला महाराष्ट्र शासनाकडून व केंद्र शासनाकडून कोणतेही प्रत्येक्ष व अप्रत्यक्ष वित्तीय सहाय्य मिळत नाही, असे कारण देवून अर्जदाराचा अर्ज फेटाळल्याचे अर्जदारास कळविलेले दिसून येते.

३. त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील उप निबंधक, सहकारी संस्था नागपूर शहर-१, उमरेड रोड, भांडे प्लॅाट, नागपूर-९ यांचेकडे दिनांक ४.३.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.३.२००८ रोजी देण्यात आला असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ गैरअपीलार्थी संस्थेला लागू होत नसल्यामुळे अपील नामंजूर करण्यांत येत असल्याचे अपीलकर्ता यांना कळविण्यात आल्याचे दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॅा. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी

याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. व अपीलकर्ता यांनी ज्या संस्थेकडे माहिती मागितलेली आहे ती गैरअपीलार्थी संस्था ही नागरी सहकारी पत संस्था असल्यामुळे सदरच्या संस्थेसही मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे व जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५११/२००८**

**१) श्री संजयकुमार प्रेमचंद तातेड,**
**मु.पो. खापा वार्ड नं.१४, ता.सावनेर,जि. नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सावनेर,**
**ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**जय मॉ वैष्णवी महिला विकास अर्बन क्रेडीट सह. संस्था,**
**खापा, ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२००८ (कार्यालयास प्राप्त २३.१०.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी, जय मॉ वैष्णवी महिला विकास अर्बन क्रेडीट सह.संस्था, खापा यांचेकडे दिनांक १५.७.२००८, २२.५.२००८, १४.७.२००८, १६.८.२००८, २१.८.२००८ चे अर्जान्वये माहिती मागितलेली दिसून येते. सचिव, जय मॉ वैष्णवी महिला विकास अर्बन क्रेडीट सह.संस्था, खापा यांनी दिनांक १३.१०.२००८ रोजी अर्जदारास सविस्तर असे उत्तर अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.१०.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिलेले असून त्यात अर्जदार संस्थेच्या सभासद नसल्यामुळे त्याला माहिती अधिकारा अंतर्गत माहिती मागण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे सहकारी संस्थेच्या कायदयामध्ये अर्जदाराचा अंतर्भाव होत नाही, असे नमुद केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी त्यांना अपूरी माहिती उपलब्ध झाली या कारणास्तव प्रथम अपील मा.सहा.निबंधक, सहकारी संस्था, सावनेर यांचेकडे दिनांक २६.८.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय जोडलेला दिसून येत नाही.

४.  मात्र, अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोमध्ये अपील दाखल केल्यावर पन्नास दिवसानंतरही त्या अपीलावर मागितलेल्या अर्जाप्रमाणे एकही अर्जाची माहिती मिळवून दिली नाही असे नमूद केले आहे.

५.  परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे ती गैरअपीलार्थी संस्था ही सहकारी संस्था असल्यामुळे सदरच्या संस्थेस सुध्दा मा. उच्च न्यायालयाचा वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५१२/२००८**

**१) श्री संजयकुमार प्रेमचंद तातेड,**
**मु.पो. खापा वार्ड नं.१४, ता.सावनेर,जि. नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सावनेर,**
**ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव**
**जय मॉ वैष्णवी महिला विकास अर्बन क्रेडीट सह. संस्था,**
**खापा, ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००८ (कार्यालयास प्राप्त १६.०९.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी, जय मॉ वैष्णवी महिला विकास अर्बन क्रेडीट सह.संस्था, खापा यांचेकडे दिनांक २२.५.२००८, चे अर्जान्वये माहिती मागितलेली दिसून येते. सचिव, जय मॉ वैष्णवी महिला विकास अर्बन क्रेडीट सह.संस्था, खापा यांनी दिनांक १४.६.२००८ रोजी अर्जदारास उत्तर दिले असून त्यात कोणत्या कामाचा हिशोब, कमिशनचे माहिती करीता रु. २३०/- व कॅश बुक कॅापीकरीता रुपये ३०००/- जमा करावे असे नमुद केलेले दिसून येते.

३. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील मा.सहा.निबंधक, सहकारी संस्था, सावनेर यांचेकडे दिनांक २६.६.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय जोडलेला दिसून येत नाही. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिला किंवा नाही हे कळण्यास मार्ग नाही.

४. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी

बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे ती गैरअपीलार्थी संस्था ही सहकारी संस्था असल्यामुळे सदरच्या संस्थेस सुध्दा मा. उच्च न्यायालयाचा वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५१३/२००८**

**१) श्री जगदीश अंबिकाप्रसाद शर्मा,**
R/o B-२, Prestige Apartments,
Civil Lines, Nagpur
Account holder of
(Appellants name and address) **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**शिक्षक सहकारी बँक लि. गांधीसागर तलावाचे विरुध्द बाजुस,**
**टाटा पारसी हायस्कुल जवळ, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक,**
**शिक्षक सहकारी बँक लि. गांधीसागर तलावाचे विरुध्द बाजुस,**
**टाटा पारसी हायस्कुल जवळ, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००८ (कार्यालयास प्राप्त ५.०९.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक लि. गांधीसागर तलावाचे विरुध्द बाजुस, टाटा पारसी हायस्कुल जवळ, नागपूर.यांचेकडे दिनांक ३१.७.२००८, चे अर्जान्वये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, शिक्षक सहकारी बँक लि. गांधीसागर तलावाचे विरुध्द बाजुस, टाटा पारसी हायस्कुल जवळ, नागपूर. यांनी दिनांक २.९.२००८ रोजी अर्जदारास उत्तर दिले असून त्यात बँकेला माहिती अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याच्या तरतुदीमधून वगळण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे.

३. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सुध्दा माहिती अधिकारी, शिक्षक सहकारी बँक लि. गांधीसागर तलावाचे विरुध्द बाजुस, टाटा पारसी हायस्कुल जवळ, नागपूर. यांचेकडेच दिनांक २२.८.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय जोडलेला दिसून येत नाही. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिला किंवा नाही हे कळण्यास मार्ग नाही. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी ज्या संस्थेकडे माहिती मागितली आहे ती गैरअपीलार्थी बँक ही सहकारी बँक असल्यामुळे सदरच्या बँकेस सुध्दा मा. उच्च न्यायालयाचा वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५१४/२००८**

**१) श्री शिवशंकर मारोती रावते,**
**पो.मु. भांडेसर, तह. मोहाडी, जिल्हा भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**उपनिबंधक, कार्यरत व कार्यतत्पर अधिकारी,**
**सह.संस्था, भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**प्राथमिकशिक्षक सहकारी समिती मर्या. भंडारा,**
**जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, प्राथमिक शिक्षक सहकारी समिती, भंडारा यांचेकडे दिनांक २४.७.२००७ चे अर्जान्वये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा प्रधान व्यवस्थापक, भंडारा जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. भंडारा यांनी दिनांक ७.८.२००७ रोजी अर्जदारास उत्तर दिले असून त्यात संस्थेस माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागु होत नसल्याबाबत कळविण्यात आले आहे.

३. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील उपनिबंधक साहेब, सह.सं. भंडारा यांचेकडे दिनांक १३.८.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये दिनांक १७.९.२००८ रोजी निर्णय देण्यात आला असून त्यात मुद्या क्रं.२,१०,१२ व १३ ची माहिती शोधून अर्जदारास ७ दिवसांचे आंत देण्यात यावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यांनतरही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॅा. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी ज्या सहकारी समितीकडे माहिती मागितली आहे ती गैरअपीलार्थी सहकारी समिती ही सहकारी समिती असल्यामुळे सदरच्या सहकारी समितीस सुध्दा मा. उच्च न्यायालयाचा वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५१५/२००८**

**१) श्री चुन्नीलाल महादु बिसेन,**
**मु.पो. वडेगांव, तह. तिरोडा, जिल्हा गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा,**
**सर व्यवस्थापक, गोंदिया डिसीसी बँक, गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**दि. गोंदिया डी.सेंट्रल को.ऑप.बँक लि. गोंदिया,**
**शाखा वडेगांव. जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोसोबत माहितीचा अर्ज व प्रथम अपील यांची झेरॉक्स प्रत जोडलेली आहेत. त्याव्यतिरिक्त त्यांनी कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाही.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, दि गोंदिया डि.सेंट्रल को.ऑप.बँक लि. गोंदिया, शाखा वडेगांव यांचेकडे दिनांक १७.६.२००८ चे अर्जान्वये माहिती मागितलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सरव्यवस्थापक, गोंदिया डिसीसी बँक, गोंदिया यांचेकडे दिनांक ११.८.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते.

४. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी ज्या डिसीसी बँकेकडे माहिती मागितली आहे ती गैरअपीलार्थी डिसीसी बँक ही सहकारी

बँक असल्यामुळे सदरच्या बँकेस सुध्दा मा. उच्च न्यायालयाचा वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५१६/२००८**

**१) श्री युवराज मुरलीधर येनप्रेडीवार,**
**वार्ड नं.२, देवरी, ता. देवरी,**
**जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**जय दुर्गा कोचिंग क्लास देवरी, ता.देवरी,**
**जिल्हा गोंदिया. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**जय दुर्गा कोचिंग क्लास देवरी, ता.देवरी,**
**जिल्हा गोंदिया. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २१.१.२००८ चे अर्जान्वये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.२.२००८ रोजी अर्जदार यांना योग्य रकान्यात माहिती विचारण्यात यावी, असे कळविलेले दिसून येते.

२. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १.३.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदर कोचिंग क्लासेसना शासनाकडून कोणत्याही स्वरुपाचे अनुदान मिळत नाही. ज्याला शासनाकडून अनुदान मिळत नाही त्यात माहिती अधिका-यांमार्फत माहिती देता येत नाही, असे अर्जदारास कळविल्याचे दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी ज्या गैरअपीलार्थी संस्थेस माहिती मागितलेली आहे ती गैरअपीलार्थी संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेच्या व्याख्येत येत नसल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य

असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६७९/२००७**

**१) श्री चंद्रकान्त रामभाऊ चिमोटे,**
**५२५, गुरुमाऊली, न्यू नंदनवन ले आऊट,**
**नागपूर-९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, नागपूर,धनवटे चेंम्बर्स(अनेकस) सिताबडी,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, नागपूर (शहर-१),**
**१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॅाट चौक,**
**उमरेड रोड, नागपूर-४४०००९.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २१.९.२००७ रोजी उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"फॅारेस्ट डिपार्टमेंट एम्लॅाईज को.ऑ.हाऊसिंग सोसायटी लि. नागपूर यांनी आपणास त्यांचे पत्र क्रं.४१९ दि.८.११.२००५ अन्वये संस्थेचे तत्कालीन सचिव यांचे विरोधात दि. ११.११.०१ चे आमसभेच्या ठरावानुसार सन १९९६-९७, १९९७-९८, १९९८-९९ या आर्थीक वर्षाचे स्टॅचुटरी ऑडीट करुन घेण्याबाबत, तसेच वरील आर्थीक वर्षात १३/१४ लाख रुपयाचा प्रमाणित हिशेब न मिळाल्या कारणाने ऑडीटरने घेतलेल्या गंभीर आक्षेपाबाबतचे पत्र तेरा सहपत्रांसह कायदेशीर

कारवाही करण्यासाठी दिले होते. त्याबाबत काय चौकशी करण्यात आली. त्या चौकशी अहवालाची छायांकित प्रत. "

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.१०.२००७ रोजी छायांकित प्रती करीता येणा-या खर्चाची रक्कम जमा करुन चौकशी अहवालाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक १६१०.२००७ रोजी उपलब्ध झालेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ७.११.२००७ रोजी अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक यांना अर्जदार यांनी सदरच्या संस्थेच्या चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केली आहे. गैरअर्जदार उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर अर्जदार यांनी दिलेल्या संस्थेबाबतच्या तक्रारीची चौकशी झाली नसल्यामुळे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपण संस्थेचे कारभाराबाबत माहितीची मागणी केली असल्याचे दिसून येते. तेव्हा माहितीच्या अधिकारामध्ये कोणत्याही संस्थेची चौकशी करणे हे अपेक्षित नसून संस्थे्बाबत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रतीची मागणी करणे आवश्यक आहे. व त्यामुळे सदरची अपील खारीज करण्यात आलेली दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

३. वास्तविक, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही स्वयंस्पष्ट आहे व त्यात सन ९६-९७, ९७-९८ व ९८-९९ या कालावधीतील ऑडिट संबंधामध्ये आक्षेप असल्यास त्या आक्षेपाची चोकशी करण्यात आली आहे काय, चौकशी करण्यात आली असल्यास चौकशी अहवालाची छायांकित प्रत अशा प्रकारची माहिती असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.९.२००७ च्या अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे चौकशी झालेली असल्यास चौकशी अहवालाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३०/२००८**

**१) श्रीमती रेखा सुरेंद्र शर्मा,**
**दुकान क्रं.९, व्यापार संकुल, रविनगर,**
**अमरावती रोड, नागपूर-३३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा),**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा),**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००७ रोजी कार्यकारी अभियंता यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) My letter dt. १७.२.२००६

(२) My letter dt. १६.१.२००७

(३) My letter dt. १४.५.२००७

(४) My letter dt. २०.६.२००७

R/Sir,

Kindly refer my above dated letters regarding the, what type of facility you are providing, butsince then I have not received a single reply from your side of my letters. What should I have to think?

(१) Your office had sold the shop out Right, then under which rulesyou are taking yearly (a) service charges, (b) Ground Rent (N.A.A.) (d) penalty Amount of Dealy.

(२) What type of facility your office is providing to the shop owners.

(३) Your office had taken the same land at a very cheaper rate from the Govt.(Acquired Land) and sold the shop out Right, then under which rule your office is taking the Ground Rent.

(४) Under which rule your office is taking a Non Agriculture Tax, when these is not comes under your Department.

(५) Your office is also imposed a penalty on delay, when your office is himself responsible for delay. (Kindly refer my letter dated १६.१.२००७) Sir, I am wating eagerly a reply from your side, in which your office will provide me all the above information. (I am ready to pay the Xerox charges in which your office will provide me the Rules of your Department and postal charges)."

**३.** अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.११.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल न करता दिनांक ३०.११.२००७ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर पुन्हा दिनांक १६.१.२००८ रोजी स्मरणपत्र देवून त्यात अभिप्रायात्मक प्रश्न उपस्थित केलेले आहे. तसेच सदरचे स्मरणपत्र हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे नाही, असे दिसून येते.

**४.** असे असले तरी दिनांक २२.१.२००८ रोजी मिळकत व्यवस्थापक यांनी पुन्हा त्यांना स्मरणपत्राचे अनुषंगाने उत्तरे दिलेली दिसून येतात. त्यानंतर पुन्हा दिनांक ५.२.२००८ रोजी मिळकत व्यवस्थापक यांनी काही प्रश्न उपस्थित करुन अर्ज दिलेला दिसून येतो. दिनांक १२.२.२००८ रोजी नवीन प्रश्न उपस्थित करुन अर्ज दिलेला आहे. परंतु प्रथम अपील दाखल

केलेले नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडील मात्र जे द्वितीय अपील दाखल केले आहे ते सकृत दर्शनी विचारात घेता येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून त्यांच्या एकुण ५ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे परत पाठविण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे परत पाठविण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सुनावणी घेवून माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची सुनावणी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत पुर्ण करावी. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना तारीख व वेळ कळविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३७/२००८**

**१) श्री बबन तुळशिराम उराडे,**
**कार्यालय, शाळा न्यायाधिकरण, प्रशासकिय इमारत,**
**सिव्हील लाईन, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)**
**जिल्हा परिषद, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा संचालक/सचिव,**
**न्यु ग्रॅन्ड एज्युकेशन सोसायटी, संजय मैदान, कामठी रोड,**
**नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२००८(कार्यालयास प्राप्त २२.२.२००८)रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. त्यांचे तर्फे ॲट. व्ही.डी.सबेस्टीयन हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी म्हणून संचालक/सचिव, न्यु ग्रॅन्ड एज्युकेशन सोसायटी, संजय मैदान, कामठी रोड, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"दिनांक १.५.८७ ते ३०.६.१९८७ हया उन्हाळी सुटयांच्या कालावधीचे वेतन देण्याबाबत. महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती नियमावली १९८१ मधील नियमानुसार ज्या कर्मचा-यांनी पुर्ण शैक्षणिक सत्रात अधिकाधिक कालावधीमध्ये सेवा केली असल्यास त्यांना उन्हाळी सुटयातील मोठया सुटीच्या कालावधीत वेतन अनुज्ञेय आहे. परंतु आपण दिनांक १.५.८७ ते ३०.६.८७ हया दोन महिन्याच्या उन्हाळी सुटयातील वेतन मला दिले नाही. त्यामुळे आपल्या शाळेतील सेवा शासकिय सेवा निवृत्ती करीता जोडण्यात अडचण निर्माण झालेली आहे. करीता आपण दिनांक १.५.८७ ते ३०.६.८७ हया कालावधीचे वेतनाचे डिमांड ड्राफ्ट माझ्या पत्यावर पाठवून वेतन अदा केल्याचे डिमांड ड्राफ्ट नंबर व रक्कम नमुद करुन माहिती मला व शिक्षणाधिकारी माध्य.

जि.प.नागपूर यांना दिल्याची माहिती द्यावी." सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

**३.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.११.२००७ (१३.११.२००७) रोजी संचालक सचिव यांनी शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग यांचेकडे एकुण ५ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसुन दिनांक १३.१०.२००७ रोजी संचालक/सचिव यांनी श्री बी.टी. उराडे, कार्यालय पीठासिन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, नागपूर, प्रशासकिय इमारत दुसरा मजला, सिव्हील लाईन, नागपूर यांना संस्थेच्या इंदिरा गांधी विद्या मंदिर ता. रामटेक या शाळेत कार्य केले असून उन्हाळी वेतनासाठी मागणी केली. त्याबाबत दिनांक ५.१०.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने "आपण दिनांक ५.१०.२००७ चे पत्र संस्थेला ११.१०.२००७ ५=१० सायंकाळी मिनीटांनी मिळाले आहे. त्यात आपण मे, जुन, १९८७ चे वेतन देण्यासाठी पत्र पाठविले आहे. परंतु, शाळेत झालेल्या चोरीमुळे बरीच कागदपत्रे व नियुक्ती फाईल मिळत नसल्याने संस्थेने आपणास नियुक्ती केलेल्या नियुक्ती आदेशाची झेरॉक्स प्रत संस्थेला पाठविण्यात यावे. त्यानुसार आपल्या सेवेची चौकशी करुन आपण मागितलेल्या वेतनाबाबतचे प्रकरण निकाली काढण्यासाठी सोईचे होईल, याची नोंद घेवून संस्थेने पाठविलेल्या पत्राप्रमाणे कार्यवाही करावी व पत्राची प्रत शिक्षणाधिकारी यांना दिलेली दिसून येते."

**४.** असे असले तरी द्वितीय अपील मेमो मध्ये अपीलकर्ता यांनी वेतन मागणी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही कागदपत्रांच्या किंवा अभिलेख्यांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणाची कार्यवाही करुन मागता येत नाही. व अपीलकर्ता यांनी कोणत्याही कागदपत्राची मागणी केलेली नसून वेतन मागणी केलेली आहे. अशी मागणी माहितीच्या अधिकारात करता येत नाही. तरी पण त्यांच्या मागितलेल्या वेतनाच्या संदर्भात पुढील कार्यवाही करावयाची असल्यास त्यांनी संस्थेने कळविल्याप्रमाणे संस्थेस सहकार्य करावे व त्यांचे वतन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

परंतु अपीलकर्ता यांची वेतन उपलब्ध करुन देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे मान्य करता येत नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांची वेतना बाबतची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींप्रमाणे मान्य करता येत नसल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३८/२००८**

**१) श्री गंगाधर नत्थुजी कांबळे,**
**१/७१, श्रीहरी नगर, नागपूर-२७. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.)**
**जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, शालेय शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे सेवाविषयक सन १९९७ ते २४.९.२००७ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"(१) माझा दि. २५.९.२००६ चे विषयासंबंधाने संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयानी केलेल्या आजपर्यंतच्या कार्यवाही विषयी दस्तऐवजाच्या प्रती. (२) रक्षक, भक्षक, भ्रष्टाचार लालफितशाही विरुध्द पोल खोल संघटना, नागपूर यांचे पत्र क्रं.जा.क्रं.१४१, दिनांक १६.८.२००५ व पत्र जा.क्रं.दि. १६.९.२००५ चे विषयासंबंधाने विषय क्रं. १ ते ४ प्रमाणे आपल्या कार्यालयानी केलेल्या आजपर्यंतच्या कार्यवाही विषयी दस्तऐवजाच्या प्रती."

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ५.१२.२००७ रोजी सुनावणीचे पत्र अपीलकर्ता यांना दिले पण सुनावणी झाली नाही. तसेच

अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, सुनावणीच्या ब-याच तारखा झाल्या पण सुनावणी झाली नाही. व त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही असे दिसून येते.

४. आज १० वी १२ वीच्या परीक्षा सुरु असल्यामुळे शिक्षणाधिकारी हे उपस्थित राहू शकत नाही अशी त्यांनी विनंती केली आहे. परंतु माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे सदरच्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.९.२००७ च्या अर्जात मागितलेली माहिती विना मुल्य जन माहिती अधिकारी, शालेय शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद, नागपूर यांनी व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी,शालेय शिक्षण विभाग यांचेकडे उपस्थित होऊन विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच द्यावी.

२) माहिती आदेशाप्रमाणे उपलब्ध करुन न दिल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १३०/२००८**

**१) श्री राकेश केवळराम मेश्राम,**
**मु.पो. गांगलवाडी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, चंद्रपूर.** **गैरतक्रारदार**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव/मुख्याध्यापक,**
**आतिष केंद्रिय निवासी शाळा, गांगलवाडी,**
**मु.पो.गांगलवाडी, ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर.** **गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ७.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ९.७.२००८ रोजी संस्थाचालक सौ.ममता मारोती जांभुळकर यांनी अर्ज स्विकृत केला नाही. विशेष समाज कल्याण अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे अपील दाखल केली. त्यांनी सुध्दा कोणतीही माहिती पुरविली नाही व त्यामुळे आपणाकडे अर्ज करीत आहे. मी मॅट्रीक असून उजव्या पायाने अपंग आहे. माझ्याकडे अपंगत्वाचे सिव्हील सर्जनचे प्रमाणपत्र आहे. मी गरीब असून माझ्या पाठीमागे माझी पत्नी, मुलगा आणि म्हातारे आई वडील असा आप्त परिवार आहे. तरी माझी आर्थिक परिस्थिती पाहून अन्यायाची दखल घेण्याकरीता व मला योग्य ते न्याय देण्याकरीता आपणाकडे विनंती अर्ज करीत आहे. मला माझ्या कष्टाचा पैसा मिळाला पाहिजे, असे तक्रारीत म्हटलेले आहे. निवासी शाळेमध्ये मी भांडे साफसफाई, पाणी भरणे, परशी पुसणे, काडया फोडणे आणि अधिक्षकांनी सांगीतलेले कामे करायचा. माझा वापर संस्था चालकांनी ५ वर्षापर्यंत करुन घेतला. मला कोणतीही पूर्व सूचना न देता व माझी कोणतीही चुक लक्षात न आणता मला कामावरुन काढून टाकले. कामावरुन कमी करुन घेतल्यामुळे मी पैशाची मागणी करीत होतो. कामाच्याही पिरेडमध्ये पैशाची मागणी करीत होतो. परंतु मला त्यांनी माझ्या कष्टाचा पैसा दिला नाही, अशी तक्रार केली आहे.

**२.** तक्रारदार यांनी दिनांक १२.५.२००८ रोजी माहिती अधिकारी सौ. ममता मारोती जांभुळकर यांना वरील तक्रारीच्या अनुषंगाने कागदपत्र मागितले होते. ती कागदपत्रे त्यांना उपलब्ध झालेली आहे. तरी सुध्दा त्यांनी दिनांक ३१.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले

आहे. कागदपत्रे त्यांना दाखविली होती ती त्यांनी फाडून टाकली, असे मुख्याध्यापक यांनी विशेष समाज कल्याण अधिकारी यांना कळविलेले दिसून येते.

३. असे असले तरी अर्जदार यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली आहे असे अपीलकर्ता यांच्या वडीलांनी सांगितले आहे. परंतु त्यांना ५ वर्षाचे वेतन किंवा कामाचा मोबदला मिळावा याकरीता आयोगाकडे तक्रार केली आहे. परंतु अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारची कार्यवाही अपेक्षित नसल्यामुळे तक्रारदार यांना त्यांचा पगार उपलब्ध करुन देता येत नाही. त्याकरीता तक्रारदार यांनी योग्य त्या सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज दाखल करुन न्याय मिळवून घेणे योग्य राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो व त्यांची तक्रारीतील मागणी मान्य करता येत नसल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहेत.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६८/२००८**

**१) श्री संजय विठठलरावजी सत्येकार,**
**जे.एन.रोड, आंम्बेडकर चौक, कन्हान,**
**ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**साईबाबा अनुदानित आश्रम शाळा, टेकाडी,**
**ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून साईबाबा अनुदानित आश्रम शाळा यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) आपली शाळा कोणत्या संस्थेच्या माध्यमातून चालविल्या जात आहे संचालकांचे नांव. (२) मंजूर कर्मचा-यांची संख्या, पदनाम व प्रत्यक्षात नियुक्त संख्या. (३) मंजूर विद्यार्थी संख्या व प्रत्येक्षात असलेले पटसंख्या (४) विद्यार्थ्यांचे निवासचे क्षेत्र कोणते व संस्थेची काय काय मालमत्ता आहे. (५) संस्थेला व विद्यार्थ्यांना विविध योजनाच्या माध्यमातून शासना कडून शिष्यवृत्ती व अनुदान मिळाले याची संपुर्ण माहिती केव्हा, किती व कोणला अनुदान मिळाले याची संपुर्ण माहिती (६) दि. ७.८.०७ चा जाहिरातीप्रमाणे नियुक्त झालेल्या कर्मचा-यांची माहिती व निवड प्रक्रियाची माहिती (७) विद्यार्थ्यांना शासनाचा नियमाप्रमाणे काय किती व केव्हा आहार जेवन व इतर वस्तु दिले जातात याची माहिती द्यावी."

सदरची माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. माहितीचा कालावधी २००२ ते आजपर्यंत २४.८.२००७ पर्यंत नमुद केला आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००७ रोजी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांचेकडे दाखल केले आहे.

**३.** प्रथम अपीलाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २४.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे आतापर्यंत कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही किंवा माहिती मिळाली नाही असे आयोगापुढे सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २२.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना पत्र दिले होते. त्या पत्राचे अवलोकन केले असता माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही, अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले दिसून येते. वास्तविक आश्रम शाळा ही अनुदानित आश्रम शाळा आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले व शासनाचे अनुदान मिळत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये आश्रम शाळा ही येते व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम हा सदरच्या संस्थेस लागू होते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(२)प्रमाणे कोणतीही माहिती मागण्याचे प्रयोजन विचारता येत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दिलेले उत्तर हे गैर आहे. मात्र, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती तयार करुन ठेवण्यात आली होती. परंतु व्यक्तीशः माहिती घेण्यास आले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, माहिती घेण्यास गेलो होतो परंतु त्याबाबत कोणताही पुरावा नसल्यामुळे निर्णय देणे शक्य होत नाही.

**५.** प्रथम अपीलाच्या संदर्भात मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी युपीसीने दिनांक १६.१.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्याबाबतचा जावक नोंदवहीचा

पुरावा हा जोडण्यात आलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे असे निष्पन्न होते.

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलसा केलेला आहे.

"उपरोक्त विषयांकित माहिती न दिल्याचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

(१) अर्जदाराने मुख्याध्यापकाकडे लिखीत स्वरुपात माहिती मागविली होती. अर्जदार स्वतः मुख्याध्यापकांना भेटले होते तेव्हा मुख्याध्यापकांनी त्यांना सांगीतले होते की, मी तुम्हाला आवश्यक असलेली माहिती तयार करतो व त्या कागदपत्रांची मोजणी करुन आपणाकडून नियमाप्रमाणे पैसे भरल्या नंतर आपल्याला माहिती देईल तेव्हा सात दिवसांनी आपण माझे शाळेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मला प्रत्यक्ष भेटावे. परंतु ते नंतर मला कधीही प्रत्यक्ष भेटलेले नाही व ते कागदपत्रांचे पैसे भरण्याकरीता हजर झाले नाही तसेच त्यांनी दिलेल्या अर्जामध्ये माहिती त्यांनी व्यक्तीशः मागीतलेी होती टपालाने मागीतलेली नव्हती. त्यामुळे अर्जदारास विहित मुदतीच्या आंत माहिती देता आली नाही.

(२) प्रथम अपीलात काय निर्णय झाला याची माहिती शाळेला मिळालेली नाही.

(३) सदर अर्जदार हे कन्हान येथे राहत असून त्यांची जय महाराष्ट्र संघटना ही नोंदनीकृत नसलेली कागदोपत्री छापून स्थानिक पत्रकारांमार्फत खोटी बदनामी करण्याचा अनेक शासकिय कार्यालयातून बळजबरीने पैसे उकळण्याचा व्यवसाय सुरु आहे असे आम्हाला समजले. मी खाजगी कामाकरीतता कन्हान येथे गेलो असता बाजार चौकात अर्जदार भेटले व म्हणाले मी बेरोजगार असून मला व्यवसाय करण्यासाठी चार चाकी गाडी जीप घ्यावयाची आहे. तेव्हा तुम्ही शाळेच्या संस्थाचालकाकडून १,००,०००/- रुपये मागून दया असे ठणकावून सांगीतले. मी म्हटले शाळा ही सेवाभावी असल्याने व शाळेचा कोणताही आर्थिक प्राप्तीचा व्यवसाय नसल्याने आपणास काही कारण नसताना पैसे देऊ शकत नाही. यानंतर त्यांनी 'देशोन्नती' या दैनिक वृत्तपत्रात दिनांक २ नोव्हेंबर, २००७ रोजी शाळेची बदनामी करणारी खोटी बातमी छापून आणली. त्या बातमीच्या अनुषंगाने आम्ही त्या शैक्षणिक वर्षात आरोग्य विभागाने दिलेल्या भेटीच्या व तपासणीच्या वेळी कोठलेही आजार नसल्याचे आढळले. अर्जदार व त्यांचे दोन कार्यकर्ते यांना ॲड.नितीनजी तेलगोटे यांचे द्वारा लेखी नोटीस देऊन कळविले व माफी

मागण्यास सांगितले तेव्हा ८.११.२००७ च्या देशोन्नती वृत्तपत्रात स्वत: वैद्यकिय अधिकारी व शाळेच्या वतीने खुलासा करण्यात आला परंतु अर्जदाराने कोणताही माफीचा खुलासा केलेला नाही.

यातून अर्जदार हा पैसे लुबाडण्याच्या हेतूने खोटया माहिती द्वारे बदनामी करीत असतो व मानसिक त्रास देत असतो हे सिध्द होते. शाळेच्या प्रगतीचा अहवाल आदिवासी विभागाच्या विविध अधिका-यांनी समाधानकारक व उत्तम असल्याचे नमुद केले आहे. असे असतांना संस्थेचे संचालक कोण व संस्थेची इतर माहिती काय असे विचारणे ही कोणत्याही जनहीताची माहिती नसल्याने शाळेने त्याला माहिती पुरविणे उचित समजले नाही."

**७.** तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारी हया आयोगाचे निदर्शनास आणल्या. परंतु सदरच्या तक्रारी हया आश्रम शाळेच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात असल्यामुळे त्यात तसे गैर काहीही नाही. मात्र त्याबाबतची चौकशी ही तक्रारदाराच्या उपस्थितीत करणे आवश्यक असते व तशी तक्रार आल्यास तक्रारदाराच्या उपस्थितीत सदरच्या तक्रारीची चौकशी करणे संयुक्तिक राहील. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांचे म्हणणे असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक १६.१.२००८ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती पुन्हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत व्यक्तीश: विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीश: संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६९/२००८**

**१) श्री हनमंतराव मोनाजी राऊत,**
**टिळकनगर, वार्ड क्रं.४ (वडसा रोड)**
**ब्रम्हपूरी-४४१२०६, ता.ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तलाठी सा.क्रं.२८,**
**हळदा, ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००७ रोजी श्री रणदिवे, सा.क्रं.२८, हळदा तलाठी मौजा हळदा तलाठी साजा क्रं.२८, मु.पो.हळदा ता.ब्रम्हपुरी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

"(१) माहे जुलै ऑगष्ट २००७ मधील अतिवृष्टी जी घरे पडली त्या पडलेल्या क्षतीग्रस्त घरांचे नुकसान झाल्याबाबत शासनाची मदत मिळण्या करीता ज्या शासकिय आदेशान्वये सर्व्हे करण्यांत आले त्या शासकिय आदेशाची परिपत्रकाची प्रमाणित प्रत मिळावी.

(२) वरील मु.क्रं.१ चे शासकिय आदेशान्वये मौजा हळदा येथील सन २००७ मध्ये पडलेल्या क्षतीग्रस्त घरांची शासकिय आर्थिक मदत मिळण्या करीता ज्या लाभार्थींच्या यादया तयार करुन मदतीकरीता प्रसतावित करण्यांत आलेल्या संपूर्ण लाभार्थींच्या याद्यांच्या प्रमाणित प्रती मिळाव्यात.

(३) प्रस्तावित याद्या मधील एकुण लाभार्थी संख्या किती. त्या प्रस्तावित लाभार्थ्यांच्या यादीमधील किती संख्या लाभार्थींना शासकिय आर्थिक मदत मिळाली. या प्रस्तावित लाभार्थींच्या याद्या मधील किती संख्या लाभार्थी शासकिय आर्थिक मदती पासून वंचीत राहीले आणि शासकिय आर्थिक मदती पासून वंचीत राहण्याचे कारणे कोणती.

(४) मौजा हळदा येथील सन २००७ मध्ये अतिवृष्टीने पडलेल्या घरांचे सर्व्हे कोणी केले. त्यांचे पूर्ण नांव व पदनाम देणे. पडलेल्या घरांचे किती वेळा सर्व्हे केले. त्याच्या तारखा देणे."

**३.** विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या माध्यमातून सुध्दा माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक ५.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली होती ती काही माहिती तलाठी कार्यालयात उपलब्ध होती. परंतु बहुतांश माहिती ही तहसिलदार कार्यालयात उपलब्ध होती म्हणून अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविण्यात आले असून शेतसारा येणे बाकी आहे त्याबध्दलही शेतसारा भरावा म्हणून कळविण्यात आले होते.

**५.** प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी असे सांगितले की, मागितलेल्या माहिती मधील बहुतांश माहिती ही तहसिल कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे ती माहिती घेवून जावी व त्याकरीता खर्चाचा भरणा करावा असे अपीलकर्ता यांना पत्र दिलेले दिसून येते. सदरचे पत्र हे अपीलकर्ता यांच्या टिळकनगर येथील पत्यावर पाठविण्यात आले होते. परंतु तीनही वेळेस चपराशी परत आला व त्यांनी खर्चाचा भरणा केलेला नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु सदरची माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध होत नसल्यामुळे विना मुल्य उपलब्ध करुन देण्याची तरतुद अधिनियमात आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे

अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २८.११.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या मुद्येनिहाय माहितीच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने विना मुल्य दिलेल्या पत्यावर उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Order०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६६/२००८**

**१) श्री नेमीचंद सदाराम डोये,**
**पिंपळगांव (खांबी),**
**ता. अर्जूनी(मोर), जिल्हा गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबत (१) मा. खासदार यांनी ६.७.२००५ रोजी जिल्हाधिका-यांना पाठविलेले राष्ट्रपती यांचे पत्र No.P२-२१७ (२) भा.द.वि.चे कलम २१७ अन्वये व कलम १९७, २०० फौ.संहिता अंतर्गत गुन्हेगार राशन दुकानदार आदीवर कारवाई करण्यासाठी मंजूरी मिळण्याबाबतचे मा. खासदारांनी दिलेले पत्र. (३) अर्जदाराचे वडीलाचे गट क्रं.६०२, ६०३ शेतीचे रेकार्ड पूर्ववत करुन देण्याबाबतचे मा. खासदारांचे पत्र."

**३.** अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.३.२००६ रोजी आपणास कोणती माहिती हवी आहे याबाबत कोणताही बोध होत नाही. तरी कृपया आपण या कार्यालयात दिनांक ३१.३.२००६ पुर्वी कार्यालयीन वेळेवर हजर राहून खुलासा करावा जेणेकरुन दस्तऐवजाच्या प्रती उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना दिनांक ४.४.२००६ रोजी पुन्हा खुलासा करण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना

सदरचे पत्र उपलब्ध झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे दिनांक १७.७.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये आपणास या कार्यालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करण्याकरीता या कार्यालयाचे उक्त संदर्भिय पत्र दिनांक ६.९.२००६, दिनांक २१.९.२००६ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु आपणास तीन पत्रे देवूनही आपण हजर झाले नाही. तसेच दिनांक ३०.९.२००६ रोजी आपले म्हणणे सादर करण्याकरीता हजर राहण्याकरीता कळविल्यानुसार दिनांक ३०.९.२००६ रोजी दुपारी ४.०० वाजता तीनदा पुकारा करुन सुध्दा आपण या कार्यालयास आपले म्हणणे सादर करण्याकरीता हजर झाले नाही व नोटीस घेण्याकरीता इंकार केल्यामुळे आपली तक्रार माहिती प्रलंबित नाही असे ग्रहीत धरुन आपले अपील प्रकरण नस्तीबध्द करण्यांत येत आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**५.** अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, मा.खासदारांच्या पत्रांच्या संदर्भात त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार दिसून येत नाही व त्यामुळे त्यांनी खुलासा करण्याकरीता अपीलकर्ता यांना कळविले होते.

**६.** अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता मा.खासदारांच्या पत्रांच्या संदर्भात कोणतीही तपशिलात माहिती त्यांनी दिलेली नाही व आयोगाकडे त्यांना स्वत: आलेल्या पत्राची प्रत त्यांनी दाखविली. त्यात जिल्हाधिकारी कार्यालयास कार्यवाही करण्याकरीता पत्र दिले असा उल्लेख आहे. परंतु ते पत्र कोणत्या तारखेस दिले, कोणत्या संदर्भात दिले असा कोणताही उल्लेख त्यात नाही. पत्र हे फक्त अपीलकर्ता यांना दिलेले आहे. व त्यावरुन माहिती मागणे किंवा उपलब्ध करुन देणे हे अशक्य आहे. माहिती ही जी कार्यालयात उपलब्ध असते त्या माहितीचे निश्चित वर्णन केल्यानंतर ती उपलब्ध होऊ शकते. पत्र अपीलकर्त्याला व माहिती जिल्हाधिकारी कार्यालयात मागणे हे योग्य नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी मा. खासदार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास दिलेल्या पत्राचे विवरण हे तारखेसहित जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील व तसे उपलब्ध करुन

दिल्यास अपीलकर्ता यांना त्याबध्दलची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना मा. खासदार यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविलेल्या पत्रांचे सविस्तर तारखेसहित माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती तपशिलात उपलब्ध करुन दिल्यानंतर अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७४/२००८**
**अपील क्रमांक १७५/२००८**

**<u>अपील क्रमांक १७४/२००८</u>**

**१) श्री देविदास जगन्नाथ जोशी,**
**गाळा क्रं.यु.०९/लक्ष्मी विहार, इमारत क्रं.२,**
**वर्धा रोड, सोमलवाडा, नागपूर-२५. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप अभियंता,**
**उपविभाग (लघुसिंचाई), रामटेक,**
**ता. रामटेक, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, रामटेक, जि. नागपूर. उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक १७५/२००८</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी, पं.स. पारशिवणी,**
**ता. पारशिवणी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**पंचायत समिती, पारशिवनी,**
**ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक .३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. **अपील क्रमांक १७४/२००८** अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून खंड विकास अधिकारी, पंचायत समिती रामटेक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"तत्कालीन सहा.अभिं-१, श्री एस.व्ही.काळे यांी एस.आर. रामटेके, शा.अ.यांना आ.रो.यो.अग्रीम रोकडे पुस्तिकेनुसार (१) दि. २९.३.२००० रु. १,७५,०००/-(२) दि. २४.४.२००० रु. १,५०,०००/- (३) दि. ४.५.२००० रु. १,५०,०००/- (४) दि. ५.६.२००० रु. १,५२,०००/-(५) दि. ६.६.२००० रु. १,७१,२५४/- वर प्रदान केलेल्या अग्रिम राखे रकमेचे लेखा जोखा कोण कोणत्या तारखांना खं.वि.अ. यांना कोणत्या क्रं. व दि.अन्वये सदर माहिती मला अतिशिघ्र डाकद्वारे कृपया उपरोक्त नमूद पत्यावर द्यावी."

**३.** **अपील क्रमांक १७५/२००८** मध्ये अपीलकर्ता यांनी दिैनांक १०.१.२००८ रोजी खंड विकास अधिकारी पंचायत समिती, पारशिवनी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"तत्कालीन सहा.अभि.१ लघुसिंचाई जि.प.उपविभाग, रामटेक श्री एस.व्ही.काळे यांनी श्री आर.एच. गुप्ता, शाखा अभियंता यांना आ.रो.यो. अंतर्गत खालील नमूद दि./रोख अग्रिम रक्कम (१) दिै. ५.२.२००० रु. ३,४०,०००/- (२) दिै. २३.२.२००० रु. ३,००,०००/- (३) दिै. २५.४.२००० रु. १,६५,२६४/- (४) दिै. ६.५.२००० रु. १,९९,३३६/- ज्या रकमा उपविभाग रामटेक मधील अग्रिम कॅश बुक नुसार आहेत त्यांचा लेखा जोखा हिशोब कोणत्या क्रं./दि. नुसार श्री काळे यांनी आपणांस दिला. (ब) श्री काळे यांनी आपणाकडे चालन क्रं. C-४१२९ दि. १४.७.२००० रोजी एस.बी.आय.पारशिवणी येथे रु. ४,८०,०३२/- केलेल्या भरण्याची रक्कम आपले पत्र दिनांक ६.६.२००२ रोजी परत करावयाचे कारण काय."

**४.** सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.१.२००८ रोजी एकुण २ मुद्यांमध्ये माहिती अधिकारी, पंचायत समिती, पारशिवनी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तसेच दिनांक २५.१.२००८ रोजी खंड विकास अधिकारी, रामटेक श्री एस.एन. पांडे व श्री एस.झेड. बुलकुंडे, खंड विकास अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी यांना एक पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्रामध्ये दिनांक १८.१.२००८ चे पत्र त्यांना उपलब्ध झालेले आहे असे लेखी कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते.

**५.** प्रथम अपील हे अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे सादर केले होते व त्यामुळेच सदरच्या अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

**६.** द्वितीय अपील मेमो मध्ये "श्री एस.व्ही.काळे, सहा.अभियंता यांनी अकारण जमा केलेली रक्कम रुपये ४,८०,०३२ बाबत माहिती प्राप्त परंतु श्री आर.एच. गुप्ता शा.अ.कडील प्रलंबित रक्कम रुपये ८,५६,६४२/- बाबत माहिती अप्राप्त" असे द्वितीय अपीलाचे कारण दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक १८.१.२००८ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती श्री एस.व्ही.काळे यांनी चालानद्वारे बँकेत जमा केले त्याबाबत या कार्यालयास कोणताही लेखी पत्रव्यवहार केलेला नसल्यामुळे पत्र क्रमांक व दिनांक पुरविता येत नाही. व त्यानंतर जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती ही वस्तुस्थिती आहे. परंतु, त्याबाबतही अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नाही व त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना संपुर्ण तपशिल अद्यापपर्यंत कळविलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संपुर्ण नस्तींचे निरीक्षण करुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे दोनही अपील अंशता मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १७४/२००८ व अपील क्रमांक १७५/२००८ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १०.१.२००८ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपुर्ण अभिलेखे उपलेखापाल यांचेकडे असलेल्या अभिलेख्यांचे निरीक्षण करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ ही उपलेखापाल यांना कळवून त्यावेळेस उपलेखापाल यांनी अपीलकर्ता यांना संपुर्ण अभिलेखे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे व माहिती उपलब्ध झाल्यास त्याच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७६/२००८**
**अपील क्रमांक १७७/२००८**

**<u>अपील क्रमांक १७६/२००८</u>**

**१) श्री अविनाश केशवराव खापर्डे,**
**भिमनगर, पाणी टॉकी समोर, कामठी,**
**ता. कामठी, जिल्हा नागपूर-४४१००२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी नझुल विभाग,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक १७७/२००८</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी नझुल विभाग,**
**तहसिल कार्यालय कामठी, ता.कामठी, जि.नागपूर** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी नझुल विभाग,**
**तहसिल कार्यालय कामठी, ता. कामठी, जि.नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १७.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपील क्रमांक १७६/२००८ मध्ये दिनांक १०.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"अतिक्रमण हटविण्याबाबत माझ्या वडीलांनी आपल्या कार्यालयात दिलेल्या अर्जावर अजूनपर्यंत कारवाई करण्यात आली नाही करीता दिलेल्या अर्जाचा प्रवास प्रगती यांचा तपशिलाचा अहवाल देण्याबाबत. सिलींग या कार्यालयाने दि. ६.१२.१९९६ अतिक्रमण हटविण्याबाबत आपल्या कार्यालयात दि. १५.९.१९९७, १७.५.९७, ३०.६.९७, २३.१.९८ केशवराव तानबाजी खापर्डे माझे वडीलांनी अर्ज दिला. तसेच दि. ९.१०.९७, ३.३.९८ मी अविनाश खापर्डे अर्ज दिला. अजूनपर्यंत

गैरअर्जदाराने अतिक्रमण हटविण्यात आले नाही. करीता मी व माझ्या वडीलांनी दिलेल्या अर्जाचा प्रवास प्रगती यांचा तारखेनिशी अहवाल देण्याबाबत अर्ज सादर. तसेच अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा नागपूर यांनी आपल्या कार्यालयाला पाठविलेल्या पत्राचा क्रं.युएलपी/नभुअ/कावि-३५५/९३३/९६, दि. ६ डिसेंबर, १९९६ अतिक्रमण हटविण्याबाबत." सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

**३.** अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**४.** अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांनी अपील क्रमांक १७६/२००८ आपल्या कार्यालयातून प्राप्त झाल्यानंतर काय कार्यवाही करण्यात आली याबाबत तहसिलदार कामठी यांना पत्र पाठवून विचारण्यात करण्यात आली असता त्यांनी कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले. कार्यवाही नंतर खुलासा सादर करण्यात येईल असे सांगितले. आज दिनांक १७.३.२००९ ला तहसिलदार कामठी यांनी खुलासा सादर केला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा दिलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१२.२००७ रोजी दाखल केलेले प्रथम अपील कार्यालयात उपलब्ध झाले नाही असा आयोगापुढे खुलासा दाखल केला आहे.

**५.** अपीलकर्ता यांचा दिनांक १०.१०.२००७ चा अर्ज तसेच प्रथम अपीलीय अधिकारी अप्पर जिल्हाधिकारी नझुल विभाग यांचेकडे दाखल केलेले प्रथम अपील हे कार्यालयात उपलब्ध नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सदरचे दोनही अर्ज हे पोस्टाने पाठविले होते. परंतु त्याकरीता कोणताही पुरावा अपीलकर्ता यांनी दाखल केला नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयातील आवक कक्षामध्ये चौकशी करणे आवश्यक आहे. व चौकशी अंती दोषी असलेल्या कर्मचा-यांच्या विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक १७७/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २३.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी (नझुल) तहसिलदार कार्यालय, कामठी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"मनोहर विक्रम गजभिये यांनी केलेले अतिक्रमण आज पर्यंत कां काढून देण्यात आले नाही. घर क्रं. T३६१३७ च्या जागेवर केलेले अतिक्रमण. पोलीस स्टेशन कामठी केस नं.७७/९६ आणि ४५/९७ नझुल अधिकारी नागपूर केस क्रं.१५३५/९६ यांनी चौकशी करुन अतिक्रमण हटविण्याकरीता आपल्या कार्यालयातून सांगितले तरी आपल्या कार्यालयाने अजून पर्यंत अतिक्रमण हटविण्यात आले नाही. केस क्रं.७७/९६ मध्ये मला आरोपी बनविण्यात आले. करीता मला माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत लवकरात लवकर मी मागितलेली माहिती देण्यात यावी. तसेच आपल्या कार्यालयात वेळोवेळी अतिक्रमण हटविण्यात यावे करीता अर्ज देण्यात आलेले आहेत."

७. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती जूनी असल्यामुळे दिनांक ७.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांना कार्यालयात येवून कोणत्या प्रकारची माहिती पाहिजे आहे याबध्दलचा खुलासा करावा जेणेकरुन अर्जाचा ताबडतोब निकाल लावण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर दिनांक २९.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी खुलासा दिलेला दिसून येतो. परंतु विहिती मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ११.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात व माहितीच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक १७.१.२००८ रोजी ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

८. अपीलकर्ता यांनी अतिक्रमण कां काढण्यात आले नाही अशा प्रकारची माहिती विचारलेली दिसून येते. त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना वेळोवेळी पत्र दिलेले आहे असे दिनांक १७.१.२००८ च्या उत्तरात दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र त्यांना त्यावेळेस सुध्दा मिळालेले नाही. त्यातही मुद्या क्रं. ४ मध्ये उक्त प्रकरण सन १९९६-९७ चे असून प्रकरण नष्ट केल्याचे दिसून आले असे कळविण्यात आले आहे. परंतु, अपीलकर्ता

यांचे म्हणणे असे आहे की, सर्व प्रकरणे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत व ती नष्ट करण्यात आलेली नाहीत, अशी त्यांची माहिती आहे. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी सुध्दा जी कागदपत्रे उपलब्ध करुन घेतलेली आहे व त्यावरुन पुर्वीचा पत्रव्यवहार आयोगाचे निदर्शनास आणलेला आहे. यावरुन सदरच्या प्रकरणातील कागदपत्रे जी उपलब्ध असतील ती अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

**९.** माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणातील कार्यवाही करण्याच्या संदर्भामध्ये तरतुदी नाहीत. व त्यामुळे मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध होतात. त्याकरीता अपीलकर्ता यांनी तहसिलदार कामठी येथील त्यांच्या संबंधीत नस्तींची पाहाणी केल्यास त्यांना त्याबाबतची कागदपत्रे ही उपलब्ध करुन घेता येतील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रं.१७६/०८ व १७७/०८ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या संपुर्ण प्रकरणाची नस्ती ही पाहाणीकरीता हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी कार्यालयीन वेळेत जन माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळवावी. संबंधीत नस्तीची पाहाणी करावी व त्यात आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती हया उपलब्ध करुन घेण्यात याव्यात. सदरच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता यांना विनामुल्य देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७८/२००८**

**१) श्री गणेशचंद्र सुधाकरराव लखमापुरे,**
**विमलाई नामदेव मठाजवळ, मालगुजारी पुरा,**
**वार्ड नं.३३, वर्धा, ता.जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**तिवसा, ता. तिवसा, जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातून कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल झालेली नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तिवसा हे सुध्दा सुनावणीस गैरहजर आहेत. आयोगाने नोटीस दिनांक १८.२.२००८ रोजी काढली असून सुनावणी आज ठेवण्यात आली आहे. व हया कालावधीमध्ये उत्तरवादी यांना नोटीस मिळालेली असेल असे गृहीत धरावयास हरकत नाही. व त्यामुळे तहसिलदार तिवसा व जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयाने राज्य माहिती आयोगाचा अवमान केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यांच्या विरुध्द विभागीय आयुक्त अमरावती यांनी योग्य ती प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक राहील.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तिवसा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"१२.६.८४ ते ३०.९.१९८७ व मार्च २००५ ते मार्च, २००६ सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत. १२.६.८४ ते ३०.९.८७ पर्यंतचे निलंबन काळात देण्यात आलेल्या निलंबन भत्याचा तपशिल. प्रोव्हीजनल पेंशन देतांना सेवाकाल गणनेचा तपशिल. प्रोव्हीजनल ग्राच्युईटी D.C.R.G. न देण्याची कारणे.

निवृत्ती वेतन मंजूर करण्याबाबत कार्यवाहीचा तपशिल."सदरची माहिती पंजीबध्द टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

**३.** अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ८.९.२००६ रोजी नायब तहसिलदार तथा माहिती अधिकारी तिवसा यांनी अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही सेवा अभिलेखाशी संबंधीत असल्याने शासन निर्णय दिनांक ३१.७.२००३ अन्वये मुद्या क्रं. (१६)(च) अन्वये देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. मात्र पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २८.९.२००६ रोजी त्याच संदर्भात तपशिलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००६ चे अपील पुन्हा दाखल केलेले दिसून येते. त्यात अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२००६ ला अपील अर्ज रजिस्टर पोस्टाने दाखल केला आहे असाही उल्लेख केलेला दिसून येतो. व त्यावरुन दिनांक २७.११.२००६ चे अपील पुन्हा दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांना दिनांक २८.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सविस्तर असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र अर्जदाराने त्यांच्या सेवाविषयक माहिती मागितली असल्यास ती उपलब्ध करुन देता येत नाही अशा प्रकारचे जे उत्तर दिलेले आहे ते अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही सेवा विषयक माहिती ही अधिनियमाच्या कलम ४ प्रमाणेच प्रसिध्द करावयाची असल्याने ती गोपनिय आहे असे म्हणता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक होते. व तशी ती त्यानंतर उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येते.

**४.** तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी यांना दिनांक १८.१२.२००६ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात स्पष्टीकरण दिलेले दिसून येते. वास्तविक सदरचे स्पष्टीकरण हे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, उपलब्ध झालेली माहिती ही चुकीची आहे. अर्थात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये जशी माहिती उपलब्ध असते तशी ती उपलब्ध करुन देता येते. व ती कागदपत्राच्या स्वरुपात जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तिवसा यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु, दिनांक २८.९.२००६ रोजी माहिती ही तयार

करुन देण्यात आलेली असल्यामुळे व गुणवत्तेच्या संदर्भात ती चुकीची आहे असे अपीलकर्ता यांनी म्हटले आहे. वास्तविक गुणवत्तेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा आदेश देण्याची तरतूद ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००६ रोजी जे स्पष्टीकरण दिलेले आहे ते अर्थातच प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात आहे व ती त्यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे मांडणे आवश्यक आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सेवा पुस्तीकेची दुय्यम प्रत उपलब्ध करुन देणे व इतर मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कागदपत्रे उपलब्ध असल्यास त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.८.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्याच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८२/२००८**
**अपील क्रमांक १८३/२००८**
**अपील क्रमांक १८४/२००८**
**अपील क्रमांक १८५/२००८**

**१) श्री माधव अर्जून खुटेमाटे,**
**चवरे ले आऊट, प्लॉट नं.१९, गुरुद्वाराच्या मागे,**
**पाण्याच्या टाकीजवळ(तुकूम) चंद्रपूर,**
**ता.जि.चंद्रपूर-४४२४०१.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक,**
**अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर,**
**ता.जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहे. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १७.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपील क्रमांक १८२/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी कार्यालय अधिक्षक, भूमी अभिलेख, चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केले आहे.

"श्री वि.ग.खांडरे, प्रमुख लिपिक, कार्यालय अधीक्षक भूमी अभिलेख, चंद्रपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचे यशदा पुणे या संस्थेकडून प्रशिक्षण केव्हा घेतलेध याविषयीचे दिनांकासह कालावधीची माहिती अर्जदारास पुरवावी, ही विनंती."

**३.** अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.११.२००७ रोजी "अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कर्मचा-यांची वैयक्तिक माहिती असल्याने पुरविण्याचा प्रश्न येत नाही

असे निर्देश त्यांना देण्यात आलेले आहे" असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २१.११.२००७ रोजी कार्यालयीन अभिलेख्यात उपलब्ध असलेल्या प्रतीची फी रुपये ४०/- भरणा केल्यास आपणास माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी रुपये ४०/- चा भरणा दिनांक ३१.१.२००८ रोजी केलेला असून त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी श्री वि.ग.खांडरे, प्रमुख लिपिक यांच्या प्रशिक्षणाबध्दलची माहिती मागितली होती. ती कार्यालयीन अभिलेखाचा भाग असल्यामुळे ती कर्मचा-यांची वैयक्तिक माहिती होऊ शकत नाही परंतु जन माहिती अधिकारी यांची स्वतःची माहिती असल्यामुळे त्यांनी दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबध्दल नक्कल फी रुपये ४०/- चा भरणा करण्यास कळविले आहे. परंतु अशा प्रकारची तरतुद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाही. माहितीचा अर्ज आल्यानंतर ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद कलम ७(२) मध्ये आहे. प्रथम अपीलात तर कोणत्याच प्रकारे माहितीच्या खर्चाकरीता मागणी करता येत नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे टाळाटाळ केलेली आहे व जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याकरीता सुध्दा रुपये ४०/- हे अतिरिक्त खर्चाकरीता घेतलेले आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक पृष्ठाला रुपये २/- अशी आकारणी करावयाची असते व त्यामुळे एकुण पृष्ठये ५ असल्यामुळे रुपये १०/- ची आकारणी केली असती तर ती वाजवी झाली असती. परंतु, एकुण रुपये ४०/- ची आकारणी ही अवास्तव आहे व ती माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने टाळाटाळ करण्याचाच हा प्रकार आहे असा अपीलकर्ता यांनी युक्तीवाद केला.

**७.** अपीलकर्ता यांनी केलेल्या युक्तीवादाच्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झाल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांना त्याबध्दल माहिती नाही असे त्यांनी सांगितले. तरीही कागदपत्रावरुन व अपीलकर्ता यांच्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येते व त्यामुळे ते अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र आहे.

८. प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा अधिनियमाची तरतुदींची कोणतीही माहिती दिसून येत नाही. व यशदाकडून प्रशिक्षण घेतलेले असल्यामुळे त्या प्रशिक्षणाचा कोणताही उपयोग झालेला आहे असे दिसून येत नाही. यशदाने मात्र प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत उत्साही सहभागाबध्दल प्रशस्तीपत्र दिलेले दिसून येते. मात्र, माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे प्राथमिक ज्ञान सुध्दा आहे असे त्यांच्या अर्ज व अपीलावरील कार्यवाही वरुन दिसून येत नाही व प्रशिक्षण उपयुक्त होत आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**९.** **अपील क्रमांक १८३/२००८** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, भूमी अभिलेख चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"श्री मा.अ.खुटेमाटे, छा.ली.कार्यालय तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, वरोरा यांना दिनांक १२.५.२००७ चे पत्रान्वये वैद्यकिय मंडळाकडे तपासणीसाठी पाठविले. याविषयीची नियमांतर्गत तरतुद कोणती. (ब) श्री वि.ग.खांडरे, प्र.ली.यांना स्वतःचे स्वाक्षरीने मा.अध्यक्ष, वैद्यकिय मंडळ, इंदिरा गांधी वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर यांना अन्य कार्यालयातील कर्मचा-यांचे तपासणीसाठी पत्रव्यवहार करणेचे अधिकार आहेत काय. (क) किंवा तसे अधिकार नसल्यास त्यांचे विरुध्द कार्यालयाने आतापावेतो काय कारवाई केली. (iv) अर्जदार माहिती स्वतः नेण्यास तयार आहे." सदरची माहिती स्वतः नेण्यास तयार आहे असे नमूद केले आहे.

**१०.** अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १.१०.२००७ रोजी उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे. तथापि, कोणत्याही प्रकारची माहिती तयार करुन पुरविणे

अपेक्षित नसून अभिलेख्यांच्या स्वरुपात उपलब्ध असेल तशी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असून कोणत्याही प्रकारे अभिप्रायात्मक प्रश्नांची उत्तरे माहिती काढून तयार करुन देणे अपेक्षित नाही. सबब अर्ज फेटाळण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**११.** प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २७.११.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**१२.** अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली होती ती, जर प्रश्नार्थक स्वरुपात असली तरी त्यातून नियमांतर्गत तरतूद कोणती असे विचारलेले असल्यामुळे नियमांच्या छायांकित प्रती देणे अपेक्षित असते व त्यामुळे मुद्या अ,ब प क मधील माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु त्याबाबतही माहिती उपलब्ध करुन देण्याचे टाळाटाळ केलेले दिसून येते.

**१३.** प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारचे स्वत: आकलन करुन न घेता उत्तर दिलेले दिसून येते व त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी संगनमत करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचे टाळाटाळ केलेले आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो. मात्र, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे. व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे टाळाटाळ केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक ठरते.

**१४.** **अपील क्रमांक १८४/२००८** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, भूमी अभिलेख चंद्रपूर यांचेकडे एकुण तीन मुद्यांचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी अर्जदार यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता माहिती अधिकारी, २००५ मधील कलम २ (च)(त्र) च्या "माहिती" व

"माहितीचा अधिकार" संज्ञा लक्षात घेता कोणत्याही प्रकारची माहिती तयार करुन पुरविणे नसून एखादया प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली ज्या स्वरुपात ती उपलब्ध आहे त्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित असून कोणत्याही प्रकारे प्रश्नांची उत्तरे वा माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न

झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**१५.** प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २७.११.२००७ रोजी उपलब्ध असलेल्या प्रतीची नक्कल फी रुपये १०/- भरणा केल्यास आपणास माहिती पुरविण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

**१६.** अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मुद्दा क्रं. अ मधील माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होऊ शकते व त्यासंदर्भातील आदेशाची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मुद्दा क्रमांक ब व क मधील जी माहिती विचारलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात अभिप्राय अपेक्षित नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते काहीही विचार न करता उत्तर दिलेले दिसून येते. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असाच अर्थ होतो.

**१७.** वरील अपील निर्णयात नमूद केल्याप्रमाणे ३० दिवसांच्या नंतर माहिती उपलब्ध करुन दिली असेल तर ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी लागते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्ता यांना रुपये १०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. ती फी अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००८ रोजी भरलेली आहे. परंतु जी माहिती मिळाली ती चुकीची आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

**१८.** श्री आ.जा.धकाते, निमतनदार यांनी कार्यभार कोणत्या दिनांकास स्विकारला अशी माहिती विचारली होती. परंतु प्रभारी शिरस्तेदार कोणत्या दिवशी हजर होते अशी माहिती दिली. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी संगनमताने अपीलकर्ता

यांना माहिती उपलब्ध करुन देऊ नये असे ठरविलेले दिसून येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**१९. अपील क्रमांक १८५/२००८** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती, माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, भूमी अभिलेख चंद्रपूर यांचेकडे मागितलेली दिसून येते.

"(अ) श्री वि.ग.खांडरे यांनी अपंगत्व भत्ता घेणेसाठी कार्यालयास दाखल केलेल्या मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत पुरवावी. (ब) श्री वि.ग.खांडरे यांनी अ.भू.अ. कार्यालयातून आतापावेतो किती अपंगत्व भत्ता घेतली त्याची एकुण रक्कम कळवावी. (iv) अर्जदार माहिती स्वतः नेण्यास तयार आहे. व त्याकरीता नियमाप्रमाणे आवश्यक ती फी भरण्यास तयार आहे."

**२०.** सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.१०.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु फी चा भरणा केल्यासच माहिती पुरविण्यात येईल असेही कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**२१.** प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २७.११.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नक्कल फी रुपये २०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००८ रोजी फी भरणा केल्यावर त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु ती माहिती दिशाभूल करणारी आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

**२२.** उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध करुन दिलेली माहिती यात विसंगती आहे. व त्यामुळे याही बाबतीत माहिती उपलब्ध करुन देण्याचे टाळाटाळ केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक ठरते. व माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**२३.** अपीलकर्ता यांनी वरील अपीलाच्या संदर्भात अधिनियमाचे कलम १८(१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे, असे सदरच्या अपीलाच्या सुनावणीचे दरम्यान आयोगास सांगितले. अपीलांचा निर्णय देण्यात आल्यामुळे त्यांची आयोगाकडील तक्रार खारीज करण्यात येत आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १८२/२००८, अपील क्रं.१८३/२००८, अपील क्रं.१८४/२००८ व अपील क्रं. १८५/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून या चारही अपीलांमध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापसून १० दिवसांचे आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचेकडून वरील चारही अपीलाच्या संदर्भात माहितीच्या कागदपत्रांकरीता जो अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला आहे तो हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अर्जदारास परत करण्यात यावा.

३) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक हे जरी सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांच्या विरुध्द चारही अपीलांमध्ये प्रत्येकी रुपये ५००/- (रुपये पाचशे) ची शास्ती कां लादण्यांत येवू नये याचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा अन्यथा शास्ती कायम होईल व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडून सदरच्या रकमेची वसुली ही अधीक्षक भूमी अभिलेख यांनी करुन तसा आयोगाकडे अहवाल सादर करावा.

४) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे पालन केले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करावी.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

६)	अपीलकर्ता यांची वरील अपीलांचे संदर्भात आयोगाकडे केलेली तक्रार खारीज करण्यात येत आहे.

७)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८९/२००८**

**१) श्री भगवान मोतीराम चनकापुरे,**
**प्लॉट क्रं.६/अे समोर, वर्मा ले आऊट,**
**अंबाझरी नागपूर-४४००३३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधिकारी,**
**राजस्व अभिलेखागार विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"(अ) नियमाप्रमाणे पैसे भरुनही जन्मशोध प्रमाणित प्रत का दिल्या जात नाही. (ब) प्रमाणित प्रतीचे पैसे भरल्यावरही प्रमाणित प्रत तयार करुन ठेवायला पाहिजे ते कां करण्यात आले नाही. (क) प्रमाणित प्रत न मिळाल्यामुळे दररोज कार्यालयात चकरा मारणे यामुळे मला शारिरिक व मानसिक त्रास झाला याला जबाबदार कोण. (ड) मी ज्या तारखेला प्रमाणित प्रत मिळावी म्हणून अर्ज केला त्याच दिवशी किती लोकांना प्रमाणित प्रती देण्यात आल्या. (इ) प्रमाणित प्रत देण्याबाबत या कार्यालयाची पध्दत काय आहे."

**३.** अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.१०.२००७ ही तारीख असलेली माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. परंतु माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

**४.** प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.११.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीने आपण दिनांक २५.९.२००७ च्या अर्जानुसार संपुर्ण माहिती न पुरविल्यामुळे त्या अर्जानुसार अर्जातील मुद्या क्रमांक अ ते इ वरील माहिती किंवा त्या मुद्यांवरील आपला निर्णय नियमानुसार अपीलार्थीना तात्काळ कळविण्यात यावा याबाबत या कार्यालयास कळविण्यात आलेले दिसून येते. यावरुनही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

**५.** अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.९.२००७ च्या अर्जाचे संदर्भात अपीलकर्ता यांना वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक २५.१०.२००७ ही तारीख असलेली माहिती उपलब्ध झाल्याचे दिसून येत असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदरची माहिती ही दिनांक २९.११.२००७ रोजी उपलब्ध झालेली आहे व पोस्टाच्या पत्रावर सुध्दा दिनांक २६.११.२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येते. यावरुन माहिती उपलब्ध करुन दिलेल्या पत्रावर दिनांक २५.१०.२००७ दिलेले असले तरी आयोगाकडे सादर करतांना त्यात २५.१०.२००७ असेच केले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्याकरीता तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान झाले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या मुद्या क्रं. क च्या संदर्भामध्ये त्या कालावधीत अपीलकर्ता उपस्थित झाले नाही त्याकरीता रेकार्ड रुम किंवा कॅापिंग विभाग जबाबदार नाही असे उत्तर दिलेले आहे. परंतु याबाबत दोनही बाजूंनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

**६.** वास्तविक, प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देण्यात आला असता तर अपीलकर्ता यांना त्यावेळेसच माहिती उपलब्ध झाली आहे किंवा नाही याबध्दलचा निर्णय देता आला असता. परंतु आदेश वजा पत्र दिलेले असल्यामुळे त्यात जन माहिती अधिकारी यांनी खरोखर माहिती उपलब्ध करुन दिली आहे किंवा नाही याबाबतचा कोणत्याही प्रकारचा उल्लेख नाही. व त्यामुळे

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही जिल्हाधिकारी नागपूर यांनी करावयाची आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९१/२००८**
**अपील क्रमांक १९२/२००८**
**अपील क्रमांक १९३/२००८**

**१) श्री पांडुरंग चिंतामन पराते,**
**मु.पो. पालांदूर (चौ.),**
**ता.लाखनी, जिल्हा भंडारा-४४१८११ अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(मा.)**
**जिल्हा परिषद, भंडारा. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा.),**
**जिल्हा परिषद, भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.३.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपील क्रमांक १९१/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(मा.) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

" (१) मान्य शिक्षक संचानुसार विद्यालयात एकुण ९ शिक्षक कर्मचारी मान्य आहेत व ९ शिक्षक कर्मचा-यांना मान्यता प्रदान करण्यात आली होती. तेव्हा सत्र २०००-०१ पर्यंत २५ टक्के पदविधर शिक्षक पदास मान्यता प्रदान करण्यात आली होती काय. शिक्षक यादी सोबत जोडली आहे. (२) आपले कार्यालयीन पत्र क्रं. ७४१२/९९ दिनांक ३१.१२.९९ नुसार श्री शिवणकर हाय.शिक्षकांचे संचात बसत नाही म्हणून मान्यता नाकारण्यात येत आहे असे कळविले आहे.

सत्र ९५-९६ व ९६-९७ मध्ये शिवणकर यांना हाय. विभागात मान्यता प्रदान करण्यात आली होती व नंतर स९ा ९९-२००० पर्यंत हायस्कुलमध्ये नियुक्ती करण्यात आली होती. २५ टक्के पदविधर शिक्षक पदावर श्री कान्हेकर यांची नियुक्ती करण्यात आली होती.

कोणत्या नियमानुसार श्री शिवणकर हायस्कुल शिक्षक संचात बसत नाही असे कळविण्यात आले. (३) श्री एस.आर.शिवणकर यांची नियुक्ती मा.शिक्षणाधिकारी (मा.) यांनी कोणत्या नियमानुसार सत्र ९९-२००० मध्ये हायस्कुलवरुन मिडलस्कुलवर करण्यास तोंडी आदेश दिले. (४) मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी त्यांच्या तोंडी आदेशान्वये केलेल्या नियुक्तीस कोणत्या नियमानुसार मान्यता प्रदान केली. (५) श्री एस.आर. शिवणकर यांना सत्र ९९-२००० मध्ये ४५००-७००० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली तेव्हा शासन परिपत्रक क्रं.अमाशा/३०९५/क दिनांक १९.६.९५ नुसार २० रु.च्या स्टँम्प पेपरवर सदर वेतनश्रेणीत श्रेणीत काम करण्यास तयार असल्याचे हमीपत्र लिहून घेण्यात आले होते. सदर वेतन श्रेणीत सेवासातत्य सुध्दा करण्यात आले होते. तेव्हा त्यांना कोणत्या नियमानुसार सत्र ०४-०५ मध्ये ५५००-९००० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. (६) शासन परिपत्रक क्रं.अमाशा/३०९५/क दिनांक १९.६.९५ व परिपत्रक क्रं.अमाशा/४१ २००१/क दिनांक २७.७.२००१ नुसार रिक्त पद भरण्यास मंजूरी प्रदान करतांना विषय निहाय शिक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे व ज्या विषयाचा कार्यभार उपलब्ध असणे आवश्यक आहे. तेव्हा विद्यालयात बी.एस.सी.(जीव) बी.एड. शिक्षकाचा कार्यभार उपलब्ध नसतांना (श्री एच.के. भूरे बी.एस.सी.जीव. बी.एड.धारक आहेत) कोणत्या नियमानुसार सत्र ०६-०७ मध्ये सदर पात्रता धारकाची नियुक्ती करण्यास मंजूरी प्रदान करण्यात आली. (७) मा. शिक्षणाधिकारी यांच्या तोंडी आदेशानुसार केलेली नियुक्ती व मान्यता कोणत्या नियमानुसार वैद्य आहे. (८) मा. शिक्षणाधिकारी (मा.) यांनी कोणत्या नियमानुसार विद्यालयाचे सत्र ९४-९५ चे सत्र ०६-०७ पर्यंतचे मंजूर व मान्य असलेले सेक्टर बिंदू नामावली बदलविण्यास सूचना दिल्यात. (रोस्टर मध्ये तशी नोंद आहे.)"

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २.७.२००७ रोजी दिनांक ६.६.२००७ ला सुनावणीस उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले

दिसून येते. परंतु, सुनावणी झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००८ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १३.२.२००७ रोजी घेण्यात येवून दिनांक १७.३.२००८ रोजी अपीलकर्ता यांना निर्णयाची प्रत दिलेली असून मुद्या क्रं.१ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात. त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती माहिती ही मुद्या क्रं. १ ची माहिती आहे व इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलाच्या निर्णयात ती अभिप्रायात्मक प्रश्नांच्या स्वरुपात असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचा निर्णय हा योग्य आहे. परंतु विलंबाने माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रमांक १९२/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(मा.) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) श्री एस.एस. कान्हेकर यांची नियुक्ती व मान्यता २५ टक्के पदविधर शिक्षक पदावर ५५००-९००० वेतनश्रेणीत होती. हायस्कुल विभागात वर्ग ८ ते १० चे ४ शिक्षक पुर्वीपासूनच कार्यरत होते. त्यामुळे हायस्कुल विभागात जागा रिक्त नव्हती. पदोन्नतीकरीता जागा रिक्त असणे आवश्यक आहे. हायस्कुल विभागात पदोन्नती करण्याबाबत विद्यालयाने प्रस्ताव पाठविलेला नाही. तेव्हा श्री कान्हेकर यांची कोणत्या नियमानुसार हायस्कुल विभागात पदोन्नती झाली असे समजण्यात येते. (२) हायस्कुलमध्ये दोन कलाअहर्ताधारकाचे कर्मचा-यांचे न्यायालयीन प्रकरण होते त्यामुळे त्यांची पदोन्नती कोणत्या नियमानुसार वैद्य आहे. (३) सत्र ९५-९६ व ९६-९७ शिवणकर यांना हायस्कुल विभागात मान्यता प्रदान करण्यात आली होती. सत्र ९७-९८ ते ९९-२००० पर्यंत हायस्कुल विभागात नियुक्ती करण्यात आली होती. कोणत्या नियमानुसार पत्र क्रं.७४१२/९९ दिनांक ३१.१२.९९ अन्वये श्री शिवणकर यांना हाय. विभागात

(हाय.शिक्षक संचात) बसत नाही असे म्हणून मान्यता नाकारण्यात आली. (४) विद्यालयात श्री पी.जे.भोयर व श्री के.आर. कठाणे यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ होते तेव्हा श्री एस.आर.शिवणकर व श्री पी.सी. पराते यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

श्री पी.जे. भोयर यांचे ऐवजी श्री. पी.सी.पराते यांची नियुक्ती नाही असे संस्थेने पत्र क्रं.८० दिनांक २७.६.९७ नुसार आपल्याला कळविले आहे व श्री के.आर.कठाणे यांचे ऐवजी पराते यांची नियुक्ती आहे असे मुख्याध्यापकानी पत्र क्रं.९०६/९९ दिनांक २४.७.०९ नुसार कळविले आहे. विद्यालयाच्या रोस्टर मध्येही तशीच नोंद आहे.

कोणत्या नियमानुसार पराते यांची नियुक्ती भोयर यांचे ऐवजी आहे असे समजण्यात येते. (५) विद्यालयात श्री पी.जे.भोयर व श्री के.आर.कठाणे यांचे न्यायालयीन प्रकरण सुरु असतांना श्री शिवणकर यांची नियुक्ती सत्र ९९-२००० पर्यंत हायस्कुल विभागात होती. २२.१२.९५ च्या शासन निर्णयानुसार श्री शिवणकर यांचे कडून हमीपत्र घेऊन हाय. विभागात मान्यता प्रदान करायला पाहिजे होती.

कोणत्या नियमानुसार श्री शिवणकर यांचे कडून २२.१२.९५ ची कार्यवाही न करता मिडलस्कुलवर तोंडी आदेशान्वये केलेल्या नियुक्तीस मान्यता प्रदान करण्यात आली.

वरील क्रं.१ ते ५ च्या संदर्भाने असलेल्या शासन निर्णयांची प्रती पुरविण्यात याव्यात."

६. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात सुध्दा दिनांक २.७.२००७ रोजी पत्र देवून दिनांक १०.७.२००७ रोजी उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.३.२००७ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्यात अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अभिप्रायात्मक प्रश्नांच्या स्वरुपात असल्यामुळे असे अभिप्राय (मत) उपलब्ध करुन देण्याची अधिनियमात तरतूद नसल्यामुळे अपीलकर्त्यांस माहिती पुरविण्यात आली नाही व त्यामुळे सदरचे प्रकरण नस्तीबध्द करण्यात आलेले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

७. अपील क्रमांक १९३/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी(मा.) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) श्री कान्हेकर यांची नियुक्ती व मान्यता २५ टक्के पदविधर शिक्षक पदावर करण्यात आली होती. श्री भोयर, श्री पुडके व कु. के.के. ठवकर यांची नियुक्ती मिडलस्कुल विभागात होती. मान्य शिक्षक संचानुसार वरील चार शिक्षक कर्मचा-यांच्या नियुक्त्या व मान्यता बरोबर आहेत. श्री कान्हेकर यांनी २५ टक्के पदविधर शिक्षक पदावरुन हायस्कुल विभागात पदोन्नती करण्यात आलेली नाही. वरील प्रकारे शिक्षक कर्मचारी कार्यरत असतांना श्री शिवणकर यांची नियुक्ती मिडलस्कुलवर ४५००-७००० वेतनश्रेणीत करण्यात आली. त्यामुळे मिडलस्कुल विभागात अतिरिक्त शिक्षक झाले. तेव्हा कोणत्या नियमानुसार अतिरिक्त शिक्षकांस मान्यता प्रदान करण्यात आली. (२) श्री शिवणकर यांना दिनांक १८.६.९९ ते परीक्षा कालावधी १८.६.९९ ते १७. .२००१ संपल्यानंतर सेवासातत्य मान्यता १८.६.२००१ ते ८.६.२००४ पर्यंत प्रदान करण्यात आली नव्हती. कोणत्या कारणामुळे दिनांक ८.६.२००४ पर्यंत तीन वर्षे पर्यंत मान्यता प्रदान करण्यात आली नव्हती. (३) अतिरिक्त शिक्षक शिवणकर यांना प्रथम ४५००-७००० वेतनश्रेणी मंजूर करणत आली होती. श्री शिवणकर यांचा ५५००-९००० वेतनश्रेणी वाढीचा प्रस्ताव क्रं.२८५५/०४ दिनांक ६.४.०४ ला पाठविण्यात आला. मात्र सदर वेतनश्रेणीस मान्यता प्रसतावापूर्वीच्या तीन वर्षे पूर्वीच्या दिनांका पासून १.८.२००१ पासून देण्यात आली. विद्यालयात प्रथमच २५ टक्के पदविधर शिक्षक पदावर ५५००-९००० वेतनश्रेणीत श्री कान्हेकर यांची नियुक्ती व मान्यता असतांना कोणत्या नियमानुसार अतिरिक्त शिक्षकास शिवणकर यांना २५ टक्के पदविधर शिक्षक वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली. (४) श्री शिवणकर यांची मिडलस्कुल विभागावर नियुक्ती व मान्यता मिळवितांना संस्थेने/मुख्याध्यापकाने कार्यालयाची दिशाभूल केली काय.

खालील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती पुरविण्यात याव्या.

(१) श्री शिवणकर यांचा दिनांक १८.६.९९ ते परिविक्षा कालावधी संपल्यानंतर सेवासातत्य करण्यासाठी पाठविलेला प्रस्ताव. (२) वरील सेवासातत्य नाकारल्याबाबतचे पत्र."

८.     विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.३.२००७ रोजी देण्यात आला असून प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितल्यामुळे ती पुरविता येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येते.

वास्तविक, सदरचा अर्ज दिनांक २०.६.२००७ मधील एकुण ८ प्रश्नांच्या संदर्भात जरी माहिती उपलब्ध करुन देता येत नसली तरी कागदपत्रांची माहिती जी दोन मुद्यांमध्ये मागितलेली आहे ती माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

९.     अपीलकर्ता यांनी तीनही अपीलांमध्ये मागितलेली माहिती बध्दल विहित मुदतीत उत्तर दिलेली नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांना ताकीद देण्यात येत असून सदरच्या ताकीदची नोंद त्यांच्या गोपनिय अहवालात घेणे संयुक्तिक राहील. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना संपुर्ण नस्ती दाखविण्यात आल्या असून त्यातून माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता परवानगी दिली होती. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१)     अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १९१/२००८ अपील क्रमांक १९२/२००८ व अपील क्रमांक १९३/२००८ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेली कागदपत्रे अवलोकन करुन हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळवून त्याप्रमाणे नस्तींचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या व पोच द्यावी.

२)     अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९८/२००८**

**१) श्री नामदेव दशरथ कोंगरे,**
**ह.मु.गडचांदूर वार्ड नं.५,**
**श्री आडकीने गुरुजी यांचे घरी,**
**पो. गडचांदूर, ता. कोरपना, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा,जि.यवतमाळ. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"मला आवश्यक त्या माहितीचे सहपत्र सोबत जोडलेले आहे. ती माहिती मला मिळण्याकरीता फी भरावी लागत असल्यास त्या फीची रक्कम मला सांगण्यात यावी त्याप्रमाणे ती फी भ्रण्यास तयार आहे. त्या रकमेची मला पावती देण्यात यावी. यापुर्वी दि. १७.२.२००७ ला जो अर्ज दाखल केला आहे त्यातही मी मला पाहिजे असलेल्या माहितीचा तपशिल दिलेला आहे. त्यांना मी फी बाबत विचारणा केली असता हजर असलेल्या लिपिकाने मला कोणतीही फी लागत नाही असे सांगितले त्यामुळे फी भरण्यात आलेली नाही.

With reference to my repeated applications for pvovision of CD work at approximately २.८ km from Purad, the following information may kindly be furnished.

१. Copy of index map showing the alignment.

२. Copy of the pages of field book and level book containing the details of the part of road between Village purad and Krushnapur. Copy of L section and cross sections of the ground along the alignment between these villages.

३. Talati Map ot the area between purad and krishnapur.

४. There is a natural drain running parallel to the common boundary of fields of Sh.Latari Garghate and Sh. Dhonduji Kongre. This is shown in all available land records pertaining to village Kundra. The storm water used to drain in Ishwar nallah away from the present bridge site. Was the CD work proposed at the crossing of this drain and the constructed road. If yes, why was the work not executed. If no, what is the justification for not providing it. Can the department divert the natural drains when there are no restricting conditions for provising CD works.

५. How many CD works have been provided on the road between Purad and Krishnapur. Give their locations. Design Descharges and justifications given in original proposals to provide the same.

६. IRC recommendations/Govt.Norms/Departments Specifications for providing Cross Drainage Works. Whether these were followed in all the cases of CD works in the work under reference.

७. Copies of Technical sanction and administrative approval for these works.

८. By not provising the CD work at the said location, the Department has diverted all the storm water to the bridge site. Does it not

undermine the stability/safty of the approach road with unprotected slopes and the bridge.

९. What was the design discharge taken into consideration for designing the side drain near the bridge. What was the design gradient of the side drain meeting the Ishwar nalla.

१०. How many times repair works were carried out at or near the bridge site. What was the natue of repairs. Why was it required . What was the cost.

११. The Hume pipes used in the CD work were placed at various locations along the road. Some of these are still present at the above mentioned location. Why were they placed at the said location if no work was proposed.

१२. My field has been rendered inaccessible because of deep crosion of the road side drain. I have been askig for remedial measures. Provide the details of actions taken on my applications made to your deptt.

१३. What are the norms regarding provision of approaches to the fields which have been divided because of construction of new roads.

१४. Is the Deptt.empowered to render any property inaccessible for its work. If not, whose responsibility it to provide suitable approaches.

१५. What was the estimated cost of the work. What was the total cost incurred. What was the amount of escalation is cost.

१६. Copy of the estimates of work of road and CD works, measurement Book.

१७. Date of issue of Section ४ notices for acquisition of land for the work.

१८. Date of start of work.

१९. Can the Deptt.Start the work before issuing section ४ notices.

२० How many possible alignments were considered. Justification for the alignment selected and alignments rejected."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.१०.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.

४. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १९.३.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागणी केल्यानुसार इस्टीमेटची नक्क्ल, पुरड ते कृष्णापूर पर्यंतचा नकाशा, लँड सर्व्हेचा नकाशा व २० मुद्यांबाबतची माहिती बाबत संबंधीत अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष विभागात बोलावून त्यांना २० मुद्यांबाबतची माहिती दाखविण्यात यावी. त्यामध्ये त्यांना जी माहिती आवश्यक आहे ती त्यांना विनामुल्य ३ दिवसांत माहिती अधिका-यांनी पुरविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळ कार्यालयास सादर करावा. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १.४.२००८ रोजी संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ३.१.२००८ रोजी तशी माहिती मागण्याचा अर्ज सादर केला आहे. तसेच अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज वेगवेगळया पध्दतीने माहिती मागण्याकरीता केलेले आहे असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी आयोगास सांगितले. व त्याबाबतचे कारण हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात घेतलेले आहे व ते आयोगाचे निदर्शनास आणण्यात आले आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस मला माहितीची आवश्यकता नाही. फक्त मला माझ्या शेतात जाण्याकरीता पक्का रस्ता बांधून पाहिजे. परंतु तो आतापर्यंत न झाल्यामुळे व माझे शेत पडीत न राहावे म्हणून मी माझ्या स्वखर्चाने सदर रस्ता शेतात जाण्याकरीता तयार केलेला आहे. त्या रस्त्याकरीता मला जो खर्च आला आहे, आता तो खर्च संबंधीत विभागाने मला द्यावा, असे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समोर सांगितलेले दिसते व त्यामुळे आपणास माहितीच्या अधिकाराअंतर्गत नेमकी कोणती माहितीची आवश्यकता आहे ते सांगावे असे त्यांना विचारलेले दिसते व त्याप्रमाणे त्यांनी

सांगितल्यानुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांनी अनेक अर्जाच्या माध्यमातून माहिती मागण्याचे कारण हे कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित नसून त्यांच्या स्वहिताकरीता माहिती मागितलेली दिसून येते. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, त्यानी जो खर्च केलेला आहे तो ७०-८० हजार आहे व अशा प्रकारचा खर्च कोणत्याही शासनाच्या निधीतून उपलब्ध करुन देता येणार नाही व त्यामुळे त्यांच्या रस्त्याच्या खर्चाची मागणी ही मान्य करता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १७.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९७/२००८**

**१) श्री महेंद्र महादेवराव ढगे,**
**आर्वी नाक्यामागे मानस मंदीर जवळ,**
**वार्ड नं.२, वर्धा, ता.जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, वर्धा, ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख वर्धा. ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक निरंक , शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

"आपले उपरोक्त पत्रानुसार मला माझ्या प्लॉटवरील बांधकाम तालुका भुमि अभिलेख, वर्धा यांचा मोजणी मा.क्रं.९२९/२००१ मोजणी दि. ८.१.२००२ नुसार आपण अतिक्रमण दर्शवून माझे बांधकाम थांबविण्यात आलेले होते.

त्यानंतर श्री सुरेश रधुनाथ तडस यांनी तालुका भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी केली मोजणी रजिस्टर क्रं.३४९/०३ मोजणी दिनांक २०.१२.०३ व १७.२.०४ नुसार सदर प्लॉट नं. २४ अतिक्रमीत नसल्याचे दर्शविले.

उपरोक्त दोन्ही मोजणीबाबत मला शंका आल्याने मी स्वतः तालुका भुमी अभिलेख विभाग यांचेकडे अर्ज देऊन मोजणी केली असता मोजणी रजिस्टर क्रं.५०३/०४ मोजणी दि. २२.६.२००४ नुसार सदर प्लॉटचा भाग नाल्यामध्ये असल्याचे दर्शविले. प्लॉट क्रं.२४ च्या

भुखंडाची फक्त ५०० फुट जागा शिल्लक असल्याची दर्शविली होती. त्यावर तालुका भुमि अभिलेख निरीक्षकाने खोडून त्यावर टिपमध्ये टिप लिहून सदर प्रकरण दुरुस्तीस पात्र असल्याचे दर्शविले.

भुमापन कार्यालयाच्या वरील तीन मोजणीमध्ये प्लॉट क्रं.२४ बाबत वेगवेगळे निष्कर्ष तयार केले तरी वरीलप्रमाणे केलेली कोणती मोजणी योग्य आहे. तसेच प्लॉटची सध्याची स्थिती काय आहे याबाबतची माहिती देण्यात यावी."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.११.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी वर्धा यांनी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता तक्रारीची मुळ प्रत पाठविण्यात आलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २०.२.२००८ रोजी विवेचन करुन मौजा पिपरी ता. वर्धा येथील शेत सर्व्हे नंबर ५६/१ मधील भू.क्रं.२४ ची मोजणी मो.र.क्रं.९२९/०१, ३४९/०३, ५०३/०४ अन्वये मोजणी झाली असून तीनही मोजणी मध्ये तफावत दिसून येते या तीनही मोजणीची खात्री होण्याकरीता अपीलार्थी यांनी भू.क्रं.२४ ची तालुका निरीक्षक भूमि अभिलेख वर्धा यांचेकडून आवश्यक ती निमताना मोजणी फी भरुन निमताना मोजणी करुन घेण्यात यावी असा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्लॉट क्रं. २४ च्या स्थितीबाबतची मोजणी तीन वेळेस झालेली आहे तिन्ही वेळेस तालुका भूमी अभिलेख कार्यालयाने तीन प्रकारचे वेगवेगळे निष्कर्ष दिलेले आहे. त्यामुळे कोणती मोजणी योग्य आहे याची निश्चिती होणे आवश्यक आहे. तालुका भूमी अभिलेख कार्यालयाने केलेल्या चुकाबाबत अपीलार्थीने निमताना रक्कम भरुन त्यांनी केलेल्या चुका दुरुस्त होऊ शकत नाही त्यामुळे कोणती मोजीणी खरी आहे याचा निर्णय त्यांनी घेणे आवश्यक आहे. प्लॉट क्रं.२४ अतिक्रमण असून ५०० फुट जागा दर्शविली आहे. त्यावर तालुका भूमी अभिलेख निरीक्षकाने खोडून त्यावर टिपमध्ये टिप लिहून सदर प्रकरण दुरुस्तीस पात्र असल्याचे दाखविले. त्यावरुन वरीलप्रमाणे

केलेली कोणती मोजणी योग्य आहे तसेच प्लॅाटची सद्य स्थिती काय आहे याबाबत योग्य माहिती देण्यात यावी, असे द्वितीय अपील मेमोमध्ये नमूद केले आहे.

६. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये असे दिसून येते की, प्लॅाट क्रं.२४ च्या भूखंडाची फक्त ५०० फुट जागा शिल्लक असल्याचे दर्शविले आहे. त्यावर तालुका भूमी अभिलेख निरीक्षकाने खोडून त्यावर टिपमध्ये टिप लिहून सदर प्रकरण दुरुस्तीस पात्र असल्याचे दर्शविले व त्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख वर्धा यांनी पुन्हा कोणत्याही प्रकारची फी ची आकारणी न करता हा निर्णय मिळाल्यापासून ४० दिवसांचे आंत मोजणी करुन योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये आवश्यक असलेल्या माहितीच्या विवरणामध्ये भूमापन कार्यालयाच्या तीन मोजणी मध्ये प्लॅाट क्रं.२४ बाबत वेगवेगळे निष्कर्ष काढले आहेत. तरी वरीलप्रमाणे केलेली कोणती मोजणी योग्य आहे तसेच प्लॅाटची सद्य स्थिती काय आहे याबाबतची माहिती तालुका भूमी अभिलेख निरीक्षकांच्या शे-याप्रमाणे कोणत्याही प्रकारची मोजणी फी न आकारता मोजणी करुन हा निर्णय मिळाल्यापासून ४० दिवसांचे आंत योग्य ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. मोजणी करताना संबंधीतास नोटीस काढून मोजणीची प्रक्रिया नियमाप्रमाणे करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०२/२००८**

**१) श्री दिलीप गणपतराव खेडीकर,**
**नयापुरा, राममंदीर जवळ, प्रेमनगर,**
**वार्ड क्रं.३४, नागपूर-२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त,**
**परिमंडळ क्रं. ३, नागपूर शहर (कोतवाली), नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**कोतवाली विभाग, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त यांचे वतीने श्री आनंद घोगरे लॅा ऑफिसर तसेच श्री व्ही.एस.पवार, पोलीस उपनिरीक्षक हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले. सर्व प्रथम अपीलीय अधिकारी यांना आयोगाचे दर्जाची जाणिव पोलीस आयुक्त, नागपूर यांनी करुन देणे आवश्यक आहे.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००७ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त तथा माहिती अधिकारी केळी बाग रोड, महाल कोतवाली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः कार्यालयातून घेण्यात येईल असे नमूद केलेले दिसून येते.

"पोलीस स्टेशन लकडगंज अंतर्गत येणारे बस्तरवारी गुरखेमभारती आखाडा, इतवारी रेल्वे स्टेशन वार्ड क्रं.५६ या परिसरात सटटा व जुगार अडडयावर टाकण्यात आलेल्या धाडी विषयी माहिती. जानेवारी २००३ ते १४.११.२००७ या काळात वार्ड क्रं.५६ मध्ये येणारे बस्तरवारी गुरखेमभारती आखाडा, इतवारी रेल्वे स्टेशन वार्ड क्रं.५६ या परिसरात सटटा व जुगार अडडयावर टाकण्यात आलेल्या धाडी विषयी माहिती. (अ) वर्ष २००३ ते १४.११.२००७ या काळात वार्ड क्रं.५६ मध्ये येणारे बस्तरवारी गुरखेमभारती आखाडा, इतवारी रेल्वे स्टेशन वार्ड क्रं.५६ या परिसरात किती वेळा पो.स्टे. लकडगंज व क्राईम पोलीसांनी जुगार व सटटा

पटटीच्या अडडयावर धाडी टाकण्यात आल्या. (ब) जानेवारी २००३ ते १४.११.२००७ या काळात वार्ड क्रं.५६ मध्ये येणारे बस्तरवारी गुरखेमभारती आखाडा, इतवारी रेल्वे स्टेशन परिसरात जुगार व सटटा पटटीचा व्यापार करणात्या किती संचालकावर कारवाई करण्यात आली. (क) जानेवारी २००३ ते १४.११.२००७ या काळात वार्ड क्रं.५६ मध्ये येणारे बस्तरवारी गुरखेमभारती आखाडा, इतवारी रेल्वे स्टेशन परिसरात किती जुगार खेळणा-या इसमास अटक करण्यात आली त्याचप्रमाणे या परिसरात सटटा पटटीवर जुगार खेळणा-या किती इसमास अटक करण्यात आली. (ड) जानेवारी २००३ ते १४.११.२००७ या कालावधीत बस्तरवारी गुरखेमभारती आखाडा, इतवारी रेल्वे स्टेशन परिसरात किती जुगार खेळणा-या इसमास पो.स्टे. लकडगंज येथून जामिन देण्यात आली व किती सटटा पटटीवर जुगार खेळणा-या इसमास लगडगंज पोलीस स्टेशन मधून जामीन देण्यात आली त्याचप्रमाणे किती जुगार खेळणा-या व सटटा पटटीवर जुगार खेळणा-या इसमास कोर्टातून जामीन देण्यात आली."

३. अपीलकर्ता यांना दिनांक ३.१२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी त्यांना उपलब्ध झालेल्या माहितीबध्दल युक्तीवाद करताना असे सांगितले की, दिनांक ३.१२.२००७ रोजी जे उत्तर देण्यात आले आहे त्यात कोणत्याही प्रकारची माहिती मागितलेली नाही. व सदरची माहिती उपलब्ध झाल्यावर पोलीस आयुक्त यांना सादर करणार आहे असे अर्जात नमुद केल्याबाबतच जन माहिती अधिकारी यांनी पोलीस आयुक्त व पोलीस उपआयुक्त यांना सद्यस्थितीबाबत माहिती अवगत केली जाते किंवा माहिती असते असे कळविण्यात आले आहे.

५. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जदारास माहितीचे प्रयोजन विचारण्याचे कारण नाही. जरी अर्जात दिलेले असले तरी त्याची दखल घेण्याचे कारण नाही. व मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्याच कार्यालयातील वरिष्ठ

अधिकारी यांना प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करण्याचे प्रयोजन एवढेच आहे की, अर्जदारास त्याच सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावर माहिती उपलब्ध झाली पाहिजे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाची दखल घेतली नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. शासनाने सुध्दा शासन निर्णय पारित करुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे आवश्यक आहे असे सर्व अधिका-यांना कळविलेले आहे. परंतु त्याबाबतही प्रथम अपीलीय अधिकारी फार गंभिर आहे असे दिसून येत नाही. ज्याअर्थी अधिनियमात तरतूद दिलेली आहे व विशिष्ट मुदतीत प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे दिलेले आहे, त्याअर्थी या सर्व तरतुदीं बंधनकारक आहेत. व यापुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील हे गांभिर्याने घेणे आवश्यक आहे. याबाबतची समज पोलीस आयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिका-यांना करुन देणे आवश्यक आहे.

६. असे असले तरी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.११.२००७ च्या अर्जात आवश्यक असलेल्या माहितीच्या वर्णनाच्या संदर्भात कागदपत्रांच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल ती सर्व माहिती विनामुल्य व्यक्तीश हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० व्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेकडे व्यक्तीशः संपर्क साधून माहिती विना मुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १९.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०३/२००८**

**१) श्री दिपक महेन्द्र पांडेय,**
**चुडी मोहल्ला, वार्ड नं.१०,**
**ता. देवळी, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त,**
**प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन,**
**आयुक्त कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, पुलगांव, ता. देवळी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद पुलगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्त्‍ीश: हवी आहे असे नमूद केले आहे.

"खालीलप्रमाणे स्थावर मालमत्ता इतरांचे नांवे करण्यापुर्वी मुळ मालमत्ताधारकास म्हणणे सांगण्याकरीता देण्यात आलेल्या नोटीसची प्रत पुरविणेबाबत. (१) वार्ड क्रं.१ चुडी मोहल्ला येथील नझुल प्लॉट क्रं.१०७ (२) वार्ड क्रं.१२ प्लॉट क्रं.११६,११७,८६/१ ख (३) वार्ड क्रं. १३ नझुल ब्लॉक नं.१२ प्लॉट क्रं.४६ हया स्थावर मालमत्ता ईतरांचे नांवे करण्यापुर्वी बाजु मांडण्याकरीता देण्यात आलेल्या नोटीसची प्रत पुरविणेबाबत."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १०.१२.२००७ रोजी या कार्यालयाचे रेकार्डवर मालमत्तेची नोंद मालमत्ता क्रमांक देवून नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे आपण मागितलेली माहिती कोणत्या मालमत्ता संबंधात आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे संदर्भीय

अर्जानुसार मागितलेली माहिती आपणास पुरविणे शक्य नाही. नेमकी कोणत्या मालमत्तेच्या संदर्भात माहिती पाहिजे आहे याचा उल्लेख केल्यास त्यासंबंधात उपलब्ध असलेली माहिती आपणास देण्यात येईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी अशा प्रकारचा खुलासा न करता पुन्हा दिनांक १८.१२.२००७ रोजी मुख्याधिकारी, नगरपरिषद यांना पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २७.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात मालमत्ता क्रमांक किंवा मालमत्ता धारकाचे नांव प्रतिवादंना कळवावे. अथवा अपीलार्थींना नगरपरिषदेतील मालमत्ता नोंदवहीचे निरीक्षण करुन त्यांना आवश्यक त्या माहितीची मागणी करता येईल. प्रतिवादींनी विहित शुल्क आकारुन अपीलार्थीस माहिती पुरवावी, अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक १९.२.२००८ रोजी मालमत्तेचा क्रमांक व मालमत्ता धारकाचे नांव हे मुख्याधिकारी यांना कळविलेले दिसून येते. मात्र त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही एकाच मालमत्तेच्या संबंधीत नसुन या कार्यालयाचे क्षेत्रातील विविध वार्डातील विविध मालमत्तेच्या संबंधीत व २० ते २५ वर्षा पुर्वीची होती. या कार्यालयाकडून दर चार वर्षानंतर मालमत्ताचे फेर सर्वेक्षण करुन कर आकारणी यादया तयार करण्यात येते. त्याचप्रमाणे वेळोवेळी होणा-या नवीन वार्ड रचनेनुसार वार्ड क्रमांकामध्ये व मालमत्ता क्रमांकामध्ये बदल झालेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना हव्या असलेल्या माहिती संबंधात मालमत्ता क्रमांक व मालमत्ता धारकाचे नाव कळविण्याबाबत या कार्यालयाचे दिनांक १०.१२.२००७ चे पत्रान्वये कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांनी वरील प्रमाणे माहिती या कार्यालयास कळविलेली नाही. अथवा प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे दिनांक १ फेब्रुवारी २००८ रोजीचे आदेशानुसार या कार्यालयाकडे नीरक्षण मागवून सद्या अस्तित्वात असलेल्या मालमत्ता

धारकाचे नावाची माहिती या कार्यालयाकडे सादर केलेली नसल्यामुळे व त्यांना हव्या असलेल्या माहिती संबंधीत मालमत्ता एकापेक्षा जास्त लोकांकडे हस्तांतरीत झालेल्या असल्यामुळे अचुक माहिती देण्याचे उद्येशाने या कार्यालयाचे कर आकारणी यादयांचे निरीक्षण करण्याबाबत या कार्यालयाचे `पत्र क्रं.नपापु/माअ/१५४/०८ दिनांक १.३.०८ व क्रं.नपापु/मुलि/माअ/२०६/०८ दिनांक १५.३.२००८ अन्वये कळवूनही अपीलकर्ता यांनी या कार्यालयाकडे असलेल्या कर आकारणी यादयांचे निरीक्षणाची मागणी केलेली नाही. त्याच प्रमाणे त्यांनी मागीतलेल्या माहितीपैकी लगतचे काळात हस्तांतरीत झालेल्या काही मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिर नोटीसच्या प्रती (वृत्तपत्रात प्रसिध्द नोटीसच्या प्रती) विहित शुल्क भरुन प्राप्त करुन घेणे संबंधाने कळविण्यात आलेले असतांना सुध्दा अपीलकर्ता यांनी त्या प्राप्त करुन घेतलेल्या नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नसुन या कार्यालयाचे क्षेत्रातील काही मालमत्ता बेकायदेशीररित्या त्यांचे स्वत:चे नावाने नोंद करुन घेण्याबाबत या कार्यालयाचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी व त्यांचे अधिनस्त कर अधीक्षक यांचेवर दबाव निर्माण करण्याचा त्यांचा उद्येश दिसुन येतो."

६. खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय जूनी असून त्यानंतर वार्ड क्रमांक वगैरे बदललेले आहे. व प्रत्येक वेळेस झालेल्या फेरफारच्या संदर्भात माहिती हवी असल्यास त्याप्रमाणे निश्चितपणे मालमत्तेचा क्रमांक व वार्ड क्रमांक कळविणे आवश्यक असते. त्यातही ज्या वार्डाच्या संदर्भात माहिती विचारलेली आहे त्याचे नांव अर्धवट असे दिलेले आहे. व त्यामुळे प्रथम अपीलामध्ये नगरपरिषदेतील मालमत्ता वहीचे निरीक्षण करुन आवश्यक माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी संबंधीत संपूर्ण मालमत्तेच्या नोंदवहीचे निरीक्षण करुन त्यातून आवश्यक असलेली सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १४.११.२००७ च्या अर्जाप्रमाणे व त्यानंतर दिलेल्या खुलाशाप्रमाणे संबंधीत मालमत्तेच्या

संदर्भात मालमत्ता नोंदवहीचे निरीक्षण करुन व त्यासंबंधातील नस्तीचे निरीक्षण करुन आवश्यक असेल त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती या विनामुल्य हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन घेण्यात याव्यात. त्याकरीता अपीलकर्ता यांनी कार्यालयीन तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून त्या दिवशी संबंधीत नस्तींचे निरीक्षण करावे.

अपीलकर्ता यांनी कार्यालयीन तारीख व वेळ कळविल्यानंतर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपुर्ण नस्ती व मालमत्ता नोंदवहीचे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे व त्यांना आवश्यक असेल त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती हया विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १९४/२००८**

**१) श्री शंकर चेतुमल गुलानी,**
**प्लॉट नं.२९, वसनशाट चौक जवळ,**
**जरीपटका, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, महानगरपालिका यांचेकडे सहपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १०.१०.२००७ रोजी मागितलेली माहिती सोबतच्या तक्यानुसार देण्यात येत आहे, अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.११.२००७ रोजी देण्यात आला असून दिनांक २०.११.२००७ रोजी माहिती देण्यात आलेली असल्यामुळे प्रस्तुत अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे. परंतु तरीही समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १०.१०.२००७ व २०.१०.२००७ अशी दोन वेळा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीही अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये अनियमितता करणा-यांच्या विरुध्द कोणत्या प्रकारची कार्यवाही केली आहे असे विचारलेले आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रत्येक घराच्या संदर्भात करनिर्धारण हे वारंवार बदलत असते व त्यामुळे केलेले करनिर्धारण हे गैर होते व त्यानंतर ती चुकीची दुरुस्ती करण्यात आली असे म्हणणे् योग्य नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे ती वस्तुस्थिती आहे त्याप्रमाणे दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १९.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

Order०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८७/२००८**

**१) श्री रमेश कवडु सहारकर, व.लि., शासकिय तंत्रनिकेतन, सदर नागपूर.** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मंगळवारी बाजार, सदर नागपूर.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.संचालक, तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मंगळवारी बाजार, सदर नागपूर.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सहसंचालक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"(१) सन २००३ या वर्षात पदोन्नती करिता तयार करण्यांत आलेल्या निवडसूचीची प्रत देण्यात यावी. (२) विभागीय पदोन्नती समीतीचा कार्यवृत्तांत देण्यांत यावा. (३) सन २००३ मध्ये वरिष्ठ लिपीकांची किती पदे रिक्त होती व एकुण किती पदे भरावयाची होती. (४) त्यानुसार निवडसूची तयार करण्यांत आली आहे काय. (५) समीतीमध्ये मागासवर्गीय प्रतिनिधी हजर होते काय. (६) त्यांनी मागासवर्गीय कर्मचा-यांविषयी ठेवलेली टिपणी."

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.८.२००७ रोजी एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून

येते. व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मागास वर्गीय प्रतिनिधी हजर नसून निवड सूचित कोणताही आक्षेप नोंदविलेला नसल्यामुळे संबंधीत सदस्यांचे पत्र अपीलकर्त्यांस दाखविले आहे व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येत आहे. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपील मेमोमध्ये अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असे अपीलकर्ता यांनी सांगीतले. परंतु त्याकरीता कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २१०/२००८**

**१) श्री दिवाकर मारोती शेंडे,**
**मु.गोंदोडा, पो. केवाडा, ता.चिमुर**
**जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प, चिमूर**
**ता. चिमुर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**ग्रामगिता आश्रम शाळा गोंदोडा, पो. केवाडा,**
**ता. चिमुर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापक, ग्रामगीता आश्रम शाळा, गोंदोडा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती कशा प्रकारे घेणार हे नमूद केले नाही.

"जुलै, ९९ ते मार्च, २००० च्या कालावधीतील कर्मचा-यांच्या हजेरी पटाची झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत. (२) १९९९ पासून डिसेंबर, २००५ पर्यंत भाडयाने राहात असल्याबाबतचा पुरावा मुख्याध्यापकांचे संबंधात प्रमाणित झेरॉक्स प्रत."

३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २१.२.२००८ रोजी प्रकल्प अधिकारी यांनी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक तसेच

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दिनांक २५.२.२००८ ला प्रथम अपीलाची सुनावणी ठेवलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्त्यांच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.२.२००८ रोजी माहिती कशा प्रकारे घेणार हे नमूद केलेले नाही व त्यामुळे या कार्यालयाने आपल्याकडे वेळ घेवून आपल्याकडून काहीही प्रतिसाद नसल्यामुळे पोस्टाने माहिती पाठविण्याचे ठरविले आहे. करीता या पत्राच्या पोस्टेज खर्चासहित व झेरॉक्स खर्च मशिन या कार्यालयाच्या ठिकाणी नसल्यामुळे त्याचा प्रवास खर्च एकुण रुपये ३०००/- त्वरीत भरावा. खर्च वजा जाता उर्वरित रक्कम आपणास परत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. पैसे न भरल्यास आपल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, असे कळविलेले दिसून येते.

४. तसेच दिनांक २८.२.२००८ रोजी सुनावणी दरम्यान माहिती अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे अपीलार्थी यांनी फी भरल्यास त्यांना माहिती देण्यात यावी असा निर्णय देण्यात आलेला असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे फी भरलेली नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे व माहिती कशा प्रकारे घेणार हे नमूद केलेले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले तसेच प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, अपीलकर्ता हे वारंवार माहिती मागत असतात व इतरांच्या सुध्दा माध्यमातून वारंवार अर्ज करुन वेठीस धरत असतात. त्यामुळे हा एक प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींचा गैरवापर आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता

यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा अतिरिक्त खर्चाचा भरणा हा निर्णय मिळाल्यावर १० दिवसांत केल्यास त्यानंतर १० दिवसांत त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २०.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २१३/२००८**

| | |
|---|---|
| **१) श्री राजेंद्र शिवचरण बागडे,** | |
| **धामनगांव पो. सतोना, ता.जि.गोंदिया.** | **अपीलकर्ता** |
| **वि रु ध्द** | |
| **२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,** | |
| **गोंदिया, ता.जि.गोंदिया.** | **उत्तरवादी** |
| **३) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,** | |
| **गोंदिया, ता. जिल्हा गोंदिया.** | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा तहसिल कार्यालय, गोंदिया यांचेकडे अंजनाबाई शिवचरण बागडे यांचे प्रकरण नामंजूर झाल्याचे सांगण्यात येते तरी नामंजूर करण्याची कारणे समिती अहवाल प्रकरणावर अध्कि-यांचे कारणे टिप्पणीसह प्रकरणाची सर्व कागदपत्रे मिळण्याबाबत. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले असून दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ४.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ७.३.२००८ रोजी घेण्यात आली असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती प्राप्त झाल्याची पोच दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती मिळाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार माहिती अधिकारी यांचेकडेच अर्ज दिनांक २२.१.२००८ रोजी प्राप्त झाला व माहिती माहिती अधिकारी यांनी कनिष्ठ लिपिकाकडून दिनांक २९.१.२००८ रोजी माहिती मागविली व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती देण्यास विलंब झालेला आहे.

५. वास्तविक, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही ३० दिवसांचे आंत म्हणजेच २६.१२.२००६ पासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्याकरीता अर्थातच जे कर्मचारी दोषी असतील त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २१२/२००८**

**१) श्री सौ.मीना चरणसिंह तोमर,**
**C/o अशोक भैय्यालाल कोरी, पार्वती नगर**
**फुलमाता मंदीर के पास, रामेश्वरी, नागपूर-२७. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,**
**(मेडीकल), नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,**
**(मेडीकल), नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक .३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय यांचेकडे दिनांक ११.८.२००६ को रुग्ण अशोकसिंह गौतम इनका भरती रजिस्ट्रेशन नं.२९५८३ दिनांक १२.८.२००६ वार्ड नं.२ और १५ का ईलाज और भरती का संपूर्ण रेकार्ड, अशी माहिती मागितलेली असून पुन्हा त्यावर आधारित कपोल कल्पित असे अभिप्रायात्मक प्रश्न उपस्थित केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ४.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अतिरिक्त खर्च रुपये १३५/- नोंदणी शुल्क विभागात भरणे आवश्यक आहे व ती भरुन पावतीची छायांकित प्रत या कार्यालयास पाठविल्यास व्यक्तीशः माहिती देणे सोईचे होईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याचप्रमाणे जे अभिप्रायात्मक प्रश्न आहे त्या अभिप्रायात्मक

प्रश्नांच्या संदर्भात शासकिय माहिती अधिकारी यांनी संबंधीत प्राध्यापक व विभाग प्रमुख यांना माहिती मागितलेली दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी अतिरिक्त माहितीच्या खर्चाची रक्कम दिनांक १६.८.२००७ रोजी भरलेली असून त्यांना कागदपत्रांच्या स्वरुपात संपुर्ण माहिती ही दिनांक २३.८.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी घेवून गेलेले आहे अशी पोच दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. सदरची माहिती ही अभिलेखागार विभाग यांचेकडे असल्यामुळे दिनांक १९.५.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी यांनी माहितीच्या करीता खर्च किती अपेक्षित आहे व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते व प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. तसेच दिनांक २२.५.२००७ रोजी सुध्दा वैद्यकिय अधीक्षक यांनी प्राध्यापक व विभाग प्रमुख, अस्थीव्यंग शास्त्र यांना चौकशी करुन अहवाल ७ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावा असे पत्र दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही विलंबाने उपलब्ध झालेली दिसून येते. मात्र माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते त्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांना दिनांक ३.९.२००७ रोजी अभिलेखागार विभाग या कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती सादर केलेली दिसून येते. माहिती ही संकलीत करुन व सर्व प्रक्रिया पूर्ण करुन तीस दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावयाची असते. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी खबरदारी घ्यावयाची असते याची नोंद घ्यावी. व त्यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व कपोल कल्पित प्रश्नांची उत्तरे ही माहिती या संज्ञेच्या व्याख्येत येत नसल्यामुळे माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून

अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २०.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २१७/२००८**

**१) श्री मधुकर नागोरावजी सेनग्रफवार,**
**१४४, दत्तात्रयनगर, नागपूर-२४. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी**
**काटोल, ता. काटोल, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता स्वत: हजर आहेत व त्यांचे वकील श्री फिरोजखॉन हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे निवडुकीचे कामात व्यस्त असल्यामुळे सुनावणीस हजर राहू शकत नाही असे आयोगास कळविले आहे. त्यांचे तर्फे श्री दिपक चव्हाण, जिल्हा पुरवठा अधिकारी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी काटोल यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

माहिती. सदरची माहिती साध्या टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.९.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १७.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.१.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २०.७.२००७ व १८.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे अनुक्रमे माहिती दिनांक

२६.७.२००७ व १४.९.२००७ रोजी दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्याही आदेशामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील करण्याचे प्रयोजन मा. अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचे दिनांक १८.१.२००७ चे आदेश मान्य नाही असे कारण दिलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मागितलेली माहिती व दिनांक १४.९.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली माहिती याबाबत अपीलकर्ता यांचे वकील श्री फिरोजखॉंन यांनी युक्तिवाद करताना असे सांगितले की, उपविभागीय अधिकारी यांना जातीचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार असल्यामुळे व त्यांनी जातीचे प्रमाणपत्र दिलेले असल्यामुळे त्यांचेकडे माहिती मागितलेली आहे. सदरची माहिती त्यांनी दिशाभूल करणारी दिलेली आहे. तसेच जातीचे प्रमाणपत्र हे फसवून घेण्यात आलेले आहे असाही युक्तीवाद केला. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीप्रमाणे कलम २(च) माहिती या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, टिपणी, परिपत्रके इ.च्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घणे असा माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे जातीचे प्रमाणपत्र हे फसवून घेतले आहे, याबाबतचा विचार करता येत नाही.

उपविभागीय अधिकारी काटोल, यांनी जे उत्तर दिलेले आहे ते उत्तर श्री वडपल्लीवार हे ज्या कार्यालयाच्या आस्थापनेवर आहे त्या कार्यालयाच्या प्रमुखाने सदरच्या प्रकरणात कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यामुळे या प्रकरणात कार्यालयाचा काहीही संबंध नाही असे उत्तर दिले आहे.

६. अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी हे जातीचे प्रमाणपत्र देण्यास सक्षम आहे. परंतु जातीचे प्रमाणपत्र उपविभागीय अधिकारी यांनी दिल्यानंतर संबंधीत कार्यालयाच्या आस्थापनेकडे सादर करते व ती आस्थापना ही जात पडताळणी समितीकडे सदरच्या जातीचे प्रमाणपत्र योग्य आहे किंवा नही हे तपासणीसाठी पाठवित असते. व त्यामुळे

श्री वडपल्लीवार हे ज्या कार्यालयाच्या आस्थापनेवर आहे त्या कार्यालयाच्या प्रमुखाने सदरचे जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे तपासणीसाठी पाठविणे आवश्यक असते. व त्याप्रमाणे जे उत्तर देण्यात आलेले आहे व संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध झाली असते व त्यामुळे पुढील मुद्यांच्या संदर्भात प्रश्नच उदभवत नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय सुध्दा योग्य आहे. व अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १७.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे दिनांक १४.९.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २२१/२००८**

**१) श्री ओमप्रकाश भाऊराव चूटे,**
**प्लॅाट नं.५, प्रगतीनगर, रनाळा,**
**ता.कामठी, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी ,**
**जिल्हा परिषद (पंचायत),**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) दि. ४.७.२००६ ची विस्तार अधिकारी (पंचायत) पदाची नियुक्ती अवैद्य दिनांक १३.६.२००६ च्या परिचर पदाची नियुक्ती अवैद्य. (२) दि. ४.७.२००६ च्या नियुक्तीत भ्रष्टाचार झाला का दि. १३.६.२००६ च्या नियुक्तीत भ्रष्टाचार झाला. (३) उमेदवार श्री ओमप्रकाश भाऊराव चुटे, रोल नं.१५२० हा सर्व उमेदवारातून प्रथम आहे. परंतु त्याचा लेखी पेपर वर खोडतोड करण्यात आली. साधारणतः एका ५ व्या वर्गाच्या मुलाच्या पेपरात गुण टाकतांना तीन वेळा मोजणी केली जाते. नंतर फायनल गुण टाकतात. येथे नोकरीच्या संदर्भात गुणामुळे जीवन घडते, त्याच्या पेपरवर प्रथम ७२ गुण नंतर ६९ गुण टाकतात. इतर उमेदवारांचे पेपरवर अशी खोडतोड होत नाही. स्पर्धापरीक्षा उमेदवारांचे पेपरवर कुठल्याही प्रकारची खोडतोड गुन्हा आहे तेव्हा पेपरवर छेडछाड प्रकरणांत Tempering of paper च्या गुन्हयाखाली दोषी अधिका-यांवर केलेल्या

कार्यवाहीची प्रत पाठवावी. (४) मला संधी न देता अहवाल कसा पाठविला. (५) दि. ३.११.२००७ ला नागपूर झेडपीच्या डिसस्पॅच रिसिव्हड प्राप्त तक्रार अर्ज सादर केला त्या अर्जावर संपुर्ण सबुत लावलेले होते. संबंधीत अर्जावर केलेल्या कार्यवाहीची प्रत पाठवावी. (६) दि. १४.१०.२००७ च्या लोक आयुक्ताला पाठविलेल्या अहवालाची प्रत पाठवावी."

३. सदरचा अर्ज दिनांक १७.११.२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानुषंगाने दिनांक २७.११.२००७ रोजी मुद्येनिहाय माहिती देण्यात आलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. परंतु, द्वितीय अपील मात्र आयोगाकडे दाखल केल्याचे दिसून येते. मात्र दिनांक २८.१.२००८ च्या प्राप्त पत्रानुसार दिनांक ६.२.२००८ ला घेतलेल्या सुनावणीत अर्जदाराला माहिती देण्यात आली असा कक्ष अधिकारी यांनी खुलासा दाखल केला आहे.

४. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलाच्या संदर्भात योग्य ती कागदपत्रे दाखल केलेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १.१२.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.१२.२००७ रोजी उत्तर दिलेले दिसून येते. तसेच इतरही अर्जाच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यांचे इतर अर्जाच्या बध्दल काहीही कागदपत्रे दाखल केलेली नाही. माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५१/२००८**

**१) श्री साहेबराव शामराव फुले,**
**C/o प्रो. दुर्गामाता कृषी सेवा केंद्र, जलालखेडा,**
**पो. जलालखेडा, ता. नरखेड, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी ,**
**महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.,**
**आग्याराम देवी पेट्रोल पंपजवळ, गणेशपेठ, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा रिजनल मॅनेजर, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"साल १९९९ ते २००० व २००० ते २००१ या कलावधीत माल पुरविण्यासाठी २० रु. स्टॅम्प पेपरवर केलेला करारनाम्याची झेरॅाक्स प्रत मिळणेबाबत. करारनामा १९९९ ते २०००. करारनामा २००० ते २००१." सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.९.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"संदर्भिय नोटीसच्या अनुषंगाने आम्ही आपणास कळवू इच्छितो की, श्री साहेबराव शामराव फुले, प्रोप्रा. दुर्गामाता कृषि सेवा केंद्र, जलालखेडा ता. नरखेड जि. नागपूर यांनी माहितीचा अधिकार अंतर्गत त्यांच्या दि. २४.८.२००७ च्या अर्जाच्या अनुषंगाने आम्ही आमचे पत्र क्रं.विकानाग/प्रशा/२००७-०८/११६७, दि. २१.९.२००७ अन्वये माहिती दिलेली असून या संदर्भात आम्ही परत नमूद करु इच्छीतो की, सदर करारनाम्याची प्रत ही त्या हंगामापुर्वीच असल्यामुळे त्यांची नोंद दप्तरी ठेवलेली नाही. तसेच याबाबत जुनी दस्तऐवज (रेकॉर्डस) तपासून शोध घेतला असताना कुठेही नसल्यामुळे ती देणे शक्य होणार नाही."

५. जन माहिती अधिकारी यांचे खुलाशावरुन सदरची माहिती नियमानुसार उपलब्ध होऊ शकत नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३०/२००८**
**अपील क्रमांक ३११/२००८**

**<u>अपील क्रमांक २३०/२००८</u>**

**१) श्री सुनिल के. अभिचंदानी,**
**१४२, रेसीडेन्सी रोड, सदर नागपूर-४४०००१. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा नझुल तहसिलदार,**
**नागपूर. उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक ३११/२००८</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**नागपूर. उत्तरवादी.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**(१) उपजिल्हाधिकारी (नझुल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.**
**(२) उपविभागीय अधिकारी , नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००८ व ३०.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखले केलेली आहेत. अपील क्रमांक ३११/२००८ हे दिनांक १.४.००९ रोजी सुनावणीस ठेवण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे सूचनेप्रमाणे आज सदरचे अपील सुनावणी घेण्यात आले. त्यामुळे सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. अपील क्रमांक २३०/२००८ मधील उत्तरवादी हजर आहेत. अपील क्रमांक ३११/२००८ मधील उत्तरवादी गैरहजर आहेत.

**२.** अपील क्रमांक २३०/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून नझुल तहसिलदार यांचेकडे व उपजिल्हाधिकारी(नझुल) तथा माहिती

अधिकारी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"१. भुखंड क्रं.२१३ सर्कल क्रं.२२/३०, मौजा सिताबर्डी येथील मुळ स्थायी भाडे पटटयाची सन १९३६ च्या नियम, अटी शर्तीनुसार बांधकाम करता येत नाही. तसेच सदर लीज डीउ नुतनीकरण केले तरी नियम व शर्ती त्याच लागू राहणार (नियम शर्ती क्रं.१० नुसार) अशा परिस्थितीत सुध्दा बांधकाम करण्याची मंजूरी देता येईल का. ही माहिती देण्यात यावी. २. Rev.Appeal No.IRTS/९८-९९ Sunil Abhichandani vs. Ravi Prakash Jhangde मा.एस.डी.ओ. यांचे आदेश दिनांक १७.११.१९९९ अन्वये उपरोक्त सर्व आदेशाचे अवलोकन करुन आदेश पारीत केले की, नझूल तहसिलदार यांनी मूळ स्थायी लिज पटया नियम व शर्ती क्रं.३ अन्वये प्लॉट क्रं.२१३ लीजधारक मिस.एलीज डी. जेसीस व अवैध बांधकामधारक रविप्रकाश जांगडे यांच्यावर नियम व शर्ती भंग केल्याबाबत कार्यवाही करण्यात यावी आणि हा आदेश अंतिम व बंधनकारक राहील असे आदेश असतांना सुध्दा अवैध बांधकाम काढण्याचे व अवैध बांधकाम धारकांवर लीज रद्द करण्याची कार्यवाही आजपर्यंत केली नाही का, ही माहिती देण्यात यावी. ३. माहितीचा अधिकार अधिनियम ११(१) अन्वये कोणती माहिती देता येते ती माहिती देण्यात यावी."

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १३.१२.२००७ रोजी मागितलेली माहिती मुद्या क्रं.१ व २ अवैद्य बांधकामाबाबत व अवैद्य बांधकाम करुन भाडे पटटयाच्या अटी व शर्तीचे उल्लंधन करण्यात आल्याने सदर बाब नझुल तहसिलदार यांचे अधिकार क्षेत्रात येत नाही. व मा. उपजिल्हाधिकारी (नझुल) यांचेकडे अर्ज दाखल करावा असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.१२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.१.२००८ रोजी देण्यात आला असून त्यात "अपील मंजूर करण्यात येत असून माहिती अधिकारी तसेच उपजिल्हाधिकारी (राजस्व) यांनी अपीलार्थीस तात्काळ निश्चित करुन उपलब्ध करुन द्यावी व त्याबाबत या कार्यालयास अवगत

करावे" असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे उपजिल्हाधिकारी (महसुल) यांनी दिनांक ३१.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

५. अपील क्रमांक ३११/२००८ मध्ये सुध्दा दिनांक ३१.१२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३१.८.२००८ रोजी वर नमूद केल्याप्रमाणे दिलेला दिसून येतो. दोनही प्रथम अपीलाचा निर्णय एकच देण्यात आलेला दिसून येतो. व त्यात उपजिल्हाधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आलेले दिसून येते.

६. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असली तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अनर्जित रक्कम भरुन घेतल्यानंतर नियम व शर्तीचा भंग केल्याबाबत लिज रद्य करण्याची कार्यवाही केल्याबाबत कळविले नाही. व त्याबध्दलची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु, अपीलकर्ता यांनीच आयोगाकडे दिनांक २५.१.२००५ रोजीचा जिल्हाधिकारी, नागपूर यांचा आदेश सादर केला आहे व त्या आदेशामध्ये "करीता उपरोक्त शासन ज्ञापनाद्वारे मी, जिल्हाधिकारी नागपूर, मला प्रदान केलेल्या शक्त्तीचा वापर करुन महसुल अधिनियम (शासकिय जमीनीची वसुली) नियम ७१ अन्वये नियम ३१ ते ४१ ते ४६ नुसार अनर्जित रक्कम निश्चित करुन हस्तांतर नियमित करण्यात येईल असे आदेश पारित केलेले आहे. तसेच अर्जदार यांना यापूर्वी दिनांक ३०.१२.२००२ व २७.४.२००४ रोजी केलेल्या बांधकामासाठी अर्ज करुन ना हरकत परवानगीची मागणी केलेली आहे. परंतु सदर अनर्जित रक्कम भरणा केल्यानंतर लिज पटटयाबध्दल तरतुदीनुसार बांधकामासाठी ना हरकत परवानगी देण्याबाबत विचार करण्यात आला. त्यामुळे अर्जदाराचा वरील तारखेचा अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे. व त्यामुळे अर्जदाराने अनर्जित रक्कम भरल्यानंतर लिज पटटयातील शर्तीच्या भंगाच्या संदर्भात कोणत्या प्रकारची कार्यवाही केली याबध्दलची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या

तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाहीची मागणी ही करता येत नाही. त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये दिनांक २५.१.२००५ च्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाहीची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील, त्याकरीता अपीलकर्ता यांची दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांची अपील क्रमांक २३०/२००८ व अपील क्रमांक ३११/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जात मागितल्याप्रमाणे लिज पटयाच्या शर्तीचा भंगाच्या संदर्भात कोणत्या प्रकारची कार्यवाही झालेली आहे ही माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन हेण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपजिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून सदची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३२/२००८**

**१) श्री किशोर सुंदरलाल खुराणा,**
**नाचणगांव रोड, पुलगांव,**
**ता. देवळी, जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगांव,**
**ता. देवळी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार,**
**पोलीस स्टेशन पुलगांव, ता. देवळी, जिल्हा वर्धा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा ठोणेदार यांचेकडे त्यांनी दिलेल्या दिनांक ६.१२.२००७ च्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगो दिनांक ८.१.२००८ रोजी अपीलकर्ता यांना पोलीस स्टेशन ऑफिसर यांनी "आपण दिनांक ६.१२.२००७ ला गैरअर्जदार नामे राजू माणिकराव रोकडे यांचे विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. त्या तक्रारीची चौकशी करण्यात आली असता आपण केलेले आरोप सिध्द होऊ शकले नाही म्हणून प्रकरण फाईल करण्यात आले," असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे व ती माहिती अपूर्ण आहे असा आक्षेप घेवून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४.    प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ४.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना केलेल्या तक्रारीच्या संदर्भात चौकशी करण्यात आली असता आपण केलेले आरोप सिध्द होऊ शकले नाही. प्रकरण फाईल करण्यात आले आहे. आपण मागितलेली माहिती तयार आहे. आपणास विनंती की, या कार्यालयात रुपये १५.५० शुल्क भरणा करावे किंवा मनीऑर्डर पाठवावी किंवा शासकिय कोषागारात रकमेचा भरणा करुन चलनाची प्रत या कार्यालयास पाठवावी व त्वरीत माहिती घेवून जावी" व सदर अर्जदार हे परिपत्रक घेवून जाण्यास तयार नाही त्यामुळे परत, अशा प्रकारचा शेरा त्यावर दिलेला दिसून येतो. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५.    सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अपूर्ण माहिती मिळाली आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.१२.२००७ च्या तक्रारीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यात कोणत्याही प्रकारचा दखलपात्र गुन्हा घडलेला आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे पोलीस दप्तरामधुल कोणत्याही प्रकारचा गुन्हा सिध्द होऊ शकला नाही असे उत्तर दिलेले दिसून येते व ते विहित मुदतीत दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केल्यामुळे पुन्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी अधिकारी गेले असता त्यांनी ती माहिती स्विकारलेली नाही असा शेरा दिलेला दिसून येतो. मात्र आयोगाची नोटीस मिळाल्यानंतर पुन्हा अपीलकर्ता यांना सदरची माहिती पोस्टाने पाठविलेली दिसून येते. व त्याकरीता जन माहिती अधिकारी, पोलीस स्टेशन पुलगांव यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

"सविनय सादर आहे की, उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने दि. ६.१२.२००७ ला श्री किशोर सूंदरलाल खुराणा यांनी लेखी रिपोर्ट दिला की, गैरअर्जदार नामे राजु माणिकराव रोकडे रा. भिऊी यांनी दि. ६.१२.२००७ ला १४.३० वा.चे दरम्यान रस्त्यात अडवून जिवे मारण्याची धमकी दिल्याबाबत अर्जाची दिनांक ६.१२.२००७ ला नोंद घेऊन घटनास्थळ पंचनामा कार्यवाही करण्यात आली. रिपोर्टमधील नमुद साक्षदार नामे राजेश गोविंदराव शेबे, श्री संजय भाऊराव गुल्हाणे, श्री अरुण पुंडलीकराव कदम यांचे सविस्तर बयाण नोंदवून सखोल चौकशी करण्यात आली. चौकशीअंती श्री किशोर खुराणा यांनी केलेले आरोप सिध्द होऊ शकले नाही. म्हणून

प्रकरण फाईल करण्यात आले. प्रकरणाबाबत दि. ८.१.२००८ ला सूचना देण्यात आली. त्यावर त्यांनी अपूर्ण माहिती मिळाल्याबाबत लिहून स्वाक्षरी केलेली आहे. ती प्रत सोबत जोडली आहे.

माहितीचा अधिकार २००५ अन्वये दिनांक ६.१२.२००७ चे घेटनेबाबत दि. ३.१.०८ ला किशोर खुराणा यांनी त्याच प्रकरणात माहिती मागितली. ते पत्र ५.१.०८ ला प्राप्त झाले. माहिती वेळोवेळी पुरवून सुध्दा माहिती मागत असतो. दि. ४.२.०९ ला माहिती बाबत पत्र देवून PC हरीशचंद्र २१८ ASI ज्ञानेश्वर ७३ यांना पाठविले असता त्यांनी माहिती घेण्यास नकार दिला. सदर पत्र न स्विकारल्याने पो.स्टे.जा.क्रं.४९९/०९ दि. ६.३.०९ ला पोस्टाने पाठविले.

अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रं.उ.वि.पो.अ.वा.फौ./मा.अ.०८/८९ दि. १५.१.०८ अन्वये पत्र पो.स्टे.ला १६.१.०८ ला प्राप्त झाले. माहिती पुरविणेबाबत दि. १७.१.०८ ला कळविण्यात आले. नामे किशोर सुंदरलाल खुराणा हे माहितीच्या अधिकाराचे अनुशंगाने माहिती मागवितात व माहिती देण्यास कर्मचारी किंवा सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना पाठविले असता माहिती न घेता तुमचे विरोधात वरिष्ठांकडे तक्रार केली आहे. कोर्टातून माहिती घेईन. तुमच्या माहितीची काही आवश्यकता नाही, असे म्हणून टाळाटाळ करतो व माहितीच्या अधिकारान्वये माहिती मिळाली नाही म्हणून परत मागतो.

सहा.जन माहिती अधिकारी श्री झिंगरे हे कर्मचारीसह ११.३.२००९ ला माहिती देण्यासाठी त्यांचे दुकानात गेले असता माझे वडील सुंदरलाल खुराणा दुकानात होते. त्यांना झिं गरे यांनी तुमच्या मुलाला पैशाची जास्त गर्मी आहे असे म्हटल्याचे खोटे आरोप लावून पोस्टाद्वारे १६.३.२००८ ला तक्रार दिली. वेळोवेळी माहिती घेण्यास टाळाटाळ करतो व कर्मचा-यांवरती खोटे आरोप लावतो. यापुर्वी अप.क्रं.२९/०७ क ४२०,४६५,,४६८,४७१,३४ भा.द.वि. गुन्हयाची माहिती पाठवून सुध्दा न मिळाल्याबाबत आपले आयोगासमोर २०.२.०९ ला माहितीचे अधिकारान्वये आपले आयोगासमोर सुनावणी झाली. त्यामध्ये आपण प्रकरण खारीज केले होते. तरीसुध्दा पुन्हा तीच माहिती १३.३.०९ ला मागितली आहे. वेळोवेळी माहिती पुरवून सुध्दा खोटेनाटे आरोप लावून पोलीस विभागावर ताशेरे उडवित असतो. वेळोवेळी मागून पोलीसांची दिशाभूल करतो व वरिष्ठांकडे तक्रार करतो तसेच माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करतो. करीता सविस्तर अहवाल सविनय सेवेशी सादर."

६. वरील जन माहिती अधिकारी यांनी केलेला पत्रव्यवहार व खुलाशावरुन व अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.१२.२००७ च्या तक्रारीवरुन जी माहीती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विहित मुदतीत असून योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३५/२००८**

**१) श्री विकास गणपतराव शेंडे,**
**नागरी बँक कॅालनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,**
**हिंदनगर, वर्धा-४४२००३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**सुधार प्रन्यास नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (दक्षिण),**
**सुधार प्रन्यास, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.३.२००८रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे बिल्डींग बॉयलॉज व कस्ट्रक्शन रुल्स फार नागपूर सिटी ४४ एम.आय.जी. मानेवाडा फौजदारी कार्यवाही व नुकसान भरपाई म्हणजे बांधकाम करण्यासाठी परवानगी मागण्यापासून आजपर्यंत दस्तऐवजाची मागणी करुन परिशिष्टात जोडल्याप्रमाणे, अशी माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.१०.२००७ रोजी उक्त प्रकरणाची धारिका या विभागात उपलब्ध आहे. कृपया आपणास हवी असलेली माहिती धारिकेची पडताळणी केल्यावर उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरीता दिनांक १५.१०.२००७ रोजी या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ४.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना कार्यकारी अभियंता (दक्षिण) यांनी अर्जाच्या संदर्भात कागदपत्रांची एकुण ४४ पृष्ठये असून प्रति पृष्ठ रुपये २/- प्रमाणे ८८/- रुपये आपण नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयातील स्टेशन रोड सदर, नागपूर-१ येथे रोख विभागात १५ दिवसांचे आंत जमा

करावयाचे असून रक्कम जमा केल्यावर त्याची प्रत या कार्यालयात उपलब्ध करुन दिल्यास कागदपत्रांच्या सत्यप्रती मागणी केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देता येतील. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी माहितीच्या अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती उशिरा मिळाली याबध्दल भरणा केलेले रुपये ८८/- वापस मिळावे अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

५. अपीलकर्ता यांनी अर्ज दिनांक २९.८.२००७ रोली केला आहे. कार्यालयात दिनांक ३१.८.२००७ रोजी प्राप्त झालेला आहे. व माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता दिलेले पत्र दिनांक १२.१०.२००७ चे असल्यामुळे अपीलकर्ता यांना अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे कलम ७(६) प्रमाणे सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २९.८.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती करीता अतिरिक्त खर्च हा दिनांक १२.१०.२००७ रोजी कळविलेला असल्यामुळे विलंबाने कळविलेला आहे व सदरचा अतिरिक्त खर्च रुपये हा त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत मनिऑर्डरने रजिस्टर पोस्टाने पाठवावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २४६/२००८**

**१) श्री मनोहर बापूराव खोरगडे, सहसचिव,
सिटीझन फोरम, महाराष्ट्र, नागपूर
एम-५, प्रिमियम प्लॅाझा, २४२ खरे टाऊन,
धरमपेठ नागपूर-४४००१० — अपीलकर्ता**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, जुने सचिवालय,
नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१, सदर,
नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.३.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"निविदा सुचना क्रं.४/२००७-०८ दिनांक ९ सप्टेंबर २००७ च्या लोकसत्ता दैनिकात प्रकाशित झालेली आहे.

दरवर्षी अशाच प्रकारी कामे हिवाळी अधिवेशनाच्या अगोदर करण्यात येतात असे आढळून येते. या कामाची अंदाजपत्रके मंजूर झालेली आहेत काय, असल्यास निविदेच्या क.क्रं.प्रमाणे अंदाज पत्रकाचे आदेश क्रमांक व दिनांक कळवावेत. अंदाजपत्रके मंजूर करतांना "मिराणी समितीचे" दुरुस्ती कामाबध्दलचे निकष पाळण्यात आलेले आहेत किंवा नाही. याबाबत माहिती देण्यात यावी.

(२) प्रसिध्द झालेल्या कामांच्या अंदाजपत्रकाचे तुकडे तुकडे करुन अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यात आली आहे का.

कार्यकारी अभियंता सा.बां.क्रं.१ नागपूर हयांनी संबंधीत कामांना आपल्याच स्तरावर जाणिवपुर्वक अंदाजपत्रकांना मंजूरी प्रदान केलेली आहे काय. याबाबतची सविस्तर माहिती पाठविण्यात यावी."

सदरची माहिती प्रत्यक्ष प्राप्त करण्यापर्यंत माहिती तयार होतच फोन नंबर भ्रमणध्वनी ९४२२१४७२२९ वर कळविण्यात यावे, असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले असे आयोगापुढे अपीलकर्ता यांनी सांगितले.

३. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.१२.२००७ रोजी देण्यात आला असून त्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे असे आयोगास सांगितले.

४. जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन कां दिली नाही असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १५.१०.२००७ रोजी उपरोक्त निविदा सूचनेप्रमाणे एकुण ९५ कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यांच्या तांत्रिक मंजूरीचे आदेशाची प्रत पुरविण्यास्तव खालीलप्रमाणे शुल्क लागणार आहे.

(१) ९५ पेजेस करीता रुपये २/- प्रमाणे १९०/- रुपये.

(२) मिराणी समितीच्या अहवालाच्या प्रती १५ पेजेस करीता २/- रुपये प्रती पेज प्रमाणे ३०/- रुपये असे एकुण २२० रुपये, तसेच वरील कार्यालयाचे पत्र दिनांक १८.९.२००७ नुसार अधिवेशन काळात प्रस्तावित केलेली कामे करण्यासाठी मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यामुळे मंजूर केलेल्या प्रत्येक कामाचे अंदाजपत्रक स्वतंत्ररित्या मंजूर करण्यात आलेले आहे. अतिरिक्त शुल्क भरल्यानंतर १५ दिवसांचे आंत मंजूर अंदाजपत्रकाच्या आदेशांच्या छायांकित प्रती पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्यानंतर दिनांक ८.११.२००७ रोजी रुपये २२०/- चा खर्च भरण्याकरीता २० दिवसांचा कालावधी उलटून गेलेला असल्यामुळे स्मरणपत्र दिलेले दिसून येते. स्मरणपत्र दिल्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांनी

अतिरिक्त खर्चाचा भरणा न करता दिनांक ११.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक ६.१२.२००७ रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेलो आहे व त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले.

५. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना वेळोवेळी सुनावणीस उपस्थित राहाण्याकरीता दिनांक २१.११.२००७ रोजी नोटीस पाठवून दिनांक ४.१२.२००७ रोजी उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता स्वतःच दिनांक १.१२.२००७ रोजी उपस्थित राहू शकत नाही असे त्यांनी कळविले. त्यानंतर पुन्हा दिनांक ६.१२.२००७ रोजी, दिनांक १३.१२.२००७ रोजी दुपारी ११.०० वाजता उपस्थित राहावे, असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक २६.१२.२००७ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. त्यात दिनांक १३.१२.२००७ रोजी सुनावणीस अपीलकर्ता हजर होते व निर्णयामध्ये संबंधीत विभागाचे माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१, नागपूर यांना आपण दिनांक १९.९.२००७ च्या अर्जानुसार मागितलेल्या माहितीतील जी माहिती अपूर्ण स्वरुपात दिलेली आहे त्या मुद्यांवरील माहिती परिपूर्णरित्या १५ दिवसांचे आंत विना मुल्य पुरविण्याचे आदेशित करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. मात्र, प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये कोणत्या प्रकारची अपूर्ण माहिती दिलेली आहे याबाबतचे विश्लेषण केलेले दिसून येत नाही व त्यामुळे कोणत्या प्रकारची अपूर्ण माहिती दिलेली आहे हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्पष्ट केलेले नाही. मात्र, अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००७ रोजी अतिरिक्त पैशाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेतलेली होती. प्रथम अपीलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणती अपूर्ण माहिती दिली हे आयोगापुढे सांगता आले नाही. मात्र त्यांनी छाननी करतांना निर्णय दिलेला आहे.

६. अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, "मिराणी समितीच्या अहवालाप्रमाणे अंदाजपत्रके आहे किवा नाही, तसेच त्यात दिलेले निकष पाळलेले आहेत किंवा नाही," याबध्दलची माहिती त्यांनी मागितली होती व ती त्यांना मिळाली नाही. जन माहिती

अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचेशी चर्चा झालेली होती व त्या चर्चेनुसार त्यांना प्रत्यक्ष माहितीचे उत्तर देता येत नाही असे सांगितले होते.

७. अपीलकर्ता यांनी सुध्दा मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मिराणी समितीच्या तरतुदी कामाबध्दलची निकष पाळण्यात आलेले आहे किंवा नाही याबाबत माहिती देण्यात यावी. यावरुन अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले दिसून येतात.

८. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल उदा. परिपत्रके, दस्तऐवज, कागदपत्रे, अभिलेखे, शासन निर्णय इ. स्वरुपात जी माहिती आहे त्यास माहिती असे म्हटलेले आहे. व कलम २ (ञ) "माहितीचा अधिकार" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे जी 'माहिती' उपलब्ध असेल त्या 'माहितीच्या' छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना ज्या अंदाजपत्रकाच्या प्रती उपलब्ध झालेल्या आहेत व मिराणी समितीचा अहवाल उपलब्ध झ ालेला आहे त्यानुसार अंदाजपत्रक आहे किंवा नाही हे अपीलकर्ता यांनी तपासून घ्यावयाचे आहे व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय हे अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे.

९. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, अर्जानंतर कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु, अधिनियमाचे कलम ७ प्रमाणे माहितीचा अर्ज आल्यानंतर त्या माहितीचा अतिरिक्त खर्च येत असेल तर अतिरिक्त खर्च कळविणे हे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या प्रक्रियेचाच भाग आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १५.१०.२००७ रोजी माहितीचा अतिरिक्त खर्च भरण्यासाठी कळविलेले होते. याचा अर्थ विहित मुदतीत खर्च भरण्यास कळविण्यात आले होते.

१०. अपीलकर्ता यांना माहितीच्या खर्चाकरीता ज्या वेळेस पत्रव्यवहार होतो त्या तारखेपासून तर खर्च भरणा करण्यापर्यंतच्या तारखेपर्यंतचा कालावधी हा ३० दिवसांच्या कालावधी मधून वगळून मिळतो, अशी तरतूद कलम ७ (३)(क)मध्ये आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी

दिनांक ६.१२.२००७ रोजी जो खर्चाचा भरणा कलेला आहे तोपर्यंतचा १५.१०.२००७ पासूनचा कालावधी हा वगळून मिळेल. त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

११. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असा युक्तीवाद केला की, विधीमंडळास जी माहिती उपलब्ध होते ती माहिती अर्जदारास मिळणे बंधनकारक आहे. परंतु, ही तरतुद अधिनियमाच्या कलम ८(१)मधील (ज) हया पोटकलमाच्या परंतुकामध्ये आहे. व जन माहिती अधिकारी यांनी कलम ८ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही अशा प्रकारे कलम ८ चा आधार घेवून माहिती नाकारलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी केलेला युक्तिवाद हा गैरलागू आहे.

१२. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपूर्ण माहितीच्या संदर्भात जो निर्णय दिलेला आहे तो वर नमूद केल्याप्रमणे प्रथम अपीलीय अधिकारी यांना विश्लेषण केलेले नाही. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील केले व अपूर्ण माहिती मिळाली अशी विनंती करुन जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावावी अशी विनंती केली आहे. त्यात प्रथम अपीलीय अधिकारीच जबाबदार आहे असे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अभिप्रायाच्या स्वरुपात जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भात ती अपूर्ण माहिती आहे असे म्हटलेले आहे व त्याबाबतही वर विवेचन केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली ती विहिती मुदतीत असल्यामुळे व कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १९.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे अतिरिक्त खर्चाचा भरणा घेवून माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व अतिरिक्त खर्चाचा भरणा विहित मुदतीत कळविला असल्यामुळे सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली आहे व त्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४२/२००८**

**१) श्री चंद्रकान्त रामभाऊ चिमोटे,**
**५२५, गुरुमाऊली, न्यू नंदनवन ले आऊट,**
**नागपूर** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,**
**नागपूर वनविभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वनअधिकारी,**
**नागपूर वनविभाग, नागपूर. शासकिय मुद्रणालयाजवळ,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००८(१३.२.२००८)रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय वनअधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

"जंगली जनावरांना बेशुध्द करण्याकरीता वापरण्यात येणा-या औषधी बाबत. कालावधी १.१.२००२ ते ३०.१०.२००७ (१) हेल्प्रो हेल्थ मेडीकल्स पुणे, तसेच ईतर औषधी कंपण्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या खालील नावाच्या औषधी कोणकोणत्या तारखांना खरेदी करण्यात आली. तीचा बॅच नंबर खरेदीचे परिमाण व त्यांची expiry date

(a) ketamin-५०ml/१००mg

(b) Xylogne-५० ml/१००mg

(c) Anlagalil-५० ml/१००mg.

D) बेशुध्द करण्याकरीता वापरण्यात येणारी खरेदी केलेली इतर औषधी इत्यादी बाबतची माहिती सर्व बिलांच्या छायांकित प्रती व त्यांची नोंद करण्यात आलेले साहित्य/भांडार नोंदवहीची छायांकित प्रत.

(२) एकुण खरेदी केलेल्या औषधा पैकी वर्गवार किती औषध किती वन्यप्राण्यांवर (दिनांकवार वन्यप्राण्यांच्या जातीसह)वापरण्यात आले. वापरण्याचे प्रमाण काय. त्यातील किती जनावरे जगली व किती जनावरे मरण पावली याचे विवरण पोस्टमार्टम रिपोर्टच्या छायांकित प्रती सहित. (३) खरेदी केलेल्या औषधी पैकी किती औषध शिल्लक आहे. याबाबत उपवनसंरक्षक नागपूर वनविभाग, नागपूर यांचा तपासणी अहवाल."

३. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक २९.१२.२००७ रोजी माहिती दिलेली दिसून येते. परंतु, सदरची माहिती ही अपूर्ण व विलंबाने दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची मागितलेली माहिती ही वनपरिक्षेत्राधिकारी, सेमीनरी हिल्स यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे त्यांना दिनांक १३.११.२००७, २६.११.२००७, ४.१२.२००७ व २९.१२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्रे दिलेली आहेत. त्याप्रमाणे दिनांक २९.१२.२००७, ३१.१२.२००७ व १०.१.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांना सुध्दा दिनांक १२.१२.२००७ अन्वये उपलब्ध माहिती घेवून जाण्यासाठी कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक २९.१२.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध झाली होती ती पुरविण्यात आलेली दिसून येते. तसेच दिनांक १४.१.२००८ रोजी उपवनसंरक्षक यांचे आदेशाप्रमाणे सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.परंतु उपलब्ध झालेली माहिती अपूर्ण आहे असे

अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यांनी सन २००२ ते २००७ या कालावधील औषधी खरेदीची माहिती मागितलेली होती. अर्थात ही माहिती जूनी व व्यापक आहे व त्यामुळे याबाबत अभिलेखे



हे उपवनपरिक्षेत्राधिकारी यांचेकडे उपलब्ध असल्यामुळे हा विलंब झालेला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना विशिष्ट अशी माहिती उपलब्ध झालेली नाही व त्याबाबत त्यांनी आयोगाकडे विश्लेषण सुध्दा केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीच्या संबंधात जी अभिलेखे उपलब्ध आहेत त्या अभिलेख्यांची पाहाणी करुन त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संबंधीत अभिलेखे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यांना आवश्यक ती माहितीच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवून त्याप्रमाणे उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांचेकडे अभिलेख्यांची पाहाणी करुन त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५०/२००८**

**१) श्री जागोबाजी बुध्दुजी गाठीबांधे,**
**नवीन भाजी मार्केट जवळ, पेठ इतवारी,**
**उमरेड, ता. उमरेड, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त,**
**नगरपालिका प्रशासन, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, उमरेड, ता. उमरेड, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १४.९.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, उमरेड यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

"नगरसेविका सौ.आबेदा बेगम पठाण यांचे पती श्री मेहमुदखॅा जब्बारखॅा पठान व इतर यांना नगर परिषद उमरेड यांना पेठ इतवारी नवीन भाजी मार्कट जवळ उमरेड यांना नं.प.उमरेड यांनी किती जागा लिजवर दिली आहे. (२) व त्यापैकी त्यांचा बांधकाम किती केलेला आहे. (३) व अतिक्रमण केलेली जागा किती आहे. (४) बांधकाम नकाशात बांधकामाची मंजूरी किती त्याची छायाप्रत देण्यात यावी."

३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ११.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना २ मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती आपणाकडून कोणत्याही प्रकारची समाधानपुर्वक माहिती उपलब्ध झाली नाही असा आक्षेप घेतलेला दिसून येतो. व त्यामुळे दिनांक १७.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.११.२००७ रोजी देण्यात आला असून श्री पठाण यांनी केलेल्या बांधकामाबाबत नगर परिषदेच्या अभिलेख्यावरुन तात्काळ माहिती देण्याचे प्रतिवादी यांनी मान्य केले. अतिक्रमण केलेली जागा किती आहे या मुद्याची माहिती सिटी सर्व्हेकडून अहवाल आल्यानंतर पुरविण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. व मुद्या क्रमांक २ ची माहिती आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले आहे. त्यानंतर दिनांक ७.१२.२००७ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद, उमरेड यांनी श्री मे.ज.पठाण यांच्या अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात नोटीस देण्यात आलेली दिसून येते. दिनांक १.१०.२००७ रोजी मुख्याधिकारी नगरपरिषद उमरेड यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे आखिव पत्रिका व नकाशे मागण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. दिनांक ८.१०.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहितीचे शुल्क रुपये १०/- मागणी केलेली दिसून येते. व त्यानंतर वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक १८.१०.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करताना असे सांगितले की, त्यांना अतिक्रमणाच्या बाबत माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती. त्यावर माहिती अधिकारी, नगर परिषद यांनी प्रथम अपीलीय अधिकारी याचेकडे खुलासा करताना मुद्या क्रं. २ व ३ व अर्ज क्रमांक २ मधील संदर्भाकिंत जागा ही नगर भूमापन क्रमांक ३९७२ नगर परिषद मालकीची नसून महाराष्ट्र शासन मालकीची आहे. त्या जागेवर गैरअर्जदारासह अर्जदार व इतरांचे सुध्दा अतिक्रमण प्रथम दर्शनी दिसत असल्यामुळे त्यावरील अतिक्रमणाबाबत सिटी सर्व्हे विभागाकडून रितसर मोजणी करुनच अचुक माहिती देणे क्रम प्राप्त होते. त्यानंसार त्यांना पत्र दिनांक ११.१०.२००७ अन्वये माहिती देण्यात आलेली आहे.

अर्जदाराचे दिनांक १३.८.२००७ चे तक्रारीनुसार दिनांक ९.१०.२००७ ला नगर परिषदेने गैरअर्जदाराचे शासकिय जागेवरील अतिक्रमण काढले आहे. बोअरवेल जमीनीखाली असल्यामुळे काढण्यात आलेली नाही. करीता नगर परिषदेने सिटी सर्वे विभागाला मोजणीबाबत अर्ज दिनांक

२४.१०.२००७ ला केलेला आहे व लवकरच मोजणी करुन तशी माहिती अपीलार्थीला देण्यात येईल असा खुलासा करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी गैरअर्जदार व अपीलार्थी हे शेजारी असून दोधांना नगर परिषदेद्वारे जागा लीजवर बांधकामाकरीता सन १९५० पूर्वी देण्यात आलेल्या आहेत. यांचे मकानाचे शेजारी खुली शासकिय जागा असून दोघांनी पूर्वी नवीन बांधकाम करतांना यावर काही प्रमाणात अतिक्रमण केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते व या जागेवर अवैध ताबा करण्यास्तव दोन्ही पक्ष प्रयत्नशिल आहेत. या करिता नगर परिषदेने कायमचा तोडगा निघावा म्हणून सिटी सर्वे विभागाकडून या भागातील सहा मालमत्तेची मोजणी करुन व अतिक्रमणे निश्चित करुन ती काढण्याबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे.

त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जागा नगर परिषदेची आहे. नकाशा नगर परिषदेमध्ये आहे. मग प्रकरणाची माहिती सुध्दा नगर परिषदेमध्ये असायला पाहिजे. व ती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे तरतुदीप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात असते. कोणत्याही अतिक्रमणाची माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात कार्यालयात उपलब्ध नसते. त्यामुळे जे अतिक्रमण आहे किंवा नाही ते दर्शविणारी जी कार्यवाही केलेली आहे ती योग्य आहे व अपीलकर्ता यांना माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली दिसून येत नाही. व त्यामुळै दिनांक ५.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना त्याबाबतची पुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांना दिनांक २३.३.२००९ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १४.९.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर**

Order०९Balki

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५५/२००८**

**१) श्री टि.जी. नवलाखे,**
**४, मिलींद सोसायटी, नरेंद्र नगर,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**अति.कामगार आयुक्त कार्यालय,**
**भोसला चेंबर्स, सिव्हील लाईन, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**अति. कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**
**भोसला चेंबर्स, सिव्हील लाईन, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी त्यांचे दिनांक ४.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी अतिरिक्त कामगार आयुक्त यांचे कार्यालयात एकुण १ ते १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.
सदरची माहिती स्पीड पोस्टाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००८ रोजी प्रथम अपील हे अतिरिक्त कामगार आयुक्त यांचे कार्यालयात दाखल केलेले दिसून येते. मात्र त्यानंतर दिनांक ४.३.२००८ रोजी माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या संबंधात कागदपत्रांचे निरीक्षण करावयाचे आहे त्याकरता लागणारी फी आपल्या कार्यालयात जमा करावयाची आहे, तरी नोंद घेवून प्रकरणात निरीक्षणास अनुमती देण्यात यावी असे दिनांक ५.३.२००८ रोजी माहिती अधिकारी यांना साध्या अर्जाने कळविलेले दिसून येते. दिनांक १९.३.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांना साध्या अर्जाने निरीक्षणास बोलाविले नाही अशी तक्रार केलेली दिसून येते. व त्यानंतर माहिती उपलब्ध

झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १.४.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.२.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी आयोगास सांगितले व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबध्दल सिध्द करण्याची जबाबदारी असल्यामुळे त्यांना विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १.३.२००८ रोजी हवी असलेल्या माहितीच्या ६१ प्रतीसाठी रुपये १२२/- इतके शुल्क व नोंदणीकृत पत्राने पाठविण्यासाठी रुपये ३०- असे एकुण रुपये १५२/- शुल्क आहे. सदरचे शुल्क जमा करुन उपरोक्त माहिती घेवून जावी असे पोस्टाने कळविलेले आहे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी जावक नोंद वहीचा पुरावा दाखल केला आहे. मात्र वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम अपील दाखल झाल्यानतर स्वत: अपीलकर्ता यांनी दोन साधे अर्ज केलेले असून अतिरिक्त फी चा भरणा केलेला नसून माहिती निरीक्षणास उपलब्ध करुन दयावी असे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविलेले आहे. परंतु पुन्हा दिनांक २६.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना रुपये १५२/- शुल्क आपणास भरण्यास कळविण्यात आले होते. परंतु अतिरिक्त शुल्क न भरता आपण दिनांक ४.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये निरीक्षण करण्याकरीता या कार्यालयास पत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहावे असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ११.४.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी यांनी माहिती हवी असल्यास निरीक्षण करुन विहित शुल्क भरुन आपणास माहिती सादर करण्यास हे कार्यालय कटिबध्द आहे, असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ४.६.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक ११.६.२००८ रोजी ११.३० वाजता हजर राहावे असे कळविलेले दिसून येते. व त्याकरीता जावक नोंदवहीचा पुरावा त्यांनी आयोगास दाखविला. यावरुन राज्य जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता खर्चाचा भरणा करावा असे विहित मुदतीत कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरच्या खर्चाचा भरणा केलेला नसून माहितीच्या अर्जात निरीक्षणासाठी माहिती उलपब्ध करुन द्यावी अशी मागणी नसताना सुध्दा नंतर साध्या पत्राने निरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन द्यावी अशी

विनंती करुनही ते निरीक्षणासाठी उपस्थित राहीलेले दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास रुपये १५२/- भरणा करणे आवश्यक राहील व निरीक्षण करावयाचे असल्यास जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून निरीक्षण करुन आवश्यक असलेल्या माहितीच्या कागदपत्राच्या प्रतीकरीता येणा-या खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेता येईल. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी योग्य ती प्रक्रिया व प्रयत्न केलेले दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५२/२००८**

**१) श्री अरविंद अर्जुनजी मेश्राम,**
**रा.प.एस.मेश्राम नगर, धम्मसुगती समोर,**
**सुगतनगर चौक नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय,**
**नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा,**
**नगर भूमापन अधिकारी क्रं.२,**
**नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी यांचेकडे मौजा नारी प.ह.नं.११ ख.क्रं.१३२ मधील जमीनी संबंधी मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे प्रकरण क्रमांक ७१७/०६ अन्वये न्यायप्रविष्ट आहे. कोर्टाचे कामाकरीता आवश्यक असल्याने खालील मुद्येसुद माहिती पुरविण्याबाबत असे नमूद करुन एकुण १९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००८ रोजी प्रथम अपील हे अधीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.४.२००८ रोजी देण्यात आला असून त्या निर्णयामध्ये दिनांक ३.३.२००८ रोजी माहिती घेवून जाण्याबाबत अर्जदार यांना कळविले आहे व माहिती उपलब्ध असल्याबाबत कळविलेले दिसून येते. व त्यामुळे प्रथम

अपीलाच्या आदेशामध्ये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी ८ दिवसांत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंसार दिनांक ११.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रुपये ५,२०५/- असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी सदरचे शुल्काचा भरणा केलेला दिसून येत नाही. मात्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००८ रोजी जे पत्र पाठविलेले आहे त्या पत्राची प्रत सादर केलेली नाही. मात्र दिनांक ३.३.२००९ अशी तारीख असेलेल्या पत्राची प्रत सादर केली आहे. त्याअर्थी सदरच्या पत्राची प्रत ही आयोगाची नोटीस आल्यानंतर तयार करण्यात आलेली दिसून येते. असे असले तरी प्रथम अपीलामध्ये दिनांक ३.३.२००८ च्या पत्राचा उल्लेख दिसून येत असल्यामुळे सदरचे पत्र पाठविलेले आहे असे गृहित धरावे लागते. परंतु सदरचे पत्र हे विहित मुदतीत संपूर्ण निश्चित फी पाठविलेली नाही व त्यात कोणत्याही प्रकारचा खर्चाच्या संबंधात निश्चित उल्लेख केलेला नाही. त्यावरुन माहितीच्या अर्जाच्या संदर्भात कार्यवाही केलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अर्जदारास अधिनियमाचे कलम ७(२) प्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी तरतूद आहे. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे व त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.२.२००८ च्या अर्जावर विहित मुदतीत योग्य ती कार्यवाही केलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे संयुक्तिक राहील व ती तशी अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी करावी. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी म्हणून नगर भूमापन अधिकारी यांचेकडे जरी अर्ज दाखल केला असला तरी त कार्यालयात जे माहिती अधिकारी असतील त्यांचे विरुध्द सदरची कारवाई करणे आवश्यक राहील. त्याकरीता

अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.२.२००८ च्या अर्जाप्रमाणे जी माहीती कार्यालयात कागदपत्राच्या किंवा नकाशाच्या स्वरुपात उपलब्ध आहे ती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ५१७/२००८**

**१) श्री सुरेश शालिकराम दुरुगकर,**
**(श्रीनगर) भ्रष्टचार विरोधी जन आंदोलन(महाराष्ट्र सदस्य)**
**श्रीनगर चंद्रशेखर वार्ड बब्बाभवनच्या जवळ, गोंदिया,**
**ता.जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**भंडारा जिल्हा वन विभाग शासकिय कर्मचारी सहकारी पत संस्था,**
**गोंदिया.** **गैरअपीलार्थी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**भंडारा जिल्हा वन विभाग शासकिय कर्मचारी सहकारी पत संस्था,**
**गोंदिया.** **गैरअपीलार्थी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.७.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००८ रोजी माहिती मागण्यासाठी **जन माहिती अधिकारी म्हणून भंडारा जिल्हा वन विभाग शासकिय कर्मचारी सहकारी पत संस्था, गोंदिया** यांचेकडे अर्ज दाखल केलेला दिसून येतो. अर्जाचे अनुषांगाने कोणत्याच प्रकारची माहिती मिळाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००८ रोजी **प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून भंडारा जिल्हा वन विभाग शासकिय कर्मचारी सहकारी पत संस्था, गोंदिया** यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती मिळाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. परंतु, श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. व अपीलकर्ता यांनी ज्या संस्थेकडे माहिती मागितलेली आहे ती गैरअपीलार्थी संस्था ही सहकारी पत संस्था असल्यामुळे

सदरच्या संस्थेसही मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी दिलेला वरीलप्रमाणे निर्णय लागू होत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

३) सदरचे अपील खारीज करण्यांत येत आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६३/२००८**

**१) श्री देवचंद वामनराव सोनटक्के, सचिव,**
**बजरंग नगर गृह निर्माण सह संस्था मर्या. नागपूर**
**मानेवाडा रोड, श्री सार्वजनिक हनुमान मंदिराजवळ,**
**बजरंगनगर, नागपूर-२७. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त-१,**
**महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक निरंक रोजी जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १९९८ ते २००६. "(१) नसीन नं. ००००५२ दि. ३१.३.२००६ आणि रसिद क्रं.००००६९ दि. ३१.३.२००६ अन्वये दि. १.७.९८ ते ३१.३.२००६ पर्यंत एकुण कर रु. १,४०,००० (एक लाख चाळीस हजार) आणि रु. ५८५२७ अनुक्रमे भरला आहे. या पावतीवर श्री महादेव दमडुजी साठवणे यांचे नांव दिसुन येत असून घर क्रं.२५७७ असा नमुद केला आहे. सबब या संदर्भात मला खालील माहिती आणि संबंधीत कागदपत्रे हवी आहेत.

(२) घर क्रं.२५७७ चा खसरा नंबर काय आहे. कळवावे.

(३) घर क्रं.२५७७ ची चतुर्सिमा काय आहे. कळवावे. तसेच नकाशाची प्रत द्यावी

(४) घर क्रं. २५७७ ची आराजी (क्षेत्रफळ) किती आहे. कळवावे.

(५) घर क्रं. २५७७ चे पोट हिस्से आहेत काय. असल्यास किती आहेत. आणि त्यांची नांवे कळवावीत.

(६) श्री महादेव द. साठवणे यांना टॅक्स भरण्याची परवानगी देण्यापुर्वी संस्थेकडून ना हरकत प्रमाणपत्र आणण्याची सूचना दिली होती काय. आणि तसे या संस्थेस कळविण्यांत आले होते काय. माहिती द्यावी. तसेच या बाबतीत श्री दमडु वारलु साठवणे यांचे वारसांना कळविले होते काय.

(७) सदर पावती वर चेक क्रं.१६५७३३ दिनांक ३१.३.२००६ आणि चेक नं. १६५७३४ दिनांक ३१.३.२००६ नमूद केला आहे. सबब हे चेक्स कोणत्या दिवशी वठवले गेले आणि मनपा, नागपूरच्या खात्यात कधी जमा झाले ते कळवावे."

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.८.२००७ रोजी "उपरोक्त संदर्भाकिंत पत्रानुसार आपण मागितलेली माहिती आपणांस सोबत टाचन केलेल्या पत्रानुसार देण्यात येत आहे." उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये दिलेली माहिती चुक व खोटी असल्याचे कारण दिलेले आहे.

४. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.८.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीने मागितलेली माहिती करनिर्धारक तथा माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक २८०/एडी, दि. ६.८.२००७ नुसार दिलेली होती. घर क्रमांक २५७७ वर अपीलार्थी व श्री महादेव दमडुजी साठवणे या दोघांनीही हक्क दाखविल्यामुळे विभागाने प्रकरणाची नस्ती सहा. आयुक्त, झोन-३ हनुमाननगर यांचेकडे पाठवून दोनही पक्षाचे म्हणणे ऐकुण अभिलेख दुरुस्तीची कार्यवाही करावी. माहिती दिली असल्याने प्रस्तुत अपील निकाली काढण्यात येते असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. द्वितीय अपील मेमोमध्ये संस्थेच्या मालकी जागेवर श्री महादेव साठवणे यांचेकडून मनपा नागपूरच्या कर विभागाने सुमारे दोन लाख टॅक्स भरुन घेतला आणि त्या आधारे त्या जागेवर

श्री महादेव साठवणे यांनी दावा केला. सबब तो टॅक्स रद्य करुन योग्य ती माहिती देण्याबाबत. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना सुध्दा अर्जात नमुद केलेली मालमत्ता ही महादेव साठवणे यांनी नसुन सुध्दा टॅक्स भरण्याची परवानगी संदर्भात जी माहिती मागितलेली आहे ती चुक दिलेली आहे.

वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उलपब्ध करुन दिलेली आहे ती त्या मालमत्तेच्या संदर्भामध्ये कर भरण्याच्या संदर्भात जी वस्तुस्थिती आहे ती वस्तुस्थितिची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचा आक्षेप असा आहे की, श्री महादेव साठवणे यांना अधिकार नसतांना ते कर कोणत्या अधिकारान्वये भरतात ही उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीची असून ती दुरुस्त करुन देण्यात यावी, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(च) "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात दस्तऐवज, अभिलेखे, कागदपत्रे, परिपत्रके , टिपणी इ. ज्या स्वरुपात उपलब्ध असते त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती घणे अशी "माहितीचा अधिकार" या संज्ञेची सुध्दा व्याख्या आहे. व त्यामुळे जशी माहिती उपलब्ध आहे तशी ती उपलब्ध करुन देण्याचे अपेक्षित असते. उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे निर्णय प्रक्रियाचे संदर्भामध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या अपेक्षेप्रमाणे दुरुस्त करुन माहिती देता येणार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मात्र माहितीच्या अधिकारामध्ये माहिती उपलब्ध झाली आहे किंवा नाही या निर्णयाच्या कार्यकक्षेपलीकडे अभिलेखे दुरुस्त करावी असा जो निर्णय दिलेला आहे तो अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणारा आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांची जी प्रत्यक्ष दुरुस्ती करुन मिळावी हे म्हणेणे योग्य नाही.

अर्जदारास, जी माहिती उपलब्ध होती त्या माहितीच्या आधारे जर निर्णय प्रक्रियेत निर्णय योग्य रित्या झालेली नसेल तर संबंधीत योग्य त्या कायदयाखाली अधिकार असणा-या

सक्षम अधिका-यांकडून त्यांना न्याय मिळवून घेता येतो किंवा न्यायालयात जावून न्याय मिळवून घेता येईल. त्यामुळे जी माहिती उपलब्ध झाली आहे ती माहिती जशी उपलब्ध आहे तशी उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक निरंक च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध झाली आहे ती विहित मुदतीत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २७१/२००८**

**१) श्री मनोज सुखदेव खोब्रागडे,**
**बेलेवाडी, राधाकृष्ण टाकीज मागे, चंद्रपूर,**
**ता.जि. चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**धर्मदाय सहआयुक्त कार्यालय,**
**सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी**
**धर्मदाय सह आयुक्त कार्यालय,**
**सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून धर्मदाय सहआयुक्त यांचे कार्यालयात श्री अे.एफ. गवई, सहा. धर्मदाय आयुक्त, नागपूर यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीची माहिती पुरविण्याबाबत. कालावधी सन २००७ व खालील दोन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) आपले पत्र क्रं.धसआ/गोप/५९/०७, दि.२१.११.२००६ अन्वये मी आपल्या कार्यालयात हजर झालो आपण माझे जबाब नोंदविले. त्या आधारे आपण काय चौकशी केली. चौकशीचा निपटारा काय झाला. (२) चौकशी अहवाल वरिष्ठांना पाठविला असल्यास अहवालाची साक्षांकित प्रत पुरवावी."

३. अर्जाचे अनुषंगाने अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही गोपनिय स्वरुपाची असल्याने ती पुरविता येत नाही याबाबत अर्जदाराला सूचना देवून सदर्हु अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे उत्तर दिलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या उत्तरामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००८ रोजी प्रथम अपील हे सहा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. परंतु, प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे व आज धर्मदाय सह आयुक्त यांचे कार्यालयातून कागदपत्रे दाखल नसल्यामुळे धर्मदाय सहआयुक्त यांनी सदरच्या प्रथम अपीलाची (धर्मदाय सह आयुक्त हे अपीलीय अधिकारी आहे) कोणतीही दखल घेतली नाही. त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंधन केलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागलेले दिसून येते. व अपीलकर्ता यांनी आयोगास सांगितले की, तक्रार त्यांनीच केली होती, त्यांचेच बयाण घेतलेले होते व त्या बयाणाच्या आधारे चौकशी केली आहे. त्यामुळे सदरच्या तक्रारीचा चौकशी अहवाल गोपनिय ठरु शकत नाही व त्याबाबतची माहिती त्यांना उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती.

४. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचा स्वतःचा समज होता की, तो गोपनिय अहवाल आहे व म्हणून त्यांनी ती माहिती दिली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपीलकर्ता हजर झाले नाही असा त्यांनी तोंडी युक्तीवाद केला.

प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल झालेली नाही हे वर नमूद केले आहेच. अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज ज्या पध्दतीने हाताळण्यात आलेला आहे त्यावरुन धर्मदाय आयुक्त कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत कोणतीही माहिती दिसून येत नाही. व त्यामुळे अर्ज व अपील हे बेजबाबदारपणे हाताळण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात वर नमूद केलेले आहेतच. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीवर झालेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.१.२००८ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २७५/२००८**

**१) श्री सौ. सरला नवरतनमलजी मोदी,**
**मित्र चौक, देशसेवा रोड,**
**वरोरा-४४२९०७, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. तसेच अपीलकर्ता यांचे वतीने ॲड. डी.आर. वरघने उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केलेले दिसून येत नाही

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, वरोरा यांचेकडे खालीलप्रमाणे एकुण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००७ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व सोबत कागदपत्रे सुध्दा दिलेली दिसून येते. परंतु, प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी इतरही अनेक अर्ज दाखल केलेले दिसून येते व त्याबाबतही मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. मात्र, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती खोटी व दिशाभूल करणारी माहिती आहे. व त्याकरीता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपील हे अधिनियमाच्या कलम १९(३) प्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या विरुध्द करावयाचे असते. सदरच्या प्रकरणामध्ये प्रथम अपीलच दाखल केलेले नसल्यामुळे सकृत दर्शनी द्वितीय अपील हे विचारात घेता येत नाही. त्यातही अपीलकर्ता यांचे वकील ॲड. डी.आर. वरघरे यांनी आयोगाच्या निदर्शनास असे आणले की, दिनांक ३०.४.२००७ रोजी जी

माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, ती माहिती दिशाभूल करणारी आहे. दिनांक २६.२.२००७ रोजी अर्जदारांनी जो अर्ज केलेला आहे, त्या अर्जाच्या संदर्भात त्यांनी कार्यवाही विचारलेली होती. परंतु, जे उत्तर दिलेले आहे तो जाहिरनामा हा वेगळयाच नांवाने प्रसिध्द केलेला दिसून येते. म्हणजे वेगळयाच नांवाने केलेली कार्यवाहीची प्रत दिलेली आहे. व यावरुन उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य नाही असे दिसून येते. परंतु, ही बाब प्रथम अपीलात तपासून पाहाणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांनी प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक राहील.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे प्रथम दाखल करावे व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे.

प्रथम अपील दाखल करण्यास अधिनियमात दिलेल्या मुदतीची सुट देण्यात येत आहे. व प्रथम अपील दाखल झाल्यावर ३० दिवसांचे आंत प्रथम अपीलाचा निण्र्य देणे आवश्यक आहे.

२) सदरच्या आदेशाची एक प्रत प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २७४/२००८**

**१) श्री सौ.सुनिता कोमल कुमेरीया,**
**रा.पानवाडी, ता. काटोल, पो.खानगांव,**
**जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**पंचायत समिती, काटोल,**
**ता. काटोल, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत पानवाडी, ता. काटोल,**
**जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे त्यांचे पती श्री कोमल कुमेरीया हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून पंचायत समिती, काटोल यांचेकडे अर्ज केला होता. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.२.२००८ रोजी सुधारित अक्षरात अर्ज सादर करावा म्हणून कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक १५.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी सुधारित अर्ज दाखल केला होता. सदरच्या अर्जात मागितलेल्या माहितीस खर्च येणार होता म्हणून अपीलकर्ता यांना खर्च कळविण्यात आला. त्यावर अर्जदार अपीलकर्ता यांनी ते दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे व खर्च भरण्याची आवश्यकता नाही असे त्यांनी कळविले. त्यानंतर दिनांक ३.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १६.४.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याबाबतचा खर्च हा

ग्राम पंचायतच्या निधीतून करण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २८१/२००८**
**अपील क्रमांक २८२/२००८**

**१) श्री दामोदर जगन्नाथ बावणे,**
**२४, एस.ई.रेल्वे हाऊसिंग कॅालनी नं.२,**
**प्रतापनगर, नागपूर-२२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**मंगरुळपीर, जिल्हा वाशिम. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**मंगरुळपीर, जिल्हा वाशिम. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.३.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत. त्यांचे वतीने श्री बी.व्ही. राऊत,अव्वल कारकून हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**२.** अपील क्रमांक २८१/०८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) मौजा मालशेल त. मंगरुळपीर येथील तलाठी तथा राजस्व निरीक्षक यांनी शेतमालकाने म्हणजे आम्ही जमीन विकली नसतांना, बोगस खरेदी खताप्रमाणे फेर फार घेणे, तो रुजू करणे व ७/१२ मध्ये भोगवटदाराचे कोष्टकात १-२१ हेक्टर जमीनीचे मालकी हक्क, घेणरांचे नांवे दर्ज करण्याची धांदली व खोटे रेकार्ड तयार करणेबाबत कारवाई करणे. याचे बोगस ७/१२चे आधारे विहिरीसाठी कर्ज किंवा स्कीमद्वारे मोठी विहिर शेतात खोदल्याचे कृष्णकृत्य केल्याचे समजते,त्याची वेगळी कारवाई करीत आहे. तलाठी यांनी विहिरीसाठी कर्ज देण्याची शिफारस केली होती काय, कळवावे.

(२) रा.मा.क्रं. :टीएनसी-३६/मालशेल/१/८८-८९ यातील तहसिलदार मंगरुळपीर यांचे आदेश दिनांक ३१.१.१९९० प्रमाणे तथा ताबा वारंटप्रमाणे १७.५.१९९३ रोजी स.नं.१५४ आराजी ६.३१ हेक्टर किंवा १५ एकर २४ गुंठे जमीन प्रत्यक्ष आमचे ताब्यात दिल्यावरही ७/१२ मधील बु-हानशा लालशा यांचे नांव ७/१२ शेरे कोष्टकात तसेच ठेवणे तथा बोगस खरेदी खताप्रमाणे १.२१ हेक्टर जमीनीवर भोगवटदार कोष्टकात दर्ज सुरेश धनसिंग जाधव यांचे नांवे र. न करीता तसेच ठेवणे. वरील राजस्व मामल्याचे केस रजिस्टरची प्रत पुरविणे व सध्या केस कोठे आहे सूचित करणे.

(३) दिनांक २२.१०.१९९३ रोजी राजस्व निरीक्षक शेल यांस वरील क्रं.१ व २ मध्ये वर्णीत दुरुस्ती करण्यासाठी दिलेल्या अर्ज दाबून ठेवणे.

(४) अनिवार्यपणे आवश्यक १०० रुपयाचे स्टॅम्प वरील वाहतीबाबत ॲग्रीमेंट व पहताच ७/१२ मध्ये दिवानजी/राजोटया यांची नांवे वहितदार म्हणून दर्ज करुन धादली करणे आजही तेच चालू आहे.

(५) तलाठी माल शेल तथा राजस्व निरीक्षक शेल यांचे बाबत कृत्याची चौकशी करणे व त्यांचे अपराधिक कृत्याबध्दल त्यांना शिक्षा करणे त्यांची हल्लीचा पत्ता पुरविणे सेवानिवृत्त झाले असल्यास पेन्शन केसमधून त्यांचा हल्लीचा पत्ता पुरविणे.

(६) मौजा मालशेल सर्वे नं.१५४ चा ७/१२ दुरुस्त करुन त्याची दुरुस्त प्रत पुरविणे.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : (१) मौजा मालशेल तह. मंगरुळपीर येथील स.न. १५४ गट नं. ३६४ चे संबंधी फेर फार नं.१७७ दि. २९.६.९० ची तलाठी यांनी घेतलेली नोंद नियमाला धरुन होती काय. त्याची रुजवात राजस्व निरीखक सेल यांनी दिनांक १८/अस्पष्ट/९० रोजी केली ती नियमाला धरुन होती काय. शेतमालकाला नोटीस न काढता त्यांची जमीन परभारे बोगस व्यवहाराप्रमाणे दुस-याचे नांवे करणे नियमाला धरुन होते काय. याबाबत आपले अभिप्राय रिपोर्ट पुरविणे.

(२) तलाठी मालशेल यांचे रेकार्डला असलेले दि. २८२.१९८९ चे खरेदी घेणार सुरेश धनसींग जाधव व विकणार श्रीमती जै्तुनबी बु-हानशा. सनं. १५४ पैकी १.२१ हेक्टरचे रुपये ९,०००/- चे

खरेदीखताबाबतचे माहेवार पत्रकाची छायाप्रत पुरविणे व तसे माहेवार पत्र तलाठी रेकार्ड असल्याबाबतचे प्रमाणपत्र पुरविणे."

३. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.३.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीना निर्णय झाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १५.३.२००७ रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते, तीही संपुर्ण माहिती नाही. तसेच दिनांक ७.४.२००७ रोजी खरेदी व्यवहाराबाबत खरेदी खताची नक्कल इ. करीता शुल्क रुपये २२०/- आकारण्यात आले असून पावती यासोबत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. तरीही अपीलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध झालेली नाही व त्याकरीता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. सर्वप्रथम अपीलकर्ता यांना दिनांक ६.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. व त्यांचे विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक राहील.

५. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे मुदतीत दाखल केले नाही व त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केला नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयात विलंबाचा विचार केलेला नसल्यामुळे आयोगास सुध्दा त्याबाबत विचार करता येत नाही. मात्र, द्वितीय अपील मुदतीत असल्यामुळे अपीलकर्ता यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक राहील असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचेकडून करण्यात आलेला रुपये २२०/- चा भरणा परत करणे आवश्यक राहील व त्यांना अधिनियमाचे कलम ७(२) प्रमाणे विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक २८२/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, मंगरुळपीर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"(१) मा. तहसिलदार मंगरुळपीर यांचे फायलावरील राजस्व मामला क्रमांक:टीएनसी-३६/नांदखेडा/१/८८-८९ यांच्या केस रजिस्टरची नक्कल पुरविणे.

(२) वर वर्णात मामला सध्या कोणत्या स्टेजवर प्रलंबीत आहे निकाली काढला असल्यास त्यातील आदेशाची किंवा आर्डर शीटची नक्कल पुरविणे.

(३) मौजा नांदखेडा तह. मंगरुळपीर येथील आमचे मालकीचा सर्वे नंबर ३३ आराजी ३२ एकर ३६ गुंठे ही शेतजमीन पार्टनरशिपमध्ये श्री बु-हानशा लालशा मुसलमान फकीर रा. नांदखेडा वाहत होता. त्याबाबत कुळकायदा मामला क्रं.१२२४/५९(१३)/६३-६४ तहसीलदार मंगरुळपीर यांचे कोर्टात रजिस्टर करण्यात आला होता. यांस ३०.१०.१९६८ चे निर्णयाप्रमाणे उक्त ३२ एकर ३६ गुंठे ही शेत जमीन रुपये १८५४-/मध्ये बु-हानशा लालशा यांस कुळ मालक म्हणून बहाल करण्यात आली होती. जमीनीची पूर्ण किंमत आम्हाला देण्यात आली नाही. त्यापैकी रु. ८५४.०० चे रिफंड व्हावचर रेव्हेन्यू तिकीटावर सही करुन माझेकडून जमाबंदी सेक्शन जिल्हा कचेरी येथे भरुन घेण्यात आले. त्यालाही १५ वर्षाचे वर काळ झाला आहे. मामल्याचा निर्णय दिनांक ३०.१०.६८ रोजी झाला आहे त्याला आता ३८ वर्ष झाले आहेत. कु ळ मालकांस जिल्हाधिकारी यांचे आदेशाशिवाय उक्त जमीन हस्तांतरीत करीता येत नाही अशी नोंद ७/१२ चे शेरे कोष्टकात दर्ज आहे. तरीपण कुळ बु-हानशा यांचे व त्यांचे मृत्यूनंतर त्याची पत्नी व मुले यांनी २६.६.१९७८ पासून (१२ वर्षाचे आंतच) पुढील काळात शेताचे ३-४ एकराचे तुकडे करुन ७-८ इसमांना जमीन रजिस्टर्ड खरेदी खताप्रमाणे हस्तांतरीत केली व हजारो रुपयांची कमाई केली आज त्या पूर्ण शेताची किंमत ४० लाख रुपये आहे व आम्हाला रिफंड व्हावचर १५ वर्षापूर्वी देऊनही शेताची पूर्ण किंमत मिळाली नसतांना तथा जिल्हाधिकारी यांची अनिवार्य परवानगीशिवाय तथा कुळमालकास जमीन विकता येत नाही अशी कुळ कायदयात दंडक असतांना तलाठी व राजस्व निरीक्षक यांनी गैरकायदेशिर खरेदीखताचे फेर फार घेऊन रुजू करुन ७/१२ दुरुस्तही केला आहे. कुळ बु-हानशा व त्याचे मृत्यूनंतर त्याचे वारस यांनी कुळकाय.तील अटींचा भंग करुन सर्व जमीन विकून हजारो रुपये कमावले. तलाठी व राजस्व निरीक्षक यांनी जिल्हाधिकारी यांची परवानगी बाबतची अट ७/१२ दर्ज असतांना धडाक्याने फेर फार घेतले, रुजू केले, ७/१२ दुरुस्त केले. व ७/१२ मध्ये जिल्हाधिका-यांचे आदेशाची शर्त

तशीच शेरे कोष्टकी ठेवून जिल्हाधिकारी यांचे पदाची व कुळ कायदयाची अवमानना करुन आमची वडीलोपार्जित सर्वात मोठे शेत संगनमताने कवडीमोल हडप करण्यांस साथ देवून कुळकायदयातील प्रावधानाला वाटाण्याचया अक्षता लावून फसवणूकीचा गुन्हा केला आहे. तहसिलदार यांनी या प्रकरणात स्वतः होऊन (suo-Motu) कारवाई करणे अनिवार्य असतांना ती तर केलीच नाही उलट मी अर्ज देऊनही काहीच कारवाई केलेली नाही.

(४) हे सर्व प्रकरण अपराधिक, फसवणूकीचे नियमबाहय व आम्हास मनःसताप देणारे व आमचे आर्थिक नुकसान करणारे आहे. याची चौकशी होऊ आमचे पुर्ण शेत ३२ एकर ३६ गुंठे पुन्हा आमचे ताब्यात देण्यात यावे कारण आम्ही सेवानिवृत्त होऊ आम्हास आंता त्याची गरज आहे.

(५) कुळ कायद्याप्रमाणे जमीनीचा मालक होणारा कुळ बु-हानशा व त्याचे वारस व शेतमालक आम्ही दोघेही आता उक्त शेताजमीनी पासून वंचित झालो आहोत. कुळ कायदयाचा उदेश पराजित करण्याचे कारस्थान यशस्वी झाले. जय महाराष्ट्र.

चौकशी, कारवाई करुन आमची जमीन आम्हाला परत ताब्यात द्यावी हा अर्जाचा विषय आहे."

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून १०.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय व वर नमूद केलेल्या प्रथम अपीलाचा निर्णय हा एकत्रितरित्या दिलेला असून माहिती १० दिवसांत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे एकत्रितरित्या दिनांक १५.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल आहे.

७. अपीलार्थी यांचेकडून माहितीच्या खर्चाकरीता रुपये २२०/- भरणा करुन घेतला आहे तो वर नमूद केल्याप्रमाणे त्यांना परत करणे संयुक्तिक राहील व माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

८. अपीलकर्ता यांनी दोनही अपीलामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कार्यवाही करुन मागितलेली आहे. तसेच अभिप्रायात्मक प्रश्नोत्तराच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी यांची सुध्दा माहती मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे

कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भातील निर्णय करण्याची मागणी करणे तसेच जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय एखादया प्रकरणात अपेक्षित नाही व त्यामुळेच अशा प्रकारच्या मुद्यांना तसेच ज्या मुद्यांमधून कागदपत्रे उपलब्ध करुन देता येतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांची दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २८१/२००८ व २८२/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अनुक्रमे दिनांक ६.११.२००६ व ५.११.२००६ या दोनही माहितीच्या अर्जाप्रमाणे कागदपत्राच्या स्वरुपात (कारवाई करुन मिळणेची विनंती वगळून व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय वगळून) अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती दिल्या गेली नव्हती म्हणून नंतर माहितीच्या करीता आकारण्यात आलेले अतिरिक्त शुल्क रुपये २२०/- हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांना रजिस्टर पोस्टाने धनादेशाद्वारे परत करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३०.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २८९/२००८**

**१) श्री निळकंठ नारायणराव गोहणे,**
**न्यु. म्युन्सिपल सेकंडरी स्कुल, हिंगणघाट,**
**जिल्हा वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, वर्धा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.),**
**जिल्हा परिषद, वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.३.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री पी.ए. निमजे, अधीक्षक, शिक्षणाधिकारी कार्यालय, वर्धा हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहे

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर टपालने घेणार असे नमूद केले आहे.

"नाईक या पदाची मान्यता श्री निलकंठ गोहणे यांना त्रुटीची पुर्तता केल्यानंतरही का मिळालेली नाही याबाबत. (१) मान्यता प्रस्ताव १२.१.२००१ (२) त्रुटीची पुर्तता १८.४.२००१ (३) वारंवार स्मरणपत्र १३.६.०२, १५.१२.०३, २८.५.०५ न.प. अंतर्गत जि.बी.एम.एम.हायस्कुल व न्यू म्यु.से.स्कुल हि संयुक्त सेवाजेष्ठता असताना त्यापैकी कनिष्ठ कर्मचारी श्री पाके यांना जी.बी.एम.एम.हाय. मध्ये नाईक पदाची मान्यता देण्यात आली तर न्यू म्यु.से स्कुल ही येथील नाईक श्री गोहणे यांच्या पदाला मान्यता कां देण्यात आली नाही(सोबत उपसंचालक साहेब (शिक्षण)) यांचे दि. ३०.१.०८ चे पत्र."

३. अपीलकर्ता यांनी लगेच दूस-या दिवशी दिनांक ७.२.२००८ रोजी शिक्षणाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये दिनांक ५.१.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी मुख्याध्यापक न्यू म्युनिसिपल सेकंडरी स्कुल, हिंगणधाट यांचेकडे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती या कार्यालयात पाठवावी असे पत्र दिलेले दिसून येते व अर्जाची छायांकित प्रत दिलेली दिसून येते. परंतु, दिनांक ५.१.२००८ पुर्वीच्या अर्जाची प्रत दाखल केलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशामध्ये दिनांक ४.१२.२००७ रोजी अर्ज केलेला आहे असे दिसून यते व त्यावरुन दिनांक ५.१.२००८ रोजीची कार्यवाही केलेली दिसून येते. त्यामुळे दिनांक ५.१.२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे मुख्याध्यापक यांनी जी माहिती पाठविलेली असेल ती माहिती अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयूक्तीक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.१२.२००८ च्या अर्जाप्रमाणे किंवा ६.२.२००८ च्या अर्जाप्रमाणे मुख्याध्यापक यांचेकडून उपलब्ध झालेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २९४/२००८**

**१) श्री राजू राहुलकर,**
**शेठ प्रताप वार्ड, गलर्स कॅालेज रोड,**
**गजानन स्टोर्स के सामने गोंदिया,**
**ता. गोंदिया, जिल्हा गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय गोंदिया यांचेकडे केरोसिन प्रकरण १९९२-९६ या कालावधीतील मंजूरीची मुळ प्रकरणे फाईल इ. माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे त्यांचा लेखी युक्तीवाद तहसिलदार यांचेकडे दाखल केला आहे.

"मी अपीलीय अर्जदार आपल्या कार्यालयात जोडपत्र ब नमुन्यात अपीलीय अर्ज दि. ११.१०.२००७ रोजी केलेला आहे. आवश्यक असल्या माहितीचे स्वरुप व विषय असे आहे की सन ९२ ते ९६ दरम्यान केरोसीन परवाना मंजूरीचे मूळ प्रकरणे फाईल, अहवाल, बयान तसेच इतर संपूर्ण प्रकरणाबाबत कागदपत्र मागविलेले आहे. परंतु आपण आज पावेतो सदर कागदपत्रे पुरविले नाही. व त्या संदर्भात आदेश सुध्दा केला नाही.

त्याचप्रमाणे जोडपत्र अ मधील नमुन्यात माहिती अधिकारी तहसिल कार्यालय गोंदिया यांना सुध्दा माहिती मागविली होती. त्यांनी सदर माहिती न पुरविल्यामुळे मी आपल्याकडे अपील अर्ज दाखल केला आहे.

संदर्भिय क्रमांक १ अन्वये मा. उपविभागीय अधिकारी गोंदिया यांनी आपल्या आदेश दि. ९ जानेवारी, २००६ मध्ये नमूद केले की तहसिलदार गोंदिया यांचे पत्र क्रं.अ.का./अन्न/कावि/९४३/दौ.२६/१०/२००५ अन्वये ९२ ते ९६ दरम्यानची जूनी प्रकरणाचे शोध घेण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. व प्रकरणाचे शोध घेवून प्रकरण प्राप्त होताच अर्जदाराला तात्काळ पुरविण्यात येईल असे पत्र तहसिलदार गोंदिया यांनी उपविभागीय गोंदिया यांना सदर प्रकरणात माहिती दिली होती व त्यामुळेच सदर प्रकरणात उप विभागीय गोंदिया यांनी ९ जानेवारी, २००६ रोजी अपील प्रकरणात सदर आदेश पास केला. तेव्हा पासून आज पर्यंत तहसिलदार गोंदिया यांनी मला आज पर्यंत माहिती पुरविली नाही.

त्याचप्रमाणे तहसिलदार गोंदिया यांनी दि. २६.१०.२००५ रोजी मला लेखी कळविले की, आपण सन ९२ ते ९६ पर्यंतची केरोसीन परवाने मंजूरीचे प्रकरणे मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे व माहिती फार जूनी असल्यामुळे प्रकरणाचा शोध धेण्यास विलब लागण्याची शक्यता आहे.

करिता सदर प्रकरणाचा शोध घेवून प्रकरण प्राप्त होताच तात्काळ पुरविण्यात येईल. परंतु तहसिलदार गोंदिया यांनी दोन वर्षाचा कालावधी संपूर सुध्दा सदर माहिती पुरविली नाही.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक म.मा.अ.२००४/प्र.क्र.१२५/२००४-२००५ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १६.१०.२००४ अंतर्गत क्रमांक २३ अन्वये १५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त जूने सर्व शासकिय अभिलेख कोणत्याही व्यक्तीला माहिती पुरविणे बंधनकारक आहे, असे आदेश शासनाने केले आहेत.

माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील कलमान्वये प्रत्येक शाखेतील अभिलेख अपडेट करुन कोणत्याही व्यक्तीला पुरविणे बंधनकारक आहे. परंतु सदर कलमा अन्वये आपण कारवाई केली नाही.

मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ नागपूर जनहित याचिका क्रमांक १५५७/०५ मधील आदेशान्वये २९ ऑगष्ट २००५ रोजी माननीय आयुक्त नागपूर यांना आदेश केले की संबंधीत प्रकरणाची चौकशी करुन कायदयानुसार कारवाई करावी. त्यामध्ये मी याचिकाकर्ता आहे.

सदर याचिकामध्ये मा. आयुक्तांच्या चौकशीमध्ये प्यारावाईज रिप्लाय सादर करतांना ९२-९६ दरम्यानचे सदर प्रकरणे आपण सादर केलेले नाही. असे आम्हाला कळले आहे. त्यामुळे चौकशी अडथळा निर्माण होऊ शकतो. आमच्या माहिती प्रमाणे सदर प्रकरणाची शोध घेण्याकरीता आपण कोणत्याही कर्मचा-यांवर कारवाई केल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर प्रकरणाचा शोध घेण्याकरीता आपण निष्काळजी करत आहात, असे स्पष्ट होते. किंवा हेतू परस्पर सदर माहिती देण्यास टाळाटाळ करत आहात किंवा अपराधी व्यक्तीला मदत करत असाल असे स्पष्ट होते.

करीता सदर माहिती आम्हाला न्यायालयीन कामा करीता व शासनातील कारभाराची सत्यता जाणण्याकरीता मी दोन वर्षा पासून माहिती आपल्या कार्यालयाला मागत आहे. तरी आपण सदर माहिती तात्काळ पुरविण्यात यावी ही विनंती."

४. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, माहीती ही सन १९९२-९६ या कालावधीतील व व्यापक प्रमाणात व मोघम असल्यामुळे ती उपलब्ध नाही असे अपीलकर्ता यांना कळविले होते. तसेच दिनांक १२.१०.२००७ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध नाही असे कळविण्यात आले होते. परंतु आता तहसिलदार गोंदिया यांनी असे सांगितले की, मा. उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे माहितीचा शोध घेण्यात आला व त्यातील काही माहिती उपलब्ध झाली आहे ती जी माहिती उपलब्ध झालेली असेल ती माहिती अपीलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच पुन्हा सन १९९२-९६ या कालावधीतील केरोसिन वाटपाच्या बाबतची सर्व माहितीचा शोध ज्या ज्या ठिकाणी शक्य असेल त्या त्या ठिकाणी घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व

त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीचा शोध घेवून उपलब्ध झाली असल्यास त्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) उर्वरित माहितीचा पुन्हा शोध घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास व अपीलकर्ता यांची तक्रार आल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६५/२००८**

**१) श्री संपत तुकाराम रामटेके, अध्यक्ष**
**सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया,**
**७१२, उत्कर्ष निर्माण सदर नागपूर-१** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,**
**इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.३.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.३.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. परंतु त्यांचे प्रतिनिधी श्री एस.पी. बावनगडे, कार्यालयीन अधीक्षक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

**२.** अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून मा. अधीष्ठाता, इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय यांचेकडे सिकलसेल रुग्ण (एस.एस.पॅर्टन)ची माहिती जुलै,२००१ ते अर्जाच्या तारखेपर्यंत दिलेल्या नमून्यात मागितलेली दिसून येते.

| अ. क्रं. | सिकलसेल रुग्णांचे नांव | पॅटर्न SS/SF /SB | वय | लिंग | निदानाची तारीख | जात नोंद असल्यास | पत्रव्यवहाराचा पत्ता | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | गांव/प्लॉट नं./नगर | पोस्ट | तालुका | जिल्हा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

३. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २७.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना प्रोजेक्ट को-ऑर्डिनेटर, आरएचएमसी, इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर यांनी डॉ. कुबडे, माहिती अधिकारी यांचेकडे पाठविलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरील माहितीमध्ये रुग्णांचे नांवानिशी वैयक्तिक माहिती गोपनिय अहवालाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २१.७.२००५ मधील कलम ८(जे) नुसार देता येणार नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. व ससोबत वर्षनिहाय स्त्री व पुरुष यांची एकुण आकडेवारी दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२००८ रोजी प्रथम अपील अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.४.२००८ रोजी देण्यात आला असून प्रा. व विभाग प्रमुख, विकृती शास्त्र विभाग,इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय नागपूर यांनी त्यावर आपले अभिप्राय या कार्यालयाला सादर केले आहे (पत्राची प्रत सुध्दा जोडलेलीआहे) त्यांनी केलेला खुलास योग्य आहे व अपीलीय अधिका-यांचे त्यांनी केलेल्या कृतीस समर्थन आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. सदरच्या अपीलाच्या सुनावणीस दिनांक २६.३.२००९ रोजी अपीलकर्ता हजर होते. परंतु जन माहिती अधिकारी हे गैरहजर होते व त्यांचे प्रतिनिधी म्हणून कार्यालयीन अधीक्षक हे हजर होते. परंतु कार्यालयीन अधीक्षक यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात कोणताही खुलासा करता आला नाही तसेच त्यांना त्याची माहिती नाही असे त्यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून कागदपत्रे दाखल झाली होती परंतु तरी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल झालेला नाही.

५. वास्तविक, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता अधिनियमाचे कलम८(१)चा आधार घेवून ती माहिती गोपनिय आहे असे कळविण्यात येतात त्यावेळेस त्याबाबतचे स्पष्टीकरण सुध्दा कळविणे आवश्यक असते. व त्यामुळे आयोगानी सुध्दा जन

माहिती अधिकारी यांचेकडून स्पष्टीकरण अपेक्षित केले होते. जन माहिती अधिकारी हे हजर नसल्यामुळे किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे सुध्दा कोणीही प्रतिनिधी हजर नसल्यामुळे त्याबाबतचा तांत्रिक खुलासा हा आयोगापुढे झालेला नसल्यामुळे आयोगानी जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०.३.२००९ रोजी उपस्थित राहून खुलासा करावा  असे तोंडी आदेश कार्यालयीन अधिक्षक यांना दिले. परंतु दिनांक ३०.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी हे हजर झाले नाही. त्यानंतर पुन्हा जन माहिती अधिकारी यांना संधी देण्यासाठी दिनांक ३१.३.२००९ रोजी म्हणजे आज पुन्हा उपस्थित राहाण्यास तोंडी आदेश देण्यात आले होते. परंतु आजही जन माहिती अधिकारी हे वैयक्तिकरित्या उपस्थित राहीलेले नाही व त्यांनी पुन्हा कार्यालयीन अधीक्षक यांना सुनावणीस पाठविले आहे. मात्र अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक २६.३.२००९ रोजी त्यांचा लेखी युक्तिवाद दाखल केलेला आहे. लेखी युक्तिवादात त्यांनी शासन निर्णय दिनांक ५.१२.२००१ चा संदर्भ दिलेला आहे. परंतु त्या शासन निर्णयामध्ये सिकलसेल रुग्णांची नांवे प्रसिध्द केली पाहिजे किंवा  त्यांना ओळखपत्र दिले पाहिजे अशा प्रकारचे कोणतेही आदेश नाही. अशा प्रकारचे जे रुग्ण असतील त्यांना मोफत रक्कत पुरवठा व रुग्णांचा उपचार मोफत करण्यात यावा असे आदेश आहे. त्याप्रमाणे सिकलसेलच्या रुग्णांचे ओळखपत्र करावे असे आदेश नाहीत. व याबाबतही जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा येणे आवश्यक होते. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, नागपूर यांनी संचालक, राज्य रक्त संकलन पुरवठा, महाराष्ट्र राज्य यांना सिकलसेल रुग्णांचे ओळखपत्र तयार करण्याबाबतचे संदर्भिय पत्रासोबत प्राप्त झालेला प्रस्ताव सोबत जोडून पाठविलेला आहे. व त्याची प्रत अध्यक्ष, सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया यांना दिलेली दिसून येते. परंतु त्याबाबत ओळखपत्र देण्याचा निर्णय झाला आहे किंवा नाही अशा प्रकारचा कोणताही आदेश अपीलकर्ता यांनी दाखल केला नाही. व त्यामुळे ओळखपत्र द्यावे असे आदेश दिलेले आहे असा निष्कर्ष काढता येत नाही.

६. शासकिय माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती यांी अपीलकर्ता यांना सिकलसेल रुग्णांची नांवे व दाखल झाल्याची तारीख ही

दिलेली आहे. त्यात आडनांव दिलेले नाही. तसेच बाळंतपणाची तारीख, जात किंवा पत्रव्यवहाराची पोच किंवा वय हे सुध्दा दिलेले नाही. यावरुन अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती ही इतर रुग्णालयांनी दिलेली आहे हे अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती दिली आहे असे एक पत्र अपीलकर्ता यांनी दाखल केले आहे. परंतु त्यात एकुण ५५ पाने याबध्दलची माहिती अपीलकर्ता यांनी त्यांच्या निवेदनासोबत जोडलेली नाही. मात्र अपीलकर्ता यांना अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयासोबत दिनांक ४.४.२००८ चे डॅा. अ.वी. श्रीखंडे प्रा. व विभाग प्रमुख, विकृती शास्त्र विभाग व प्रकल्प संचालक, आरएडीएमसी यांनी अधीष्ठाता, इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय यांना सिकलसेल रुग्णांची नांवे प्रकट करण्याच्या संदर्भामध्ये जे मुद्या क्रं. ३ व ४ च्या संदर्भात जे स्पष्टीकरण दिलेले आहे ते स्पष्टीकरण योग्य आहे असे वाटते व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. व तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे असे दिसून येते.

मात्र, सदरच्या अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी यांना उचित संधी देवूनही आयोगापुढे उपस्थित राहाण्याबाबत बेजबाबदारपणा दाखविलेला असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधीष्ठाता यांनी प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक ठरेल अन्यथा आयोगाचे पुढे सुनावणीस येण्यास नकार देणे किंवा दुर्लक्ष करणे याबाबत त्यांना अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक होईल. अधिष्ठाता यांनी राज्य माहिती आयुक्तांच्या दर्जाची जाणीव त्यांचे कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना करुन देणे आवश्यक आहे. अधीष्ठाता यांनी केलेल्या प्रशासकिय कारवाईचा अहवाल हा आयोगास हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत कळविण्यात यावा अन्यथा सार्वजनिक प्राधिकरण म्हणून सुध्दा अधिनियमाचे कलम १८ प्रमाणे तसेच कलम १९(८)(६)(ग) प्रमाणे शास्ती लादणे अपरिहार्य होईल.

मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अधिष्ठाता इंदिरा गांधी शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.३.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**